सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
SOLAPUR TARUN BHARAT
सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहिल्यानगर व सातारा येथून वितरित

आजचा सामना
मुंबई वि. पंजाब
वेळ : सायं.७.३० वाजता
ठिकाण : मुंबई

धाराशिव | गुरुवार, १६ एप्रिल २०२६ | वर्ष ४ थे अंक ३९ | पाने १२ | किंमत रु. ८/- ■ RNI No. MAHMAR/2023/86468 ■ Postal Regd No. SLP/32/2024-2026.
dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com

### विचारपुष्प



सर्व विचारप्रक्रियांचा परस्परांशी असलेला एकरूप संबंध लक्षात घेणे हे केवळ बौद्धिक कौशल्याचे काम नाही. तर उलट ती आजच्या काळाची तातडीची गरज आहे. कारण त्याशिवाय देशातील राष्ट्रीय शक्ती आणि आध्यात्मिक शक्तींचा बलशाली, प्रभावशाली व यशोदायी आविष्कार निर्माण होणारच नाही.

**- पद्मविभूषण पी. परमेश्वरन्**
संस्थापक, भारतीय विचार केंद्र,
पूर्व अध्यक्ष विवेकानंद केंद्र

# 'नारी शक्ती'साठी आजपासून अधिवेशन

## महिला आरक्षण घटनादुरुस्ती विधेयक मांडणार

**नवी दिल्ली, १५ एप्रिल**


लोकसभा आणि विधानसभांत महिलांना ३३ टक्के आरक्षण देण्याबाबतचे घटनादुरुस्ती विधेयक पारित करुन घेण्यासाठी गुरुवार १६ एप्रिलपासून संसदेचे तीन दिवसांचे विशेष सत्र होत आहे. घटनादुरुस्ती विधेयक संसदेच्या दोन्ही सभागृहात पारित करुन त्याचे कायद्यात रुपांतर झाल्यानंतर महिलांना ३३ टक्के आरक्षणाचा फायदा २०२९ च्या लोकसभा निवडणुकीपासून मिळणार आहे. रालोआतील मित्रपक्षही या घटनादुरुस्ती विधेयकाचे स्वागत करण्यासाठी उत्सुक झाले आहेत.

२०२३ मध्ये संसदेत ऐतिहासिक असे 'नारी शक्ती वंदन विधेयक' पारित करण्यात आले होते. या विधेयकाुसार लोकसभेत तसेच राज्य विधानसभांत महिलांना ३३ टक्के आरक्षण मिळणार आहे. २०२९ च्या लोकसभा निवडणुकीपासून महिलांचे ३३ टक्के टक्के आरक्षण लागू करण्याचा मोदी सरकारचा निर्धार आहे. पण या विधेयकाची अंमलबजावणी करण्यासाठी आधी जनगणना आणि नंतर मतदारसंघाचे परिसिमन म्हणजे फेररचना होणे आवश्यक आहे. पण जनगणना आणि मतदारसंघाच्या फेररचना ही अतिशय वेळखाऊ प्रक्रिया आहे. त्या परिस्थितीत २०२९ च्या लोकसभा निवडणुकीत याची अंमलबजावणी होणे शक्य नाही.

**खासदारांची संख्या ८५० करण्याचा प्रस्ताव**

**लोकसभा तसेच राज्य विधानसभातील लोकप्रतिनिधींच्या संख्येत सरसकट ५० टक्क्यांनी वाढ करण्याचा सरकारचा प्रस्ताव आहे. लोकसभेतील खासदारांची ८५० करण्याचा सरकारचा प्रस्ताव आहे, यातील ८१५ जागा विविध राज्यातील राहणार असून ३५ जागा केंद्रशासित प्रदेशासाठी ठेवण्यात आल्या आहेत. २०११ च्या जनगणतेच्या आधारावर मतदारसंघाची फेररचना केली जाणार आहे.** ■

मात्र सरकार २०२९ पासून यांची अंमलबजावणी करण्यावर ठाम असल्यामुळे घटनादुरुस्ती करावी लागणार आहे. यासाठी संसदेत तीन घटनादुरुस्ती विधेयक मांडून पारित करावे लागणार आहे. त्यासाठी १६ एप्रिलपासून संसदेचे तीन दिवसांचे अधिवेशन बोलावण्यात आले आहे. या तीन दिवसांच्या अधिवेशनासाठी भाजपा आणि काँग्रेस यांनी आपल्या पक्षाच्या खासदारांसाठी पक्षादेश (व्हीप) जारी केला आहे. तीन दिवस सर्व खासदारांनी संसदेत उपस्थित राहण्यबाबतचा हा पक्षादेश आहे. (तभा वृत्तसेवा)



विधेयकावर चर्चा करण्यासाठी विरोधी पक्षांच्या नेत्यांची बैठक झाली

## विधेयकाला एकजुटीने विरोध करणार : खडगे

**नवी दिल्ली, १५ एप्रिल**

महिलांना ३३ टक्के आरक्षण देण्याबाबतच्या घटनादुरुस्ती विधेयकाला आमचा विरोध नाही, मात्र ज्या पध्दतीने आणि घाईगर्दीने हे विधेयक आणले जात आहे, त्याला आमचा विरोध असल्याचे काँग्रेस आणि अन्य विरोधी पक्षांनी म्हटले आहे.

या घटनादुरुस्ती विधेयकावर भूमिका ठरवण्यासाठी विरोधी पक्षांची बैठक बुधवारी काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष आणि राज्यसभेतील विरोधी पक्षनेते मल्लिकार्जुन खडगे यांच्या १० राजाजी मार्ग या निवासस्थानी झाली.

महिला आरक्षणाला आमचा विरोध नाही, पण हे आरक्षण लागू करण्यासाठी जो मार्ग आणि वेळ सरकारने निवडली, त्याला आमचा विरोध आहे, असे स्पष्ट करत खडगे म्हणाले की, विधानसभा निवडणुकीत राजकीय फायदा लाटण्याचा सरकारचा प्रयत्न यातून दिसतो आहे. राजकीय हेतुने प्रेरित आणि जनतेची दिशाभूल करण्याचा सरकारचा हा प्रयत्न आहे.

महिला आरक्षणाचे आम्ही नेहमीच समर्थन केले आहे, याकडे लक्ष वेधत खडगे म्हणाले की, जुन्या दुरुस्त्या आधी लागू करण्यात याव्या, असा आमचा आग्रह आहे. जनगणना आणि मतदारसंघाच्या फेररचनेच्या नावावर सरकार खेळ करत आहे. कार्यपालिकेच्या आधारे सरकार ते अधिकार आपल्या हातात घेण्याचा प्रयत्न करत आहे, जे संविधानात असायला हवे. आसाम आणि जम्मू - काश्मीरला मतदारसंघाची फेररचना करतांना आम्हाला धोका देण्यात आला, यामुळे मतदारसंघाच्या फेररचनेच्या मुद्यावर आम्ही सतर्क राहणार आहे. त्या विधेयकाला संसदेत आम्ही एकजुटीने विरोध करणार आहे, असे खडगे म्हणाले. (तभा वृत्तसेवा)

# इराणविरुद्धचे युद्ध संपुष्टात; होर्मुझमधील नाकाबंदी हटवली

## ट्रम्प यांची घोषणा; अमेरिका शांतता करारास उत्सुक


**वॉशिंग्टन, १५ एप्रिल**

इराणविरुद्धचे युद्ध संपुष्टात आले असून, आता होर्मुझ सामुद्रधुनीमधील नाकाबंदी उठवत आहे. हा जलमार्ग सर्वांसाठी खुला राहणार असल्याची घोषणा राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी बुधवारी समाज माध्यमावरील पोस्टमधून केली. अमेरिका शांतता करार करण्यास उत्सुक असल्याचेही त्यांनी नमूद केले.

सोमवारी लागू झालेली नाकाबंदी बुधवारी रात्री पूर्णपणे हटवण्यात आली असून, आता जागतिक व्यापारासाठी हा मार्ग सुरळीत झाला आहे. अवघ्या ४८ तासांतच ट्रम्प यांनी होर्मुझमध्ये तैनात १० हजार सैनिकांना माघारी बोलावले. या निर्णयामागे चीनची भूमिका आणि समुद्रातील बदललेली समीकरणे कारणीभूत असल्याचे मानले जात आहे. नाकाबंदी उठवताना ट्रम्प यांनी चीनचा विशेष उल्लेख करीत म्हटले की, राष्ट्राध्यक्ष शी जिनपिंग यांच्याशी माझे चांगले संबंध आहेत.

**आखाती देशांवर हल्ल्याची अपेक्षा नव्हती**

**वृत्तसंस्थेला दिलेल्या मुलाखतीत ट्रम्प म्हणाले, हल्ल्यानंतर इराण मित्र राष्ट्रांना लक्ष्य करेल याची आम्हाला अपेक्षा नव्हती. आम्ही माघार घेतली नसती तर, इराणला परिस्थिती सुधारण्यासाठी २० वर्षे लागली असती. सध्या परिस्थिती वेगाने बदलत आहे. चर्चेची नवीन फेरी लवकरच होईल.** ■



**जिनपिंग यांना विश्वासात घेणार**

**मी काही आठवड्यांत चीनचे राष्ट्राध्यक्ष शी जिनपिंग यांची भेट घेणार आहे. इराणला शस्त्रपुरवठा करण्यासंदर्भात मी जिनपिंग यांना पत्र पाठवून चिंता व्यक्त केली होती. त्यांनी लेखी उत्तरात इराणला शस्त्रपुरवठा करणार नसल्याचे स्पष्ट केले. अमेरिकेने घेतलेला निर्णय आशियाई देशांच्या फायद्याचा असल्याचे ट्रम्प म्हणाले.** ■

चीनने इराणला शस्त्रे पुरवू नयेत, अशी माझी विनंती त्यांनी मान्य केली आहे. त्यामुळे आता होर्मुज बंद ठेवण्याची गरज नाही. जेव्हा मी चीनला जाईन, तेव्हा जिनपिंग मला मिठी मारतील, असाही टोला त्यांनी लगावला.

दरम्यान नाकाबंदीच्या पहिल्याच दिवशी जवळपास २० जहाजांनी अमेरिकन नौदलाला न जुमानता होर्मुजमधून प्रवास केला. यामध्ये सर्वाधिक जहाजे चीनची होती. (वृत्तसंस्था)

## आता 'अनुसूचित जाती आयोग'

**नावात बदल; राज्य शासनाचा निर्णय**

**मुंबई, १५ एप्रिल**

महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती जमाती आयोगाच्या नावात बदल करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय राज्य शासनाने घेतला असून, आता या आयोगाचे नाव 'महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती आयोग', असे करण्यात आले आहे.

अनुसूचित जाती व अनुसूचित जमातींच्या सामाजिक, शैक्षणिक आणि आर्थिक परिस्थितीचा अभ्यास करून शासनास आवश्यक उपाययोजना सुचविण्यासाठी १ मार्च २००५ रोजीच्या शासन निर्णयान्वये महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती-जमाती आयोगाची स्थापना करण्यात आली होती. त्यानंतर, केंद्र शासनाच्या धोरणानुसार राज्यात स्वतंत्रपणे महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती आयोगास मान्यता व वैधानिक दर्जा देण्याच्या प्रस्तावास १० जून २०२५ रोजी झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत मंजुरी देण्यात आली होती.

दरम्यान, २०२५ मध्ये महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती आयोग अधिनियम, २०२५ लागू करण्यात आला. (तभा वृत्तसेवा)

## निर्यात ७.४४ टक्क्यांनी घटून ३८.९२ अब्ज डॉलर्स

**नवी दिल्ली, १५ एप्रिल**

देशाची व्यापारी निर्यात मार्चमध्ये ७.४४ टक्क्यांनी घटून ती ३९.९२ अब्ज डॉलर्सवर आल्याचे बुधवारी जाहीर झालेल्या सरकारी आकडेवारीवरून स्पष्ट झाले.

मागील वर्षी आयातीमध्येही ६.५१ टक्क्यांची घट होऊन ती ५९.५९ अब्ज अमेरिकी डॉलर्सवर पोहोचली. आदल्या वर्षीच्या याच महिन्यात ही आयात ६३.७५ अब्ज डॉलर्स इतकी नोंदवली गेली होती. होर्मुझ सामुद्रीधुनीसारख्या प्रमुख व्यापारी मार्गांमध्ये निर्माण झालेल्या अडथळ्यांचे हे प्रतिबिंब आहे. ■

## लता-आशा मंगेशकर रुग्णालयाचा कोनशिला समारंभ आज

**सरसंघचालक डॉ. मोहनजी भागवत यांची उपस्थिती**

**पुणे** : येथील नांदोशी परिसरात उभारण्यात येत असलेल्या लता-आशा मंगेशकर रुग्णालयाचा कोनशिला समारंभ उद्या गुरुवार १६ एप्रिल रोजी होत असून, यासाठी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक डॉ. मोहनजी भागवत, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस तसेच, मंगेशकर कुटुंबीय उपस्थित राहणार आहे. नांदोशी येथील ४० एकर परिसरात उभारण्यात येणारे हे आयुर्विज्ञान संस्थान आशियातील मोठ्या रुग्णालयांपैकी एक ठरणार आहे. पहिल्या टप्प्यात १००० खाटांची इमारत उभारण्यात येणार असून पुढील टप्प्यात एकूण ३००० खाटांची क्षमता विकसित केली जाणार आहे.

# २१ खत विक्रेत्यांचे परवाने निलंबित; दोघांवर होणार गुन्हा दाखल

**शेतकऱ्यांची दिशाभूल; जिल्ह्यातील २३ दुकानदारांच्या सुनावण्या**

**जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी भोसले यांची कडक कारवाई**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १५ एप्रिल-**

शेतकऱ्यांना चढ्या दराने खते, बियाणे विकून जादा दराच्या पावत्या करणे, युरिया व इतर खतांचा मोठा स्टॉक करणे यासह इतरही काही कारणावरून शेतकऱ्यांची फसगत केलेल्या जिल्ह्यातील २३ दुकानदारांच्या आज (दि. १५) जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी शुक्राचार्य भोसले यांनी सुनावण्या घेतल्या आणि कसलीही भाडभीड न ठेवता दोषी असलेल्या सर्वांवरच 'निब्बर' कारवाई केली आहे. या कारवाईमध्ये दोघांवर 'एफआयआर' दाखल करण्याचे आदेशही संबंधित अधिकाऱ्यांना दिले आहेत. यामुळे खत, किटकनाशके, बियाणे विक्रेत्यांमध्ये चांगलीच खळबळ उडाली आहे.

या कारवाईबाबत जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी भोसले यांच्याकडून (पान ३ वर)

मिळालेली माहिती अशी की, आमच्या कृषी अधीक्षक कृषी अधिकारी कार्यालयास आणि ११ तालुक्यातील तालुका गुणवत्ता निरीक्षकांकडे काही शेतकऱ्यांनी केलेल्या तक्रारीवरून, कृषी अधिकारी व तालुका गुणवत्ता निरीक्षक अधिकाऱ्यांच्या पथकास तपासणी करताना दुकानदारांच्या स्टॉकमध्ये, विक्रीत अनियमितता आढळून आल्याने संबंधित दुकानदारांच्या सुनावण्या बुधवारी घेण्यात आल्या. यामध्ये शेतकऱ्यांना विकलेल्या मालाच्या जादा दराच्या पावत्या केल्याने आणि स्टॉकचा साठा मोठ्या प्रमाणात आढळून आल्याने २ जणांवर गुन्हा दाखल करण्याचे आदेश तालुका गुणवत्ता निरीक्षकांना तत्काळ दिले आहेत; यामुळे मंगळवेढा आणि मोडनिंब येथील त्या संबंधित दुकानदारांवर आता लवकरच गुन्हे दाखल होणार आहेत. तर उर्वरित २० जणांवर तात्पुरता परवाना निलंबनाची कारवाई करण्यात आली आहे. तर यातील टेंभुर्णी येथील एकाचा कायम स्वरूपी परवाना रद्द केला आहे. या कारवाई केलेल्या २३ जणांमध्ये २० खतविक्रेते, १ किटकनाशक आणि ३ बियाणे अशा २४ विक्रेत्यांचा समावेश आहे. गतवर्षीही भोसले यांनी २०० च्यावर दुकानदारांवर अशीच बेधडक कारवाई केली होती.

**मार्च महिन्यातील जादा युरिया वापराचीही करणार पडताळणी**

गतवर्षी मार्च महिन्यात १५ हजार मेट्रीक टन युरिया आपल्या जिल्ह्यातील शेतकरी बांधवांनी वापरला होता. तर मार्च २०२६ मध्ये तब्बल २२ हजार मे. टन युरियाचा वापर झाला आहे. म्हणजेच ७ हजार मे. टन इतका जास्त वापर युरियाचा कसा झाला? आणि हा राज्यातील सर्वाधीक वापर सोलापूरचा असल्याने याची पडताळणी आमचे पथक करत आहे. पहिल्या टप्प्यात २५० दुकाने तपासणी मोहीम सुरू आहे आणि जिल्ह्यातील ३६०० शेतकऱ्यांशीही संवाद साधून आम्ही याची खातरजमा करून घेणार आहोत. एकंदरीत, याचा वापर वाढला कसा? याची आम्ही माहिती घेत असल्याचेही जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी शुक्राचार्य भोसले यांनी दिली.

## अकोल्यात उष्माघाताचा बळी?

**अगरवेस भागात ऑटोत आढळला इसमाचा मृतदेह**

**अकोला, १५ एप्रिल**

जुने शहरातील अगरवेस भागात एका मालवाहू ऑटो ध्ये अज्ञात व्यक्तीचा मृतदेह आढळला. या इसमाचा मृत्यू उष्माघाताने झाला असावा, असा प्राथमिक अंदाज पोलिसांनी वर्तविला आहे. मृतदेह शवविच्छेदनासाठी जिल्हा सर्वोपचार रुग्णालयात पाठविण्यात आला आहे. हा इसम ३५ ते ४० या वयोगटातील असल्याचे सांगण्यात आले आहे. अकोला शहराचे व संपूर्ण जिल्ह्यात तापमान ४४ अंशाच्या वर गेले आहे असून उष्माघाताचा धोका वाढला आहे. अशात जुने शहरातील भागात एका मालवाहूध्ये अज्ञात व्यक्तीचा मृतदेह आढळून आल्याने एकच खळबळ उडाली आहे.





## सीबीएसई दहावीचा निकाल जाहीर

**नवी दिल्ली** : केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळाने (सीबीएसई) देशभरातील २२ विभागांधील यावर्षीचे उच्च माध्यमिक परीक्षेचे निकाल जाहीर केले असून, एकूण उत्तीर्णतेचे प्रमाण ९३.७० टक्के आहे. मुलींनीही उत्तम कामगिरी करत आपले वर्चस्व कायम राखले आहे. मुलींची उत्तीर्णतेची टक्केवारी ९४.९९ टक्के, तर मुलांची ९२.६९ टक्के होती. याचा अर्थ, मुलींनी पुन्हा एकदा शैक्षणिक क्षेत्रात उत्कृष्ट कामगिरी केली आहे. यावर्षी तिरुवनंतपुरम विभागाने ९९.७९ टक्के उत्तीर्णतेसह देशात प्रथम क्रमांक पटकावत अपवादात्मक कामगिरी केली आहे.



## महत्वाचे...



### डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना मनपा प्राथमिक शिक्षण मंडळात अभिवादन

**सोलापूर, दि. १५ एप्रिल-**

नवी पेठ येथील महानगरपालिका प्राथमिक शिक्षण मंडळामध्ये भारतीय घटनेची डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त त्यांच्या प्रतिमेस मनपा प्राथमिक शिक्षण मंडळाचे प्रशासनअधिकारी मल्हारी माने यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी मनपा प्राथमिक मंडळाचे मुख्य लिपिक माहेजबीन शेख, लेखापाल मल्लिकार्जुन हिरेमठ, संतोष बांगर, संतोष बुलबुले, सुरेश कासार, रजनी राऊळ, निलोफर सय्यद, तरंगिणी कोंडा, महेश वालावलकर, सारंग अंजीखाने, तुकाराम भोसले, अविनाश शिंदे, सचिन जाधवर, आनंद हिरेमठ, सतिश सरवदे भालचंद्र साखरे सचिन साखरे सायली ढोले उपस्थित होते.



### जिव्हाळा संस्थेच्यावतीने डॉ. आंबेडकर जयंती साजरी

**बार्शी, दि. १५ एप्रिल-**

जिव्हाळा मागासवर्गीय बहुउद्देशीय संस्थेच्यावतीने भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती साजरी करण्यात आली. यावेळी हृदयरोगतज्ज्ञ डॉ. योगेश सोमाणी व समाजसेविका देशपांडे मॅडम यांच्या हस्ते प्रतिमेचे पूजन करुन जयंती साजरी करण्यात आली. यावेळी संस्थेचे अध्यक्ष बब्रुवान धावारे, उपाध्यक्ष राजू थोरात, संस्थेचे सर्वासर्वी निलेश खुडे, शामनाथ कसबे, राहुल कांबळे, मोहन खुडे उपस्थित होते.



### मंद्रूप बॅंक ऑफ इंडियात डॉ. आंबेडकर जयंती साजरी

**मंद्रूप, दि. १५ एप्रिल-**

बॅंक ऑफ इंडिया मंद्रूप शाखेत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती साजरी करण्यात आली. यावेळी डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आली. यावेळी शाखाधिकारी सिध्दाराम खट्टे, अजिंक्य कदम, प्रतीक पाटील, रुचिरा कट्टे, अविनाश जोकारे, सतीश कासार, सुरेन्दर रमावत, राघवेंद्र मलाबदे, श्रीकांत कोळी, महेश कोळी, चिमराया कांबळे, प्रशांत लोणारी आदी उपस्थित होते.



### जेऊरमध्ये संभाजी ब्रिगेड कार्यालयात महात्मा फुले, डॉ. आंबेडकर यांची जयंती साजरी

**जेऊर, दि. १५ एप्रिल-**

संभाजी ब्रिगेड संपर्क कार्यालय जेऊर (ता.करमाळा) मध्ये महात्मा ज्योतिराव फुले व भारतीय संविधानाचे शिल्पकार भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांची संयुक्त जयंती साजरी करण्यात आली. यावेळी बोलताना हेमंत शिंदे म्हणाले सर्व भारतीयांना न्याय मिळवून देण्यासाठी, नागरिक म्हणून समान अधिकार देणाऱ्या भारतीय संविधानाचे शिल्पकार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना जयंतीनिमित्त विनम्र अभिवादन. अन्यायाची रात्र संपवून न्यायाचा आणि समतेचा प्रकाश पसरवणारा सूर्य म्हणजे डॉ. बाबासाहेब आंबेडकर असेही ते म्हणाले. यावेळी पुणे विभागीय कार्याध्यक्ष संभाजी ब्रिगेड नितीन खटके, निलेश पाटील, हेमंत शिंदे, अतुल निर्मळ, अजित उपाध्दे, सागर साखरे, आदिनाथ माने, किशोर कदम, उमेश मोहिते सोमनाथ जाधव उपस्थित होते.

### मोडनिंबमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती साजरी

**मोडनिंब, दि. १५ एप्रिल-**

मोडनिंब (ता.माढा) भारतीय राज्य घटनेचे शिल्पकार, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३५ वी जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. प्रारंभी धम्मवंदना करण्यात आली. यानंतर महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. ग्रामपंचायत, शासकीय कार्यालये, विविध सामाजिक संघटना, आणि जयंती उत्सव मंडळांनी एकत्र येत अभिवादन केले. लहानथोर, युवक, महिला, विद्यार्थी यांनी कार्यक्रमात उत्स्फूर्त सहभाग घेतला. शहरातून भव्य शोभायात्रा काढण्यात आली. रॅलीत लहान मुलांपासून महिला सहभागी होत्या. जवळपास ७५ युवक-युवतींची लेझीम कसरत या फेरीतील सहभाग्यांनी लेझीम प्रदर्शन सादर केले. कार्यक्रमानंतर विविध सांस्कृतिक आणि सामाजिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले.विविध सांस्कृतिक कार्यक्रमांनी वातावरण भारावून गेले. विविध सामाजिक संघटना, राजकीय पक्षाच्या पदाधिकाऱ्यांनी पुतळ्यास पुष्पहार अर्पण करुन अभिवादन केले.

## काटेगावात आरोग्य विभागाचा भोंगळ कारभार

# उपचाराअभावी ३८ वर्षीय तरुणाचा मृत्यू

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. १५ एप्रिल-**

तालुक्यातील काटेगांव येथील आरोग्य उपकेंद्रातील गंभीर निष्काळजीपणामुळे एका ३८ वर्षीय तरुणाला आपला जीव गमवावा लागल्याची संतापजनक घटना समोर आली आहे. रमीज (राजू) उमर पटेल असे मृत तरुणाचे नाव असून, ऐन आणीबाणीच्या क्षणी उपकेंद्रात एकही डॉक्टर हजर नसल्याने ग्रामस्थांनी तीव्र संताप व्यक्त केला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, १३ एप्रिल रोजी रमीज पटेल यांना राहत्या घरी हृदयविकाराचा तीव्र झटका आला. कुटुंबीयांनी कोणताही वेळ न दवडता त्यांना तातडीने काटेगाव येथील आरोग्य उपकेंद्रात दाखल केले. मात्र तेथे एकही डॉक्टर उपस्थित नसल्याने योग्य व तात्काळ उपचार मिळू शकले नाहीत. उपस्थित कर्मचाऱ्यांकडूनही आवश्यक



मयत रमीज उमर पटेल

वैद्यकीय मदत मिळाली नसल्याने रमीज यांची प्रकृती अधिकच गंभीर होत गेली आणि अखेर त्यांचा मृत्यू झाला.

या उपकेंद्रातील डॉक्टरांच्या अनियमिततेबाबत ग्रामपंचायतीने यापूर्वी अनेक वेळा जिल्हा व तालुका आरोग्य अधिकाऱ्यांकडे लेखी तक्रारी सादर केल्या होत्या. तरीही प्रशासनाने याकडे दुर्लक्ष केल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. वेळेवर डॉक्टर उपलब्ध असते, तर रमीजचे प्राण वाचले असते .या घटनेनंतर काटेगाव परिसरात संतापाची लाट उसळली असून, ग्रामीण भागातील जनतेच्या आरोग्याशी खेळ करणाऱ्या या बेफिकीर यंत्रणेविरोधात कठोर कारवाईची मागणी जोर धरत आहे. दोषी डॉक्टर व संबंधित अधिकाऱ्यांवर तात्काळ कडक कारवाई न झाल्यास येत्या दोन दिवसांत तहसील कार्यालयावर धडक मोर्चा काढण्यात येईल, असा इशारा ग्रामस्थांनी दिला आहे.

# जनतेने उष्माघातापासून काळजी घेणे गरजेचे

### डॉ. भाऊसाहेब जानकर तालुका आरोग्य अधिकारी यांचे आवाहन

**तभा वृत्तसेवा,**
**माळशिरस, दि. १५ एप्रिल-**

सध्या सर्वत्र उष्णतेची लाट येत असून तापमानात सातत्याने वाढ होत असल्याचे आढळून येत आहे तरी तालुक्यातील सर्व जनतेने आपले उष्माघाता पासून काळजी घेणे गरजेचे आहे. कारण सध्या आपल्या जिल्ह्यात ३६ अंश सेल्सिअस इतके तापमान दिसत असून पुढे यामध्ये वाढ होण्याची शक्यता असल्याने नागरिकांनी काळजी घ्यावी, असे आवाहन डॉ भाऊसाहेब जानकर तालुका आरोग्य अधिकारी पंचायत समिती यांनी केले आहे.

उष्माघाताची लक्षणे : डोके दुखणे,मळमळ होणे, थकवा,मानसीक स्थिती मध्ये बदल होणे, चक्कर येणे, अस्पष्ट बोलणे, अंधुक दिसणे, शरीराचे तापमान १०४ फॅरनहाइट पेक्षा जास्त असणे अशी लक्षणे दिसून आली तर डॉक्टराचा सल्ला घ्यावा.

कोणती काळजी घ्यावी : भरपूर पाणी प्यायला हवं, उन्हात फिरणे टाळा,अत्यंत गरजेचे काम असल्यास उन्हात जाताना टोपी किंवा टॉवेल यांचा वापर करावा, कुलर,पंखे, ए सी च वापर करण्यात यावा, दुपारी १२ ते ३ वाजे पर्यंत कष्टाचे काम टाळावे, हलके व पातळ कपडे व शक्यतो पांढरी कपडे वापरावीत, दर अर्ध्या तासाने पाणी पित राहवे, शिळे अन्न खाणे टाळा, ओ आर एस, लिंबू पाणी, ताक घ्या, घर थंड राहिले याची खबरदारी घ्यावी. सर्वांनी आपली व आपल्या कुटुंबाची काळजी घ्यावी गरजेचं असल्यास त्वरित डॉक्टर यांचेकडे जाऊन तपासणी करून सल्ला घ्यावा. सर्व प्रा आ केंद्रांमध्ये उष्माघात कक्ष स्थापन करण्यात आला आहे.

# शिवसेनेचे दबावतंत्र फसले, स्वकीयांमुळेच माघार

### ● झेडपी विषय समिती निवडीत घडल्या नाट्यमय घडामोडी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १५ एप्रिल-**

जिल्हा परिषद विषय समिती सदस्य निवडीदरम्यान सोलापूरमध्ये राजकीय घडामोडींना चांगलाच वेग आला. अक्कलकोट तालुक्यातील शिवसेना (शिंदे गट) सदस्यांनी स्थायी, बांधकाम व समाजकल्याण समित्यांमध्ये स्थान मिळवण्यासाठी भाजपवर दबावतंत्र वापरण्याचा प्रयत्न केला; मात्र स्वकीय सदस्यांनीच साथ न दिल्याने अखेर त्यांना माघार घ्यावी लागली. परिणामी, मिळेल ती समिती स्वीकारत बंडाचे शस्त्र म्यान करण्याची वेळ या सदस्यांवर आली.

बुधवारी विषय समित्यांच्या निवडी पार पडल्या. निवड प्रक्रियेपूर्वी अनेक नाट्यमय घडामोडी घडल्या. जिल्हा परिषदेत भाजपचे स्पष्ट बहुमत असल्याने मित्रपक्ष म्हणून शिवसेना (शिंदे गट) सदस्यांना समित्यांमध्ये स्थान देण्याचा निर्णय घेण्यात आला होता. मात्र अक्कलकोट तालुक्यातील शिवराज म्हेत्रे आणि प्रवीण तानवडे यांनी स्थायी, बांधकाम आणि समाजकल्याण या महत्त्वाच्या समित्यांवरच आग्रह धरला. भाजपकडून



'देण्यात येईल ती समिती स्वीकारा' अशी भूमिका स्पष्ट करण्यात आली होती. तरीही या दोन्ही सदस्यांनी भाजपच्या भूमिकेला विरोध करत अर्ज भरण्याची तयारी दर्शविल्याने राजकीय वातावरण तापले होते.

दरम्यान, निवडणूक होण्याची शक्यता निर्माण झाली. दुपारी दोन वाजता सभा होणार होती; मात्र कोरम अभावी ती साडेतीन वाजेपर्यंत पुढे ढकलण्यात आली. या कालावधीत शहरातील हॉटेल बालाजी सरोवर येथे भाजपच्या नेत्यांची महत्त्वाची बैठक झाली. आमदार सचिन कल्याणशेट्टी, जिल्हाध्यक्ष शशिकांत चव्हाण यांच्यासह अध्यक्ष दीपक वैद्य, उपाध्यक्ष इंद्रजित पवार आणि सभागृहनेत्या रश्मी बागल हे नेते पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्या संपर्कात राहून पुढील रणनीती आखत होते. निवडणूक लागण्याचा अंदाज लक्षात घेऊन भाजपने जोरदार तयारी केली. जिल्हा परिषदेतील ६८ सदस्यांपैकी सुमारे ६० सदस्यांचे समर्थन मिळवत भाजपने आपली बाजू भक्कम केली. शिवसेना (शिंदे गट) मधील इतर सदस्यांनीही म्हेत्रे आणि तानवडे यांची साथ सोडून भाजपकडे झुकते माप दिले. परिणामी, या दोघांकडे आवश्यक पाठिंबा उरला नाही. निवडणूक झाली असती तर भाजपचे सर्व उमेदवार विजयी झाले असते आणि शिवसेना (शिंदे गट) ची मोठी नामुष्की झाली असती. ही शक्यता लक्षात घेऊन अखेर शिंदे गटाने एक पाऊल मागे घेत बंड म्यान केले. या संपूर्ण घडामोडीत सभागृहनेत्या रश्मी बागल यांची मध्यस्थी निर्णायक ठरली. शेवटी झालेल्या समझोत्यानुसार शिवराज म्हेत्रे यांना शिक्षण व कृषी समितीवर, तर प्रवीण तानवडे यांना अर्थ समितीवर स्थान देण्यात आले. एकंदरीत, विषय समिती निवड प्रक्रियेदरम्यान शिवसेनेचे दबावतंत्र अपयशी ठरल्याचे स्पष्ट झाले, तर स्वकीयांच्या असहकार्यामुळेच संबंधित सदस्यांना माघार घ्यावी लागल्याचे या संपूर्ण राजकीय घडामोडीतून अधोरेखित झाले.



# राहिलेले २० टक्के कागदपत्र स्कॅनिंग करुन अनावश्यक कागदपत्रे नष्ट करा

### अतिरिक्त आयुक्त पवार यांनी केली अभिलेखापाल कार्यालयाची पाहणी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १५ एप्रिल-**

महापालिकेच्या अतिरिक्त आयुक्त वीणा पवार यांनी आज सायंकाळी महापालिका प्रशासकीय इमारतीतील अभिलेखापाल कार्यालयाची पाहणी केली.

राहिलेले २० टक्के कागदपत्र स्कॅनिंग करून घ्यावेत. अनावश्यक कागदपत्रे नष्ट करण्याच्या सूचना त्यांनी यावेळी संबंधित कर्मचाऱ्यांना दिल्या. सोलापूर महापालिका अतिरिक्त आयुक्त वीणा पवार यांनी आज सायंकाळी पाचच्या सुमारास अभिलेखापाल कार्यालयाची पाहणी केली. पूर्ण व अपूर्ण कामांची माहिती घेतली. ठेवलेले रजिस्टर पाहिले. या कार्यालया अंतर्गत देण्यात येत असलेल्या नागरिकांसाठीच्या सेवा तातडीने सुलभपणे उपलब्ध करण्याच्या सूचना दिल्या. या अभिलेखापाल कार्यालयात असलेल्या जन्म-मृत्यू रजिस्टर व इतर कागदपत्रे स्कॅनिंगची सुमारे ८० टक्के कामे पूर्ण झाली आहेत. उर्वरित २० टक्के स्कॅनिंगचे काम करण्याच्या सूचना कर्मचाऱ्यांना दिल्या. या कार्यालयातील सूचनाफलक मजकुरात दुरुस्ती करून योग्य स्वरूपात करण्यास सांगितले. त्यानंतर त्यांनी शेजारीच असलेल्या रूमची पाहणी केली.

या ठिकाणी मोठ्या प्रमाणात अनावश्यक असलेली कागदपत्रे अस्ताव्यस्त पडलेली दिसून आली. तातडीने ही अनावश्यक कागदपत्रे नष्टीकरण करण्याचे सूचित केले. यावेळी अभिलेखापाल कार्यालयातील लिपिक संजय सावळगी, कविता गाडेकर, नंदा कुमार, राजू बाभळे आदी कर्मचारी उपस्थित होते.



# अकलूजचा रचित फडे मंथन परीक्षेत जिल्ह्यात तिसरा व राज्यात आठवा

**तभा वृत्तसेवा,**
**अकलूज, दि १५ एप्रिल-**

शिक्षण प्रसारक मंडळाच्य सदाशिवराव माने विद्यालय प्राथमिक शाळेतील इयत्ता पहिलीतील विद्यार्थी रचित आलोक फडे याने मंथन सामान्य ज्ञान (जनरल नॉलेज) परीक्षेमध्ये सोलापूर जिल्ह्यात तिसरा व राज्यात आठव्या क्रमांकाने उत्तीर्ण झाला.

या यशाबद्दल प्रशालेच्या मार्गदर्शिका सौ.सुलक्षणादेवी मोहिते पाटील, सभापती कु.स्वरुपाराणी मोहिते पाटील यांनी त्यांचा सत्कार केला.या वेळी प्रताप क्रीडा मंडळाचे माजी खजिनदार व रचितचे आजोबा विजय दोशी, रचितच्या आई नेहा फडे उपस्थित होते. मंथन ही जनरल नॉलेजची परीक्षा राज्य पातळीवर होऊन ती १५० गुणांची होती. रचित फडे याने १३६ गुण मिळवून जिल्ह्यात तिसरा व राज्य पातळीवर आठव्या क्रमाने उत्तीर्ण होऊन स्पर्धेत बाजी मारली. या यशा बद्दल संस्थेचे जेष्ठ मार्गदर्शक संचालक जयसिंह मोहिते पाटील, अध्यक्ष संग्रामसिंह मोहिते पाटील, सचिव अभिजीत रणवरे, सहसचिव हर्षवर्धन खराडे पाटील,सर्व संचालक मंडळ, स्थानिक प्रशाला समिती सर्व सदस्या, मुख्याध्यापिका नुरजहॉं शेख यांनी रचित फडे व पालकाचे अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या.

### संजय गांधी निराधार योजनेची १८८ प्रकरणे मंजूर

**तभा वृत्तसेवा,**
**मंगळवेढा दि. १५ एप्रिल-**

मंगळवेढा तालुक्यातील संजय गांधी निराधार योजनेचे सन २०२५ मधील शेवटची मिटींग दि.३० मार्च रोजी होवून या मध्ये १८८ प्रकरणे मंजूर करण्यात आली. दरम्यान ही मिटींग तहसिलदार मदन जाधव यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. यामध्ये १८८ प्रकरणे मंजूर करण्यात आली. श्रावण बाळ योजनेची १०५ प्रकरणे, संजय गांधी योजनेचे ८३ असे एकूण १८८ प्रकरणे या बैठकीत मंजूर करण्यात आल्याचे सांगण्यात आले. यासाठी सहाय्यक महसूल अधिकारी कविता कुरी, महसूल नायब तहसीलदार शितल कणेरे, महसूल सहाय्यक अमित गायकवाड आदींनी परिश्रम घेतले.



# खाऊच्या पैशातून शाळेला दिले भिंतीवरील आठ घड्याळ भेट

### चौथीतील आरोहीने जपली सामाजिक बांधिलकी

**तभा वृत्तसेवा**
**अक्कलकोट दि १५ एप्रिल**

के. एल. ई. बालसंस्कार केंद्र व कन्नड प्राथमिक शाळा येथे इयत्ता चौथी निरोप समारंभ संपन्न झाला. कुमारी आरोही ज्ञानेश्वर भोसले हीने खाऊसाठी दिसलेल्या बचतीमधून भिंतीवरील आठ घड्याळ सप्रेम भेट दिल्याने तिचे कौतुक होत आहे.

यावेळी व्यासपीठावर प्रमुख अतिथी म्हणून नगरपालिका शिक्षण मंडळाचे प्रशासन अधिकारी सोनशेखर स्वामी साहेब व मंगरूळे प्रशालेचे जेष्ठ प्राध्यापक रामनगौडा पाटील उपस्थित होते. प्रारंभी प्रमुख अतिथी व कार्यक्रमाचे अध्यक्षा अश्विनी सुभाषचंद्र वाले (मुख्याध्यापिका, बालसंस्कार केंद्र) सुजाता बाबुराव नरोणे यांच्या हस्ते सरस्वती मातेचे प्रतिमा पूजन व दीप प्रज्वलन करण्यात आले. याप्रसंगी मुख्याध्यापिका मीनाक्षी पाटील या उपस्थित होत्या. कार्यक्रमाची सुरुवात तिसरीच्या विद्यार्थिनींनी नृत्यपर स्वागतगीतातून अतिथींचे स्वागत केले. वर्गशिक्षक खंडेराव व्हडले व वर्गशिक्षिका सुरेखा कालीबत्ते यांनी यावेळी मनोगत व्यक्त केले. सूत्रसंचालन कुमार पवनकुमार बेंद्रे व अरोही भोसले, अमृता तंबाके यांनी केले. आभार आराध्या उपिन हिने मानले.

# बदामाच्या झाडाला गळफास घेऊन कामगाराची आत्महत्या

**सोलापूर, दि. १५ एप्रिल-**

अज्ञात कारणावरून पश्चिम बंगाल राज्यातील एका २५ वर्षीय कामगाराने बदामच्या झाडाला दोरीच्या सहाय्याने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना दक्षिण सोलापूर तालुक्यातील मुळेगाव तांडा येथील सोनअंकुर कत्तलखान्याच्या आवारातील गार्डनमध्ये आज बुधवारी सकाळ ९ वा .च्या सुमारास उघडकीस आली. एम.डी.सलीम काजीपारा (वय २५ वर्ष , रा कालीगाव मालदा ,राज्य पश्चिम बंगाल. सध्या राहणार मुळेगाव कत्तलखाना) असे आत्महत्या केलेल्या तरुणाचे नाव आहे. मयत एम.डी.सलीम हा अविवाहीत असून कत्तलखान्यात आचारीचे काम करीत होता. आज बुधवारी सकाळी नऊ वाजेच्या सुमारास त्याचा मृतदेह झाडाला दोरीच्या सहाय्याने गळफास घेतलेल्या अवस्थेत कत्तलखान्याच्या आवारातील बागेत स्थानिक लोकांना आढळून आला . ही खबर सोलापूर तालुका पोलिसांना समजली असता फौजदार फैयाज एम. बागवान यांनी घटनास्थळी पोहोचून सदरचा मृतदेह लोकांच्या मदतीने खाली उतरवून येथील शासकीय रुग्णालयात शवविच्छेदनासाठी दुपारी बारा वाजता दाखल केला.



# बिहारच्या तरुणाची टेक्सटाईल कारखान्यात आत्महत्या

**सोलापूर, दि. १५ एप्रिल-**

अज्ञात कारणावरून बिहार राज्यातील एका २० वर्षीय तरुण कामगाराने कारखान्यातील लोखंडी अँगलला कापडी पट्टीने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना दक्षिण सोलापूर तालुक्यातील कुंभारी येथील श्रीनिवास टेक्स्टाईलच्या पत्राशेडमध्ये आज बुधवारी सकाळी १० वा .च्या सुमारास उघडकीस आली. बिहारीदास विलासदास (वय २० वर्ष रा.लकडा थाना, रजोन बिहार. सध्या राहणार श्रीनिवास टेक्स्टाईल कुंभारी ता.दक्षिण सोलापूर) असे गळफास घेतलेल्या तरुणाचे नाव आहे. मयत बिहारीदास हा त्यांच्या गावातील इतर कामगारांसोबत श्रीनिवास टेक्स्टाईल येथे राहण्यास होता. बुधवारी सकाळी तो आपल्या सहकाऱ्यासोबत नाश्ता करून कारखान्यात कामाला गेला होता. त्यानंतर तो दहा वाजेच्या सुमारास बाहेर येऊन पत्राशेटमध्ये गेला आणि थोड्या वेळाने त्याचा मृतदेह गळफास घेतलेल्या अवस्थेत कारखान्याच्या पत्रा शेडमध्ये आढळून आला. ही खबर वळसंग पोलिसांना समजली असता हवालदार आर.डी. बनकर यांनी घटनास्थळी पोहोचून सदरचा मृतदेह इतरांच्या साह्याने खाली उतरवून येथील शासकीय रुग्णालयात शवविच्छेदनासाठी दुपारी १२.३० वाजता दाखल केला.

# वाहन धडकेत पादचारी वृध्दाचा मृत्यू; गुन्हा दाखल

**सोलापूर, दि. १५ एप्रिल-**

रस्ता क्रॉस करणाऱ्या एका पादचारी वृद्धाला धडक देऊन त्याच्या मृत्यूस कारणीभूत ठरल्या प्रकरणी एका दुचाकी स्वाराविरुद्ध विजापूर नाका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

अब्दुल रहीब अब्दुल जबार रंगरेज, (वय -२१ वर्षे, रा आंबेडकर नगर, होटगी रोड सोलापूर) असे गुन्हा दाखल करण्यात आलेल्या आरोपी दुचाकी स्वाराचे नाव असून याबाबत मयत व्यक्तीचा मुलगा विवेकानंद श्रीशैल वाले (वय-४८ वर्षे, रा-घर नं ४५ अ, दत्त नगर कुमठेकर हॉस्पिटल जवळ, जुळे सोलापूर) यांनी फिर्याद दिली आहे. यातील फिर्यादीचे वडील श्रीशैल अडव्यप्पा वाले (वय-७८ वर्षे) हे दि १८ मार्च २०२६ रोजी विजापूर महामार्गावरील सैफुल पोलीस चौकी समोरील रस्ता क्रॉस करताना वरील आरोपी दुचाकी स्वाराने त्याच्या ताब्यातील मो.सायकल (क्र एमएच ०५ डी टी ०५३६) फिर्यादीच्या वडीलास जोराची धडक देवून गंभीर दुखापत करून मरणास कारणीभूत झाल्याचे फिर्यादीत म्हटले आहे. पोलीस हवालदार घुगे हे गुन्ह्याचा पुढील तपास करीत आहेत.





अलिकडच्या काळात प्रणिती शिंदे यांच्या वक्तव्याचे कौतुक वाटते आहे. त्या असे का वागत आहेत? असे का बोलत आहेत, हे कळायला मार्ग नाही? जसा काँग्रेसच्या विचारांचा ऱ्हास झाला आहे तसाच खासदार प्रणिती शिंदे यांच्या विचारांचाही ऱ्हास झाला आहे.
**-जयकुमार गोरे**, मंत्री

तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
सोलापूर, गुरुवार, १६ एप्रिल २०२६ 



४०० विधानसभा सदस्यांना मुंबईच्या विधान भवनात बसण्यासाठी जागा नाही. मग आम्ही विदर्भातले नागपुरात बसतो, तुम्ही मुंबईत बसा, अशा पद्धतीने महाराष्ट्राच्या फाळणीची मुहूर्तमेढ तर रोवली जाणार नाही ना? अशी भीती जनतेच्या मनात आहे.
**-संजय राऊत**, उबाठा खासदार

# रोहिंग्या-बांगलादेशींची नौका अंदमान समुद्रात बुडाली

## २५० बेपत्ता; मलेशियाला जाताना अपघात



**◆ ढाका, १५ एप्रिल**
अंदमान समुद्रात अलिकडेच मलेशियाच्या दिशेने जाणारी नौका उलटल्याने रोहिंग्या निर्वासित आणि बांगलादेशी नागरिकांसह किमान २५० लोक बेपत्ता झाले, अशी माहिती संयुक्त राष्ट्रांच्या निर्वासित आणि स्थलांतर संस्थांनी दिली.

९ एप्रिल रोजी तीन रोहिंग्या आणि सहा बांगलादेशी नागरिकांसह नऊ जणांची सुटका करण्यात आली, असे बांगलादेश तटरक्षक दलाचे प्रवक्ते लेफ्टनंट कमांडर सब्बीर आलम सुझान यांनी बुधवारी वृत्तसंस्थेला सांगितले. नौका उलटल्यावर हे नऊ जण समुद्रात तरंगताना बांगलादेशचा ध्वज धारण करणाऱ्या एम. टी. मेघना प्राईड या जहाजावरील कर्मचाऱ्यांना आढळले. त्यानंतर त्यांनी या सर्वांची सुटका केली.

बोट बुडाली तेव्हा बुधवारी कोणत्याही शोधमोहिमेची स्थिती अस्पष्ट होती. बांगलादेशच्या दक्षिणेकडील कॉक्स बाजार जिल्ह्यातील टेकनाफ येथून मोठ्या संख्येने प्रवासी घेऊन जाणारा एक ट्रॉलर मलेशियाच्या दिशेने रवाना झाला, असे संयुक्त राष्ट्रांचे निर्वासित उच्चायुक्त आणि आंतरराष्ट्रीय स्थलांतर संघटनेने निवेदनात म्हटले आहे.

अतिगर्दी, सोसाट्याचा वारा आणि खवळलेला समुद्र यामुळे जहाजावरील नियंत्रण सुटले आणि ते बुडाले, असे संबंधित संस्थांनी सांगितले. या संस्थेकडे इतर कोणतीही अद्ययावत माहिती उपलब्ध नाही, असे कॉक्स बाजार येथील यूएनएचआरसीच्या संवाद अधिकारी शारी निजमन यांनी बुधवारी सांगितले. हा भीषण अपघात रोहिंग्यांचे दीर्घकालीन विस्थापन आणि शाश्वत उपायांचा अभाव दर्शवणारा असल्याचे यूएनएचसीआर आणि आयओएमने म्हटले आहे. म्यानमारमधून आलेल्या दहा लाखांपेक्षा जास्त रोहिंग्यांना आश्रय देणाऱ्या बांगलादेशातील रोहिंग्या निर्वासितांना जीवनरक्षक मदत सुनिश्चित करण्यासाठी निधी आणि एकता अधिक मजबूत करावी, असे आवाहन यूएनएचसीआर आणि आयओएम यांनी केले आहे.
◂(वृत्तसंस्था)

### वाचलेल्यांमध्ये आठ पुरुष, एक महिला


**» वाचवलेल्या नऊ जणांमध्ये आठ पुरुष आणि एका महिलेचा समावेश आहे. त्यांना कोस्ट गार्डकडे सोपवण्यात आले. त्यानंतर कोस्ट गार्डने टेकनाफ येथील पोलिसांच्या स्वाधीन केले. हे ठिकाण बांगलादेशच्या हद्दीबाहेर असल्याने ही बचाव मोहीम कोणत्याही अधिकृत शोधमोहिमेचा भाग नव्हती. या व्यतिरिक्त बांगलादेशातील चितगाव येथून इंडोनेशियाच्या दिशेने प्रवास करीत असताना एम. टी. मेघना प्राईड या जहाजावरील कर्मचाऱ्यांनी या लोकांना वाचवले, अशी माहिती संबंधित अधिकाऱ्यांनी दिली.** ■

### रोहिंग्यांचा खोट्या आश्वासनांवर विश्वास

**» म्यानमारच्या रखाईन राज्यात सुरू असलेल्या हिंसाचारामुळे रोहिंग्यांचे म्यानमारमध्ये सुरक्षित पुनरागमन अनिश्चित बनले आहे. दुसरीकडे निर्वासित छावण्यांमध्ये मिळणारी मर्यादित मानवतावादी मदत तसेच शिक्षण आणि रोजगाराच्या संधीवर असलेली बंधने विशेषतः विदेशात अधिक वेतन आणि उत्तम संधी मिळतील या खोट्या आश्वासनांवर विश्वास ठेवून अत्यंत असुरक्षित स्थितीत असलेल्या रोहिंग्या निर्वासितांना धोकादायक सागरी प्रवासाचा मार्ग निवडण्यास भाग पाडत आहे.** ■



कर्नाटकातील मंड्या जिल्ह्यात असलेल्या आदिचुंचनगिरी मठात श्री गुरू भैरवैक्य मंदिराचे उद्घाटन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते बुधवारी झाले. याप्रसंगी पंतप्रधानांच्या हस्ते 'सौंदर्य लहरी और शिव महिम्न स्तोत्रम्' या पुस्तकाचे विमोचन करण्यात आले



# युद्धात इराणला चीनची मदत

## उपग्रहाच्या मदतीने शत्रूवर बॉम्बवर्षाव

**◆ कैरो, १५ एप्रिल**
पश्चिम आशियातील अलिकडील युद्धाच्या पृष्ठभूमीवर इराणच्या सैन्य क्षमतेबाबत एक महत्त्वपूर्ण आणि धक्कादायक माहिती समोर आली आहे. या युद्धादरम्यान इराणने अत्यंत गोपनीय पद्धतीने चीनचा एक हेरगिरी उपग्रह मिळवला आणि त्या माध्यमातून त्याने संपूर्ण परिसरातील अमेरिकी सैन्यतळांवर नजर ठेवली तसेच हल्ल्यांसाठी धोरणात्मक माहिती मिळवली.

इराणने चीनचा टीईई-०१ बी नावाच्या उपग्रहाचा वापर केला. या उपग्रहाची निर्मिती चिनी कंपनी अर्थ आय को. ने केली असून, चीननेच तो प्रक्षेपित केला होता. २०२४ च्या अखेरीस हा उपग्रह इराणच्या इस्लामिक रिव्हॉल्युशनरी गार्ड कॉर्प्सच्या एयरोफोर्सने नियंत्रणात घेतला होता. आयआरजीसीच्या कमांडर्सने या उपग्रहाला थेट निर्देश देत पश्चिम आशियात उपस्थित अमेरिकेच्या मुख्य सैन्य ठिकाणांवर नजर ठेवली होती, असे इराणी सैन्याच्या फुटलेल्या दस्तावेजांत म्हटले आहे. दस्तावेजांमध्ये को-ऑर्डिनेट्स, सॅटेलाईट इमेजरी, ऑर्बिटल विश्लेषणाचा समावेश आहे. अमेरिकी लष्करी तळांवर पद्धतशीरपणे तसेच सुनियोजित पाळत ठेवण्यात आल्याचे संकेत या माध्यमातून मिळाले.

ज्या सैन्य ठिकाणांवर हल्ला त्या ठिकाणांची छायाचित्रे उपग्रहाने मार्च महिन्यात घेतली होती. हल्ल्यांपूर्वी आणि हल्ल्यांनंतरही छायाचित्रांचे विश्लेषण करण्यात आले. या माध्यमातून इराणी अधिकाऱ्यांनी हल्ले कितपत प्रभावी ठरले, हे जाणून घेतले. या करारान्वये इराणला उपग्रह नियंत्रण आणि माहिती देणारी कंपनी ॲम्पोसेटच्या व्यावसायिक ग्राऊंड स्टेशन्सपर्यंत जाण्याची परवानगी देण्यात आली होती. या ग्राऊंड स्टेशन्सचे नेटवर्क आशिया, लॅटिन अमेरिका आणि इतर क्षेत्रात विस्तारलेले आहे. या माध्यमातून उपग्रह परिचालन आणि डेटा ट्रान्मिशनमध्ये इराणला मोठी तांत्रिक आघाडी मिळाली.
◂(वृत्तसंस्था)

### चीन, अमेरिकेकडून अद्याप प्रतिक्रिया नाही

**» या व्यतिरिक्त उपग्रहाच्या मदतीने मुवफ्फाक साल्टी वायुतळ, बहरीनची राजधानी मनामाजवळील अमेरिकेच्या पाचव्या आरमाराच्या जवळची ठिकाणे आणि इराकच्या एरबिल विमानतळाच्या जवळपासही इराणने नजर ठेवली होती. मात्र, या प्रकरणी अद्याप व्हाईट हाऊस, पेंटॅगॉन, सीआयए, चीनचे परराष्ट्र मंत्रालय आणि संरक्षण मंत्रालय, अर्थ आय को, ॲम्पोसेट यांनी कोणतीही प्रतिक्रिया व्यक्त केलेली नाही.** ■

### प्रिन्स सुल्तान वायुतळाच्या विध्वंसासाठीही मदत

**» उपग्रहाने घेतलेल्या छायाचित्रांत सौदी अरबमधील प्रिन्स सुल्तान वायुतळाचाही समावेश आहे. या तळाची छायाचित्रे १३,१४ आणि १५ मार्चला घेण्यात आली. या तळावरील अमेरिकेच्या विमानांचे नुकसान झाले, अशी कबुली अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी १४ मार्च रोजी दिली होती.** ■

# आप नेते राघव चढ्ढा यांना केंद्रीय सुरक्षा कवच

## पंजाब सरकारने काढली होती झेड प्लस सुरक्षा

**◆ नवी दिल्ली, १५ एप्रिल**
आम आदमी पक्षाचे राज्यसभा सदस्य राघव चड्ढा यांना पंजाब सरकारने दिलेली झेड प्लस सुरक्षा गेल्या आठवड्यात काढून घेतली. त्यानंतर केंद्रीय गृहमंत्रालयाने त्यांना सुरक्षा प्रदान करण्याचा निर्णय बुधवारी घेतला आहे. जोपर्यंत औपचारिक केंद्रीय व्यवस्था निश्चित होत नाही, तोपर्यंत त्यांच्या सुरक्षेची जबाबदारी दिल्ली पोलिसांना देण्यात आली आहे.

पंजाबमधून राज्यसभेचे खासदार म्हणून निवडून आल्यापासून चड्ढा यांना पंजाब सरकारकडून सर्वोच्च स्तराची झेड प्लस सुरक्षा पुरवण्यात आली होती. पंजाब सरकारने सुरक्षा काढून घेतल्यानंतर, आता त्यांना केंद्रीय सुरक्षा कवच पुरवण्यात आले आहे. राघव चड्ढा यांना नुकतेच राज्यसभेतील आम आदमी पक्षाच्या उपनेतेपदावरून हटवण्यात आले होते. पक्षाच्या या निर्णयावर प्रतिक्रिया देताना त्यांनी आवाज दाबण्यात आला आणि आपला पराभव झालेला नाही अशी प्रतिक्रिया दिली होती. त्यानंतर पक्षातील अंतर्गत कलहातूनच त्यांची सुरक्षा हटवण्यात आल्याचे बोलले जात आहे.
◂(वृत्तसंस्था)

# भारताने उधळला पाकिस्तानी क्षेपणास्त्र चाचणीचा डाव

## क्षेपणास्त्रांचा माग काढणारी युद्धनौका केली तैनात

**◆ नवी दिल्ली, १५ एप्रिल**
अरबी समुद्रात भारताने पाकिस्तानच्या हालचालीला चोख प्रत्युत्तर दिले आहे. पाकिस्तान एका गुप्त क्षेपणास्त्राची चाचणी करण्याच्या तयारीत असतानाच, भारतीय नौदलाने आपले अत्याधुनिक क्षेपणास्त्रांचा माग काढणारी आयएनएस ध्रुव युद्धनौका अरबी समुद्रात उतरवली. यामुळे पाकिस्तानची रणनीती अपयशी ठरली.

पाकिस्तानने १४ आणि १५ एप्रिल दरम्यान कराची, ओरमारा, ग्वादर आणि सोनमियानी या किनारपट्टीजवळच्या विस्तीर्ण सागरी क्षेत्रात सागरी इशारा जारी केला होता. सुमारे ४१५ ते ४५० किलोमीटरचा परिसर प्रतिबंधित क्षेत्र म्हणून घोषित करण्यात आला होता. कोणत्याही क्षेपणास्त्र किंवा लष्करी चाचणीपूर्वी तांत्रिक भाषेत असा नोटम जारी केला जातो.

पाकिस्तानच्या या संशयास्पद हालचालींचा सुगावा लागताच भारतीय नौदलाने अत्यंत वेगाने हालचाली केल्या. पाकिस्तानने जाहीर केलेल्या वेळेच्या तब्बल २४ तास आधी, म्हणजेच १३ एप्रिल रोजीच भारताने आयएनएस ध्रुव अरबी समुद्रात तैनात केली. शत्रूच्या क्षेपणास्त्रांचा मागोवा घेण्याची विशेष क्षमता या युद्धनौकेत आहे.

पाकिस्तान सैन्याने नोटम जारी करण्यामागची आपली योजना स्पष्ट केलेली नाही. तज्ज्ञांच्या मते, पाकिस्तान एक तर जमिनीवरून जमिनीवर मारा करणाऱ्या क्षेपणास्त्राची किंवा लांब पल्ल्याच्या समुद्रातून डागल्या जाणाऱ्या नौदल प्रणालीची चाचणी घेण्याच्या तयारीत होता.
◂(वृत्तसंस्था)

### विमानतळावर सात किलो ब्राऊन शुगर जप्त, एक अटकेत

**◆ इम्फाळ, १५ एप्रिल**
मणिपूरमधील इम्फाळ विमानतळावरून सुरक्षा दलांनी सात किलो ब्राऊन शुगर जप्त केली यासह एकाला अटक केल्याची माहिती पोलिसांनी बुधवारी दिली. माहितीच्या आधारे मंगळवारी सकाळी १०:३० च्या सुमारास आरोपीला ताब्यात घेण्यात आले, असे त्यांनी सांगितले.

त्याच्या चेक-इन बॅगेजची तपासणी केली असता, सहा कंटेनरमध्ये लपवलेली अंदाजे ६.७४ किलो संशयित ब्राऊन शुगर आढळून आली आणि जप्त करण्यात आली, या प्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे, असे पोलिसांच्या निवेदनात म्हटले आहे.
◂(वृत्तसंस्था)

# सोलापूर जिल्हा परिषदेचे नूतन सीईओ कुशल जैन

## कुलदीप जंगम यांची पिंपरी-चिंचवड येथे बदली



कुलदीप जंगम



कुशल जैन

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि.१५ एप्रिल-**
सोलापूर जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम यांची पिंपरी-चिंचवड येथे अप्पर आयुक्तपदी बदली करण्यात आली आहे. त्यांच्या जागी युवा आयएएस अधिकारी कुशल जैन यांची नियुक्ती होत असून, जिल्हा परिषदेच्या प्रशासनात आता नव्या नेतृत्वाची सुरुवात होत आहे. कुलदीप जंगम यांनी सोलापूर जिल्हा परिषदेत आपल्या कार्यकाळात प्रशासनाला गती देत विविध विकास कामांमध्ये महत्त्वपूर्ण योगदान दिले. विशेषतः आपत्कालीन परिस्थितींमध्ये त्यांनी दाखवलेली तत्परता आणि समन्वय कौशल्य उल्लेखनीय ठरले.

पूरपरिस्थितीच्या काळात त्यांनी केलेले नियोजन, मदतकार्याची अंमलबजावणी आणि विविध यंत्रणांमध्ये साधलेला समन्वय यामुळे नागरिकांना मोठा दिलासा मिळाला होता. त्यांच्या नेतृत्वाखाली जिल्हा परिषदेच्या अनेक योजनांना गती मिळाली आणि प्रशासन अधिक परिणामकारक झाले.

जंगम यांच्या कार्याची दखल राज्य शासनाने घेत त्यांना 'सेवा कर्म पुरस्कार' देऊन गौरविण्यात आले होते. त्यांच्या बदलीमुळे जिल्हा परिषदेतील एक सक्षम आणि अनुभवी अधिकारी पुढील जबाबदारीकडे जात असल्याची भावना व्यक्त केली जात आहे. पिंपरी-चिंचवड येथे अप्पर आयुक्त म्हणून ते नवे आव्हान स्वीकारणार असून, त्यांच्या अनुभवाचा तेथेही उपयोग होईल, अशी अपेक्षा आहे. दरम्यान, सोलापूर जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांची धुरा आता युवा आयएएस अधिकारी कुशल जैन यांच्या हाती येणार आहे. २०२१ च्या नागरी सेवा परीक्षेत अखिल भारतीय स्तरावर ४० वा क्रमांक मिळवत त्यांनी प्रशासकीय सेवेत प्रवेश केला. शैक्षणिकदृष्ट्या ते माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातील पार्श्वभूमी असलेले अधिकारी असून, बंगळुरू येथील आर. व्ही. कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगमधून त्यांनी इन्फॉर्मेशन सायन्स अँड इंजिनिअरिंगमध्ये पदवी घेतली आहे. नागरी सेवेत येण्यापूर्वी त्यांनी मायक्रोसॉफ्ट इंडियामध्ये सुमारे दीड वर्ष कामाचा अनुभव घेतला आहे. त्यामुळे प्रशासनात आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून कार्यपद्धती अधिक सक्षम करण्याची त्यांची क्षमता मानली जाते. २०२२ बॅचचे आयएएस अधिकारी असलेल्या जैन यांना सुरुवातीला आंध्र प्रदेश कॅडर मिळाले होते; मात्र २०२३ मध्ये त्यांनी महाराष्ट्र कॅडरच्या आयपीएस अधिकारी वृष्टी जैन यांच्याशी विवाह केल्यानंतर आंतर-कॅडर बदलीद्वारे महाराष्ट्र कॅडर स्वीकारले. सध्या ते गडचिरोली जिल्ह्यातील अहेरी येथे उपविभागीय अधिकारी (एसडीओ) म्हणून कार्यरत असून, यापूर्वी रायगड जिल्ह्यातील रोहा येथे सहाय्यक जिल्हाधिकारी म्हणून त्यांनी काम पाहिले आहे. दुर्गम आणि संवेदनशील भागात काम करण्याचा त्यांना अनुभव असल्याने सोलापूरसारख्या मोठ्या जिल्ह्यातील प्रशासन हाताळताना त्याचा उपयोग होण्याची शक्यता आहे.

कुलदीप जंगम यांच्या अनुभवी नेतृत्वानंतर आता कुशल जैन यांच्या रूपाने युवा, तांत्रिक दृष्टिकोन असलेले नेतृत्व सोलापूर जिल्हा परिषदेला लाभत आहे. त्यामुळे आगामी काळात विकासकामांना वेग मिळून प्रशासनात नव्या कार्यशैलीचा अवलंब होईल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# उमर यांनी दिला तिरंगी फीत कापायला नकार

## आयोजकांना जपून ठेवण्यास सांगितले

**◆ श्रीनगर, १५ एप्रिल**
एका उद्घाटन समारंभादरम्यान, केशरी, पांढऱ्या आणि हिरव्या पट्ट्यांनी बनलेली फीत समोर आल्यावर, जम्मू-काश्मीरचे मुख्यमंत्री उमर अब्दुल्ला यांनी ती कापण्यास नकार दिला. त्याऐवजी त्यांनी ती फित सोडवली आणि आयोजकांच्या स्वाधीन करताना, तिचा आदरपूर्वक सांभाळ केला जावा अशी सूचना दिली.

अब्दुल्ला हे येथे काश्मीर हाटमध्ये आयोजित नो युअर आर्टिसन्स या कार्यक्रमाचे उद्घाटन करत होते. कॅमेरा पथकांनी टिपलेला आणि समाज माध्यमांवर वेगाने व्हायरल झालेला एक प्रसंग यावेळी घडला. यामध्ये मुख्यमंत्री समोर ताणलेल्या रिबनच्या दिशेने चालत जाताना दिसले, मात्र त्या रिबनवर तिरंग्याचे रंग असल्याचे लक्षात येताच ते तिथेच थांबले. यावेळी त्यांच्यासोबत उपमुख्यमंत्री सुरिंदर चौधरी, त्यांचे सल्लागार नासिर अस्लम वानी आणि इतर अनेक मान्यवर उपस्थित होते. ◂(वृत्तसंस्था)



हरयाणातील गुरुग्राम येथील सेक्टर ३७-डी मध्ये असलेल्या झोपडपट्टीला बुधवारी भीषण आग लागली. या आगीत अनेक झोपड्या जळून खाक झाल्या. आगीच्या ज्वाळा आणि धुरामुळे आगीवर नियंत्रण आणताना प्रशासनाची दमछाक झाली

# पवन खेडा यांना सुप्रीम कोर्टाचा दणका

## उच्च न्यायालयाने मंजूर केलेला अटकपूर्व जामीन स्थगित

**◆ नवी दिल्ली, १५ एप्रिल**
काँग्रेस नेते पवन खेडा यांना कर्नाटक उच्च न्यायालयाने मंजूर केलेला अटकपूर्व जामीन सर्वोच्च न्यायालयाने स्थगित केला आहे. त्यांना तीन आठवड्यांत उत्तर देण्याचे निर्देश दिले आहेत. तथापि, न्यायालयाने स्पष्ट केले की, खेडा आसाममधील न्यायालयात अटकपूर्व जामिनासाठी अर्ज करू शकतात.

आसाममध्ये दाखल केलेल्या एका एफआयआरशी संबंधित हे प्रकरण आहेत. न्या. जे. के. माहेश्वरी आणि न्या. अतुल एस. चांदुरकर यांच्या न्यायासनाने



खेडा यांना नोटीस बजावली असून, त्यांना तीन आठवड्यांत उत्तर दाखल करण्यास सांगितले आहे. तेलंगणा उच्च न्यायालयाने मंजूर केलेल्या ट्रान्झिट जामिनाला स्थगिती देण्याची मागणी करणाऱ्या आसाम सरकारच्या याचिकेवर ही नोटीस बजावण्यात आली आहे. न्यायासनाने आपल्या आदेशात म्हटले की, संबंधित आदेश (ट्रान्झिट बेल) सध्या स्थगित करण्यात आला आहे. तथापि, खेडा आसाममधील संबंधित न्यायालयात अटकपूर्व जामिनासाठी अर्ज करू शकतात. या प्रकरणाची पुढील सुनावणी तीन आठवड्यांत होईल आणि सर्व पक्षांनी तोपर्यंत आपले उत्तर दाखल करावे. आसाम सरकारचे प्रतिनिधित्व करणारे महान्यायअभिकर्ता तुषार मेहता यांनी युक्तिवादात म्हटले की, तेलंगणा उच्च न्यायालयाला या प्रकरणाची सुनावणी करण्याचा अधिकार नाही, कथित गुन्हा आणि एफआयआर दोन्ही आसाममध्ये नोंदवले गेले होते. जामिन देताना कायद्याचा गैरवापर करण्यात आला.
◂(वृत्तसंस्था)

### काय आहे प्रकरण?

**» हे प्रकरण आसामचे मुख्यमंत्री हिमंता बिस्वा सरमा यांच्या पत्नी रिनिकी भुयान सरमा यांच्याविरुद्ध कथितरित्या आक्षेपार्ह आणि मानहानीकारक वक्तव्ये करण्याशी संबंधित आहे. आसाम पोलिसांनी खेडा यांच्याविरुद्ध मानहानी, बनावटगिरी आणि गुन्हेगारी कट यासह भारतीय दंड संहितेच्या अनेक कलमांखाली गुन्हा दाखल केला आहे. खेडा यांची बाजू मांडणारे ज्येष्ठ वकील अभिषेक मनु सिंघवी यांनी युक्तिवादात म्हटले की, हे प्रकरण राजकीय सूडबुद्धीने प्रेरित आहे आणि मुख्यमंत्री व त्यांच्या कुटुंबाबद्दल प्रश्न उपस्थित केल्यामुळे खेडा यांना लक्ष्य केले जात आहे.** ■

# जयशंकर यांची इस्रायली परराष्ट्रमंत्र्यांसोबत चर्चा

**◆ नवी दिल्ली, १५ एप्रिल**



इराणच्या बंदरांवर अमेरिकेने लादलेल्या नौदल नाकाबंदीच्या पृष्ठभूमीवर परराष्ट्र व्यवहार मंत्री एस. जयशंकर यांनी मंगळवारी इस्रायलमधील मंत्री गिदोन सार यांच्याची संवाद साधला आणि पश्चिम आशियातील संकटाच्या विविध पैलूंवर चर्चा केली.

एस. जयशंकर यांनी ऑस्ट्रेलियाच्या परराष्ट्रमंत्री पेनी वाँग यांच्याशी दूरध्वनीवर संवाद साधत इराण अमेरिका-इस्रायलमधील युद्धामुळे उद्भवणाऱ्या परिस्थितीवर परस्परांची मते जाणून घेतली. होर्मुझ सामुद्रीधुनीतून होणाऱ्या नौवहनाच्या स्वातंत्र्याला बाधा पोहोचवणाऱ्या इराणच्या कृतीवर कारवाई होणे आवश्यक आहे, असे जयशंकर यांच्याशी दूरध्वनीवर झालेल्या संभाषणानंतर सार यांनी सांगितले.
◂(वृत्तसंस्था)

CMYK

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## अग्रलेख...

# ...तरच थांबेल विकृतीची पुनरावृत्ती

महाराष्ट्रासारख्या सुसंस्कृत, प्रगत, समंजस आणि प्रगल्भ भूमीला सध्या एका भीषण विकृतीने ग्रासले आहे. नाशिक, परतवाडा-अचलपूर, आर्णी असो की मूल शहर, बातम्यांचे मथळे तेवढे बदलत आहेत. त्यामागची काळी कृत्ये आणि स्त्रीजन्म घेतलेल्या पीडितांचे अश्रू मात्र सारखेच आहेत. त्यातील अनेक प्रकरणांना 'लव्ह जिहाद'चा आयामही आहे. लव्ह जिहाद हा आता हा शब्द केवळ राजकीय वादविवादाचा विषय उरलेला नाही. सुनियोजित गुन्हेगारीचे 'मॉडेल'चे म्हणूनही हा प्रकार समोर येत आहे. माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातील आघाडीची टीसीएस कंपनी. अभियांत्रिकी महाविद्यालयातून उत्तीर्ण झालेले हजारो विद्यार्थी टीसीएसकडे रोजगाराच्या आशेने बघतात. या कंपनीच्या नाशिक कार्यालयात महिला कर्मचाऱ्यांवरील लैंगिक अत्याचाराच्या घटनांमुळे मोठा गदारोळ उडाला आहे. गोमांस खाण्यासाठी दबाव टाकणे, हिंदू देव-देवतांची खिल्ली उडवणे, हिंदू मुलींना आमिष दाखवून अत्याचार करणे असा सारा बीभत्स प्रकार तिकडे घडला. त्यात कळस म्हणजे, 'द केरला स्टोरी'मध्ये जे दाखवले, तसेच कारस्थान या 'टीसीएस'च्या कार्यालयात घडले. कार्मिक व्यवस्थापक असलेल्या विशिष्ट समाजाच्या अधिकारी महिलेने स्वधर्माच्या कर्मचाऱ्यांशी हिंदू मुलींना ठरवून जोडले. धर्मांतर आणि अत्याचारासाठी प्रवृत्त करण्याबाबत तिच्यावर लावण्यात आलेला आरोप हा 'लव्ह जिहाद'च आहे. नाशिकच्या खरात प्रकरणाने समाजाची झोप उडवली आणि त्यानंतर गावागावांतून अत्याचाराची प्रकरणे बाहेर येण्याचा वेग वाढला. त्याच विकृतीची पुनरावृत्ती महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यांतून-गावांतून होताना दिसत आहे. अशा सर्व घटनांकडे केवळ कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न म्हणून पाहणे पुरेसे नाही, तर त्यामागची कट्टरपंथी मानसिकता आणि सामाजिक विघटनाचे षडयंत्र समजून घेणे गरजेचे झाले आहे.

अमरावती जिल्ह्यातील परतवाडा-अचलपूरच्या घटनेत विशिष्ट राजकीय विचारसरणीच्या कार्यकर्त्याने ज्या प्रकारे अल्पवयीन मुलींचे लैंगिक शोषण करून त्यांचे आक्षेपार्ह छायाचित्र समाजमाध्यमांवर प्रसारित केले, ते सर्वसामान्यांना धक्का देणारे आहे. चंद्रपूर जिल्ह्यातील मूल येथे 'स्नॅपचॅट'सारख्या 'ॲप्स'चा वापर करून मुलींना विश्वासात घेणे, त्यांची खाजगी चित्रफीत मिळवणे आणि त्यानंतर त्यांना 'ब्लॅकमेल' करीत लाखो रुपयांचे दागिने व रोकड उकळण्याचा धक्कादायक प्रकार हा 'फायनान्शिअल टेररिझम' म्हटला पाहिजे. यवतमाळ जिल्ह्यातील आर्णीच्या घटनेत प्रेमाचे आमिष दाखवून अवघ्या सोळा वर्षांच्या अल्पवयीन मुलीचे आयुष्य उद्ध्वस्त करण्यात आले. केवळ ग्रामीण किंवा निमशहरी भागातच हे संकट मर्यादित राहिलेले नाही. सुशिक्षित आणि उच्चभ्रू समजल्या जाणाऱ्या 'कॉर्पोरेट' जगालाही ही विषवल्ली विळखा घालत आहे. कामाच्या ठिकाणी देखील जात आणि धर्माच्या आधारावर भेदभाव होणे आणि महिला कर्मचाऱ्यांच्या शोषणाचे प्रकार घडणे हा नवा 'सोशल ट्रेंड' होऊ पाहत आहे. अशा अग्रगण्य कंपन्या अंतर्गत कलहाने आणि शोषणाने पोखरल्या जातात, तेव्हा ती केवळ प्रशासकीय चूक उरत नाही. ते एका मोठ्या सामाजिक रोगाचे लक्षण ठरते. कामाच्या ठिकाणी सुरक्षित वातावरण असणे हा विशेषतः महिला कर्मचाऱ्यांचा अधिकार आहे. तिथेही धर्मांध किंवा जातीय मानसिकतेतून होणारे शोषण सुसंस्कृत समाजासाठी लाजिरवाणेच आहे. ही विकृती तथाकथित 'व्हाईट कॉलर्ड' गुन्हेगारीच्या रूपात आपल्या जागतिक महासत्ता होण्याच्या स्वप्नांनाही सुरुंग लावत आहे. बहुतांश घटनांतील साम्य म्हणजे, पीडित प्रामुख्याने हिंदू समाजातील तरुणी किंवा अल्पवयीन मुली आहेत आणि आरोपी एका विशिष्ट समुदायातील संघटित आणि विघातक विचारसरणीचे आहेत. हे असे काही ऐकले, वाचले की कानात मुंग्यांचे वारूळ उठते. खरे तर, या उघड झालेल्या काही वाणगीदाखल घटना आहेत. असे कितीतरी प्रकार गावातल्या गावात घडून आणि विरून गेले असतील.

राष्ट्रीय गुन्हे नोंदणी विभागाच्या (एनसीआरबी) अहवालानुसार आणि विविध महिला संघटनांनी गोळा केलेल्या आकडेवारीनुसार, महाराष्ट्रात दरवर्षी हजारो मुली बेपत्ता होत आहेत. त्यातील मोठी संख्या खोट्या प्रेमाच्या जाळ्यात अडकलेल्या मुलींची असते. केवळ महाराष्ट्रातच नव्हे, तर केरळ, कर्नाटक आणि आता उत्तर भारतातही अशा घटनांचे प्रमाण ३० ते ४० टक्क्यांनी वाढल्याचे विविध अहवाल सांगतात. यातील सर्वाधिक धक्कादायक बाब म्हणजे, आरोपींना स्थानिक पातळीवर राजकीय आणि धार्मिक संघटनांचे पाठबळ मिळते. अचलपूरमधील 'एमआयएम' कार्यकर्त्याच्या अटकेतून ते सिद्धही झाले आहे. अशा विकृत प्रवृत्तींचा कठोर शब्दांत निषेध करणे पुरेसे नाही. ही प्रवृत्ती समाजात कर्करोगासारखी पसरत असल्याने तिला कायमचे संपविले पाहिजे. प्रेमाच्या किंवा कथित सौहार्दाच्या बनावाखाली चालणारा हा 'जिहाद' आहे, हे समस्त हिंदू समाजाने समजून घेतले पाहिजे. या प्रवृत्तींना वेळीच ठेचून काढणे हे समाजाचे कर्तव्य आहे आणि ती गरजही आहे. एखादा समाज आपल्या लेकीबाळींच्या सुरक्षिततेबद्दल चिंतित होतो, तेव्हा त्या समाजापुढे असे काही तरी संकट असते. ते दिसत नसते, पण समाजाला पोखरत असते. त्यामुळे प्रत्येकाने सावध असणे आणि आपल्या मुलांकडे लक्ष ठेवणे अपरिहार्य आहे. आधुनिकता वर्ज्य नाही, पण त्या नावाने अतिरेक होत असेल तर तो थांबविलाच पाहिजे. अशा घटनांतील गुन्हेगारांना कठोरतम शिक्षा तर व्हायलाच हवी, शिवाय त्यांच्या पाठीशी उभ्या राहणाऱ्या राजकारण्यांच्याही शक्तिपात होणे आवश्यक आहे. या समाजकंटकांचे अस्तित्व कायम असणे हा भारताच्या भविष्यासाठीचा अत्यंत मोठा धोका आहे.

या भीषण परिस्थितीवर केवळ पोलिस कारवाई हा अंतिम उपाय असू शकत नाही. तो असता तर विकृतींची पुनरावृत्ती समोर आली नसती. खरे तर, ही वैचारिक आणि सामाजिक लढाई आहे. हे हिंदू समाजाविरुद्धचे षडयंत्र आहे. त्यावर राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या पंचपरिवर्तन संकल्पनेतील 'कुटुंब प्रबोधन'सारखा विषय अत्यंत प्रभावी उपाय ठरू शकतो. धावपळीच्या कुटुंबव्यवस्थेत संवाद हरवत चालला आहे. मुलांशी मैत्रीचे नाते निर्माण करून, त्यांना सामाजिक धोक्याची जाणीव करून देणे ही पालकांची मोठी जबाबदारी असताना ती पाळली जाताना दिसत नाही. घरात संस्कारांची शिदोरी भक्कम असली तर बाह्य प्रलोभने टिकत नाहीत. घरच्या प्रेमाची सर बाहेरच्या विषाक्त प्रेमाला येऊच शकत नाही. पण त्यासाठी कुटुंबात संवाद आवश्यक आहे. कामाच्या व्यापाच्या नावाखाली ते होत नसेल, तर आपले नुकसान ठरलेले आहे. ते आज होईल किंवा उद्या. हिंदूंनी आता कुटुंबात अधिक लक्ष दिले पाहिजे. आपल्या मुलींना स्वधर्माचा अभिमान आणि अन्यांच्या कट्टरतेचे, वाईट प्रवृत्तीचे वास्तवही समजावून सांगितले पाहिजे. समाज माध्यमांच्या आभासी जगात कोण मित्र आणि कोण शत्रू, हे ओळखण्याची दृष्टी मुलांना देणे आवश्यक आहे. गल्ली आणि मोहल्ला स्तरावर दक्षता समित्या स्थापन करून संशयास्पद हालचालींवर लक्ष ठेवणेही तेवढेच गरजेचे आहे. सामाजिक संघटनांनी अशा विषयांवर सामूहिक बैठक घेऊन दबाव गट निर्माण केले पाहिजे. महाराष्ट्राच्या भूमीला संतांचे आणि वीरांचे अधिष्ठान आहे. येथे छेडछाड किंवा शोषण करणाऱ्यांचे हात छाटणारी शक्ती नेहमीच समोर आली आहे. ती शक्ती जागी केली पाहिजे. काळाची हाक ओळखली पाहिजे. असे प्रकार ही सामाजिक आणि सांस्कृतिक आक्रमणाच्या पल्याड हिंदू समाजाची कुटुंबे नासवण्यासाठी घडविले जात आहेत. कायद्याचा बडगा आणि संस्कारांची ढाल या दोन्हींच्या जोरावरच आपण या विळख्यातून नव्या पिढीला वाचवू शकू. प्रशासन आणि न्यायव्यवस्था त्यांचे काम करेलच, पण समाज, कुटुंब, पालक म्हणून प्रत्येकाने काळजी घेतली पाहिजे आणि संघटित होऊन अशा विकृतीचा समूळ नाश करण्यासाठी सज्ज झालो पाहिजे. विकृतीची पुनरावृत्ती होत असेल तर त्यात विकृतांचा दोष असतोच, पण अशा पुनरावृत्तीत ज्यांना टार्गेट केले जाते, ज्यांचे नुकसान होते, त्यांचा अजिबातच दोष नाही, असेही म्हणण्यात अर्थ नाही. त्यांना रोखायचे असेल तर आपण संघटित व सक्रिय होऊन हिंदू समाजातील मुलीबाळींच्या संरक्षणासाठी सिद्ध झाले पाहिजे.

## विशेष

**प्रा. सुखदेव बखळे**

# लॉजिस्टिक क्षेत्रात संरचनात्मक बदल

भारताच्या बदलत्या परिदृश्यात वेअरहाऊसिंग म्हणजेच साठवणूक व्यवस्था ही केवळ पूरक सुविधा राहिलेली नाही, तर संपूर्ण पुरवठा साखळीची मध्यवर्ती कडी बनली आहे. पूर्वी गोदामे म्हणजे वस्तू ठेवण्याची जागा एवढ्यापुरती मर्यादित समज होता; मात्र आज ती इन्व्हेंटरी व्यवस्थापन, खर्च नियंत्रण, वितरण कार्यक्षमता आणि सेवा गुणवत्तेचा मुख्य आधार बनली आहेत. त्यामुळे वेअरहाऊसिंगचा विस्तार हा केवळ पायाभूत वाढ नसून आर्थिक व्यवस्थेतील गुणवत्ताबदलाचा संकेत आहे. शेतीक्षेत्रात या बदलाची विशेष झलक दिसते. अन्नधान्य उत्पादनात झालेली वाढ, सरकारी खरेदीचा विस्तार आणि वैज्ञानिक साठवणुकीवर दिला जाणारा भर यामुळे आधुनिक गोदामे आणि 'सिलो' पायाभूत सुविधांमध्ये मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक होत आहे. भारताच्या अन्नसुरक्षेच्या दृष्टीने ही बाब अत्यंत महत्त्वाची आहे. अन्नधान्याची खरेदी, साठवणूक आणि वितरण यामधील सुसूत्रता टिकवून ठेवण्यासाठी मजबूत वेअरहाऊसिंग प्रणाली अपरिहार्य ठरते. नोव्हेंबर २०२५ पर्यंत केंद्र सरकारच्या अन्नधान्य साठ्यासाठी सुमारे ९२ दशलक्ष टन क्षमतेची साठवणूक व्यवस्था उभी करण्यात आली आहे. यामध्ये सुमारे ८२ दशलक्ष टन संरक्षित साठवणूक आणि उर्वरित 'सीएपी' स्वरूपातील साठवणूक समाविष्ट आहे. 'फूड कॉर्पोरेशन ऑफ इंडिया' (एफसीआय) आणि राज्य सरकारी संस्था यामध्ये प्रमुख भूमिका बजावत आहेत, तर 'सेंट्रल वेअरहाऊस कॉर्पोरेशन' आणि राज्य वेअरहाऊसिंग कॉर्पोरेशन्स संचालनात मदत करतात. 'एफसीआय'ने एकट्यानेच सुमारे ४८ दशलक्ष टन साठवणूक क्षमता उभारली असून त्याचा वापर जवळपास ८८ टक्के आहे. हे प्रमाण खरेदी आणि साठवणूक यांच्यातील समन्वय दाखवते.

आज 'एफसीआय'च्या सुमारे ६७ टक्के साठवणूक सुविधा भाडेतत्त्वावर आहेत. यामुळे पीक हंगामातील वाढत्या गरजेनुसार लवचीकता मिळते आणि भांडवली खर्च कमी राहतो. उत्तर भारतात या साठवणुकीचे सर्वाधिक प्रमाण आढळते. तिथे गहू आणि तांदूळ खरेदी मोठ्या प्रमाणावर होते. राज्यस्तरीय यंत्रणाही या व्यवस्थेत तितक्याच महत्त्वाच्या आहेत. राज्य वेअरहाऊसिंग कॉर्पोरेशन्स आणि इतर संस्थांकडे मिळून सुमारे ४३ दशलक्ष टन साठवणूक क्षमता आहे. पश्चिम आणि उत्तर भागात याचे प्रमाण अधिक असून उत्पादन आणि उपभोग या दोन्ही दृष्टिकोनांमधून महत्त्वाचे आहे. याशिवाय 'सेंट्रल वेअरहाऊसिंग कॉर्पोरेशन'कडे ७४१ गोदामे असून त्यांची एकूण क्षमता सुमारे १५ दशलक्ष टन आहे. रेल्वे संलग्न गोदामे, कंटेनर फ्रेट स्टेशन, इनलँड कंटेनर डेपो आणि तापमान नियंत्रित सुविधा यामुळे या नेटवर्कची कार्यक्षमता वाढते. या साऱ्या विस्तारासोबतच नियमन आणि पारदर्शकतेतही मोठी सुधारणा झाली आहे. 'वेअरहाऊस डेव्हलपमेंट अँण्ड रेग्युलेटरी ॲथॉरिटी'च्या चौकटीमुळे वेअरहाऊसिंग क्षेत्र अधिक संघटित झाले आहे. सप्टेंबर २०२५ पर्यंत १०,८०० हून अधिक गोदामे नोंदणीकृत झाली असून ७.३ लाखांहून अधिक वेअरहाऊस रिसीट्स जारी करण्यात आल्या आहेत. या प्रणालीमुळे शेतकरी, व्यापारी आणि कृषी उद्योगांना औपचारिक कर्जप्रवाह उपलब्ध झाला आहे. ते ग्रामीण अर्थव्यवस्थेसाठी एक मोठे सकारात्मक पाऊल आहे. औद्योगिक आणि ई-कॉमर्स क्षेत्रातही वेअरहाऊसिंगची भूमिका झपाट्याने बदलत आहे.

आज तृतीय पक्ष लॉजिस्टिक्स, ओम्नीचॅनल विक्री आणि 'क्विक कॉमर्स'च्या वाढत्या ट्रेंडमुळे दर्जेदार (ग्रेड ए) गोदामांची मागणी वाढत आहे. विशेषतः टियर-२ आणि टियर-३ शहरांमध्ये या सुविधांचा विस्तार होत आहे. ते प्रादेशिक संतुलनाच्या दृष्टीने महत्त्वाचे आहे. त्याच वेळी कोल्ड चेन क्षेत्रही धोरणात्मकदृष्ट्या अधिक महत्त्वाचे ठरत आहे. अन्नधान्याची नासाडी कमी करणे, औषध आणि लसींच्या पुरवठा साखळीला बळकटी देणे आणि नाशवंत वस्तूंच्या निर्यातीला चालना देणे या सर्व बाबींसाठी मजबूत कोल्ड स्टोरेज नेटवर्क आवश्यक आहे. त्यामुळे वेअरहाऊसिंगचा हा भाग केवळ आर्थिक नव्हे, तर सार्वजनिक आरोग्य आणि अन्नसुरक्षेशीही जोडला गेला आहे. या सर्व घडामोडींचा एकत्रित विचार केल्यास स्पष्ट होते, की भारतातील वेअरहाऊसिंग क्षेत्र हे आता अर्थव्यवस्थेच्या पाठीचा कणा बनत आहे; मात्र या प्रगतीसोबत काही आव्हानेही आहेत, जसे की तंत्रज्ञानाचा व्यापक वापर, ग्रामीण भागातील पायाभूत सुविधा आणि खाजगी गुंतवणुकीसाठी अनुकूल वातावरण निर्माण करणे. भारतातील वेअरहाऊसिंग क्षेत्रात घडणारा बदल आता केवळ विस्तारापुरता मर्यादित राहिलेला नाही, तर गुणात्मक परिवर्तनाकडे झेपावू लागला आहे. पारंपरिक गोदामांच्या पलीकडे जाऊन आधुनिक साठवणूक प्रणाली, तंत्रज्ञानाचा वाढता वापर आणि शाश्वततेकडे झुकणारे धोरणात्मक निर्णय यामुळे हे क्षेत्र नव्या टप्प्यावर पोहोचत आहे. या प्रक्रियेत सिलो साठवणूक, ग्रेड-ए औद्योगिक वेअरहाऊसिंग, 'कोल्ड चेन नेटवर्क' आणि 'ईएसजी' आधारित मॉडेल्स ही चार प्रमुख प्रवाह ठळकपणे दिसून येतात.

पारंपरिक गोदामे अजूनही भारताच्या कृषी साठवणूक व्यवस्थेचा कणा आहेत; मात्र सिलो प्रणाली आता एक प्रभावी पर्याय म्हणून पुढे येत आहे. विशेषतः गहू साठवणुकीसाठी सिलो अधिक कार्यक्षम ठरत आहेत. पारंपरिक गोदामांमध्ये पाच ते दहा टक्क्यांपर्यंत धान्याची हानी होत असताना सिलोमध्ये ती एक टक्क्यांपेक्षा कमी राहते. याशिवाय कमी जागेत अधिक साठवणूक, यांत्रिक हाताळणी आणि अचूक इन्व्हेंटरी नियंत्रण ही सिलो यंत्रणेची महत्त्वाची वैशिष्ट्ये आहेत. २०२५ च्या मध्यापर्यंत सुमारे तीन दशलक्ष टन सिलो क्षमता कार्यान्वित झाली असून, त्याच प्रमाणात प्रकल्प बांधकामाधीन आणि निविदा प्रक्रियेत आहेत. पंजाब, हरयाणा आणि मध्य प्रदेश या राज्यांमध्ये याचा सर्वाधिक विस्तार दिसतो, जे त्यांच्या गहू उत्पादनातील महत्त्व दर्शवते. या क्षेत्रात 'एफसीआय'ची भूमिका महत्त्वाची आहे. 'एफसीआय'कडे असलेल्या सिलो क्षमतेपैकी बहुतांश क्षमता सार्वजनिक-खाजगी भागीदारी (पीपीपी) मॉडेलवर आधारित आहे. अदानी ॲग्री लॉजिस्टिक, स्नोमॅन लॉजिस्टिक आणि नॅशनल बल्क बँडलिंग कार्पोरेशन यांसारख्या खाजगी कंपन्यांनी या क्षेत्रात तांत्रिक कौशल्य आणि कार्यक्षमतेची नवी पातळी आणली आहे. रेल्वे आणि रस्ते आधारित सिलो मॉडेलमुळे धान्याची जलद वाहतूक आणि कमी नुकसान शक्य होत आहे. औद्योगिक वेअरहाऊसिंग क्षेत्रातही गेल्या दशकात मोठा बदल घडून आला आहे. जागतिक दर्जाच्या ग्रेड-ए सुविधांकडे झुकणारा हा कल स्पष्टपणे दिसतो. यासोबतच शाश्वततेकडेही विशेष लक्ष दिले जात आहे. 'नॅशनल लॉजिस्टिक पॉलिसी'अंतर्गत ग्रीन लॉजिस्टिक्सवर भर देण्यात आला असून सौरऊर्जा, ऊर्जा कार्यक्षम प्रकाशयोजना, पावसाचे पाणी साठवण आणि पुनर्वापर यासारख्या उपाययोजना नव्या वेअरहाऊसिंग प्रकल्पांमध्ये समाविष्ट केल्या जात आहेत. 'ईएसजी' निकषांनुसार उभारलेली गोदामे आता गुंतवणूकदार आणि आंतरराष्ट्रीय कंपन्यांसाठी अधिक आकर्षक ठरत आहेत. याचबरोबर 'बिल्ट-टू-सूट' (बीटीएस) मॉडेलही वेगाने पुढे येत आहे. मोठ्या कंपन्या आपल्या गरजेनुसार सानुकूलित वेअरहाऊस उभारण्याला प्राधान्य देत आहेत. त्यामुळे कार्यक्षमतेत वाढ आणि दीर्घकालीन स्थैर्य मिळते. उत्पादन केंद्रे आणि नव्याने विकसित होणाऱ्या बाजारपेठांमध्ये या मॉडेलचा विस्तार होत आहे. या सर्व घडामोडींच्या पृष्ठभूमीवर भारताच्या वेअरहाऊसिंग क्षेत्राचे भवितव्य अत्यंत आशादायक दिसते. एकूणच, भारतातील वेअरहाऊसिंग क्षेत्र आता केवळ सहायक घटक न राहता अर्थव्यवस्थेचा एक महत्त्वाचा आधारस्तंभ बनत आहे. तंत्रज्ञान, शाश्वतता आणि धोरणात्मक गुंतवणूक यांच्या साहाय्याने हे क्षेत्र अधिक एकात्मिक, कार्यक्षम आणि जागतिक स्पर्धेसाठी सक्षम होत आहे. पुढील काळात हा बदल केवळ लॉजिस्टिक्स क्षेत्रापुरता मर्यादित राहणार नाही, तर भारताच्या संपूर्ण आर्थिक विकासाचा वेग ठरवणारा निर्णायक घटक ठरणार आहे.


(लेखक अर्थशास्त्राचे अभ्यासक आहेत.)

## वेध

**नीलेश जोशी**

# नेमेचि येतो उन्हाळा...

फेब्रुवारी महिन्याच्या दुसऱ्या आठवड्यानंतर विदर्भातील जवळपास सर्वच जिल्ह्यांच्या तापमानात वाढ होण्यास सुरुवात होते. एप्रिल-मे महिन्यात तर तापमानाचा उच्चांक गाठला जातो. या महिन्यांमधील अनेक दिवस साधारणतः ४३ ते ४६ अंशापर्यंत तापमान कायम राहते. स्वाभाविकच या कालावधीत उष्माघाताचे अनेक बळी जातात. ही परिस्थिती गत काही वर्षांतील आहे असे नसले तरी तापमानाचा उच्चांक गाठणाऱ्या दिवसांमध्ये सतत वाढ होत आहे. म्हणूनच याकडे केवळ ऋतुबदलाचा परिणाम असे न पाहता वाढत असलेल्या तापमानाच्या कारणांची मीमांसा करणे आणि त्यासाठीच्या उपाययोजना सातत्याने, योग्य वेळेत करणे आवश्यक आहे. मुख्यतः वृक्षतोड आणि अन्य मार्गाने पर्यावरणाची होणारी हानी, झपाट्याने वाढत असलेले शहरीकरण सोबतच हवामानातील बदल या सर्वांचा संयुक्त परिणाम तापमान वाढीवर होतो. सतत वाढणारे तापमान हे जीवघेणे ठरत आहे. दरवर्षी उष्माघाताने मृत्यू होणाऱ्यांची संख्या वाढत असल्याचे चित्र आहे. दुर्दैवाने अनेक वेळा उष्माघाताच्या मृत्यूची नोंद योग्य पद्धतीने न झाल्याने प्रत्यक्ष आणि शासकीय आकडेवारीत तफावत जाणवते. यावर्षी देखील वर्धा, अकोल्यात एकाचा उष्माघाताने मृत्यू झाल्याची चर्चा आहे. त्यामुळे मानवी जीविताच्या रक्षणासाठी यावर उपाययोजना गरजेच्या आहेत. 'नेमेचि येतो उन्हाळा' असे म्हणून दुर्लक्ष करणे हे भविष्यातील अडचणी वाढविणारे ठरेल.



सतत वाढणारे तापमान आणि उन्हाळ्यातील उष्माघाताने होणारे मृत्यू ही समस्या केवळ विदर्भातील नागपूर, अकोला, चंद्रपूर, वर्धा, अमरावती या शहरांचीच नव्हे तर महाराष्ट्रातील प्रत्येक गाव, शहर आणि खेड्याची आहे. अशाच प्रकारच्या समस्येने गुजरातमधील अहमदाबाद शहर त्रासले होते. मात्र त्यांनी काही उपाययोजनांची प्रत्यक्ष अंमलबजावणी केली आणि त्यानंतर येथे उष्माघाताच्या मृत्यूच्या संख्येत कमालीची घट झाली. अहमदाबाद हे देशातील 'हिट ॲक्शन प्लॅन' यशस्वीपणे राबविणारे पहिले शहर आहे. २०१० साली भीषण उष्णतेच्या लाटेत अहमदाबाद येथे अनेकांचा मृत्यू झाला. त्यानंतर २०१३ मध्ये स्थानिक महानगरपालिकेने पूर्वसूचना प्रणाली, जनजागृती, नागरिकांनी घ्यावयाची काळजी या मुद्द्यांवर शासकीय यंत्रणांसह विविध सामाजिक संस्थांनी काम केले. परिणामी उष्माघाताचे मृत्यू घटले. या ॲक्शन प्लॅनला जागतिक आरोग्य संघटनेची मान्यता मिळाली. तर देशातील ३० शहरांनी अशा प्रकारची योजना अंमलात आणली. वाढत्या तापमानामुळे होणाऱ्या मृत्यूसाठी अशा प्रकारची सूक्ष्म योजना करणे आवश्यक असले तरी मुळात तापमान वाढू नये याकरिता देखील सर्वच स्तरातून प्रयत्नांची गरज आहे. खरं तर सर्वत्रच वाढते कॉंक्रिटीकरण आणि कमी होणारी हिरवळ ही मूळ समस्या आहे. कारण एका संशोधनानुसार, कॉंक्रिट पृष्ठभाग सूर्य ऊर्जा ८०-९० टक्के शोषतो, तर हिरवळ केवळ २०-३० टक्के उष्णता शोषते. म्हणूनच यावर सर्वोत्तम उपाय हा गाव, खेडे, शहरात ठिकठिकाणी 'हरित पट्टे' निर्माण करणे हा ठरू शकतो. वृक्ष, उद्याने, जलस्रोत, हिरवळ हे केवळ सौंदर्यवर्धनासाठी नसून ती तापमान नियंत्रणाची नैसर्गिक यंत्रणा आहे. 'हरित पट्टे' असलेल्या भागात २ ते ८ अंश सेल्सिअस तापमान कमी असते. तर हिरवळ वाढल्यास हवेतील प्रदूषण देखील २० ते ३० टक्के कमी होते. झाडांच्या सावलीखाली असलेल्या भागात जमिनीचे तापमान १० ते १५ टक्के कमी असते. असे एक ना अनेक फायदे हरित पट्ट्यांचे आहेत. सुदैवाने अद्याप तरी शहरात आणि शहरालगत मोठ्या प्रमाणात शासकीय जागा उपलब्ध असून याठिकाणी प्रशासकीय यंत्रणेसोबत विविध सामाजिक संस्थाद्वारे हरित पट्टे निर्माणाचे कार्य करता येईल. मोठ्या शहरात नागरिकांनी उजाड झालेल्या बगिच्यांच्या संवर्धनासाठी, रस्त्याच्या दुतर्फा वृक्षारोपणासाठी पुढाकार घेत तर शासनाने बांधकाम नियमांमध्ये २० ते ३० टक्के हिरवळ, वृक्षतोडीवर कडक नियंत्रण असे धोरणात्मक निर्णय घेतले तर पुढील काही वर्षात वाढत्या तापमानाच्या समस्येवर नियंत्रण मिळविता येईल.

आपल्या संस्कृतीत 'माता भूमिः पुत्रोऽहं पृथिव्याः' अर्थात ही वसुंधरा आमची माता आहे आणि आम्ही तिचे पुत्र आहोत, असे म्हटले आहे. म्हणून स्वाभाविकच वसुंधरेच्या रक्षणासाठी आवश्यक असणारी प्रत्येक बाब आपले कर्तव्य आहे. पर्यावरण संवर्धन आणि संरक्षण हे देखील महत्त्वाचेच. म्हणूनच रा. स्व. संघाने पंचपरिवर्तनात पर्यावरण या विषयाचाही समावेश केला आहे. वाढते तापमान हे अपमृत्यूला कारणीभूत ठरणारे असून एक प्रकारची ती आरोग्य आणिबाणी म्हणावी लागेल. यावर मात करण्यासाठी समाजातील सज्जन शक्तीला पुढाकार घ्यावा लागेल हे निश्चित!

९४२२८६२४८४

## दिल्ली वार्तापत्र

**श्यामकांत जहागीरदार**

# बिहारमध्ये 'सम्राट' युग सुरू

जदयूचे नितीशकुमार यांनी मुख्यमंत्रिपदाचा राजीनामा दिल्यामुळे बिहारमधील नितीशयुगाचा अंत झाला असून, भाजपाचे सम्राट चौधरी यांनी मुख्यमंत्रिपदाची शपथ घेतल्यामुळे राज्यात सम्राटयुगाचा प्रारंभ झाला आहे. बिहार ही तशीही सम्राटांची भूमी आहे. सम्राट चौधरी यांच्या शपथविधीने बिहारमध्ये प्रथमच भाजपाचा मुख्यमंत्री झाला आहे. उत्तर भारतातील बिहार हे एकमेव असे राज्य होते, ज्याठिकाणी अनेक वर्षे आघाडीच्या राजकारणात सत्तेत सहभागी असून सुद्धा भाजपचा मुख्यमंत्री कधी झाला नव्हता, भाजपला नेहमी उपमुख्यमंत्रिपदावरच समाधान मानावे लागत होते. बिहारचे नितीन नवीन भाजपाचे राष्ट्रीय अध्यक्ष झाल्यानंतर बिहारमध्ये भाजपाचा मुख्यमंत्री पदारूढ होणे याला निव्वळ योगायोग म्हणता येणार नाही. तर भाजपाच्या प्रदीर्घकाळच्या संयमाच्या राजकारणाला आलेले फळ म्हणायला हरकत नाही.

दुसऱ्या पक्षातून आलेल्या नेत्याला मुख्यमंत्री करण्याची भाजपतील ही दुसरी वेळ आहे. याआधी आसाममध्ये कॉंग्रेसमधून आलेल्या हिमंता बिस्व सरमा यांच्या गळ्यात भाजपने मुख्यमंत्रिपदाची माळ घातली. भाजपचा हा निर्णय दूरदृष्टीचा होता, यात संशय नाही, तो अचूक ठरला. हिमंता बिस्व सरमा यांना मुख्यमंत्री करण्याच्या निर्णयाचा फायदा भाजपाला फक्त आसाममध्येच नाही तर संपूर्ण ईशान्य भारतात झाला. आता बिहारमध्ये राजद आणि जदयूतून भाजपत आलेल्या सम्राट चौधरी यांना भाजपने मुख्यमंत्री बनवत त्यांच्या नेतृत्वावर विश्वास व्यक्त केला. नितीशकुमार यांचा राज्यातील प्रभाव मोडून काढत भाजपचा विस्तार करण्यासाठी चौधरी यांच्यासारख्या दमदार नेत्याची गरज होती.

सामान्यपणे भाजपमध्ये ज्या नेत्याच्या नावाची मुख्यमंत्रिपदासाठी चर्चा होते, तो मुख्यमंत्री होत नाही, असा अनुभव होता. पण याला सम्राट चौधरी अपवाद ठरले. नितीशकुमार राज्यसभेत जाणार, पर्यायाने मुख्यमंत्रिपदाचा राजीनामा देत बिहारच्या राजकारणातून बाहेर पडणार हे स्पष्ट झाल्यापासून भाजपचा नवा मुख्यमंत्री म्हणून सम्राट चौधरी यांच्या नावाची चर्चा सुरू झाली होती. ती भाजपा आणि रालोआ विधिमंडळ पक्षाच्या नेतेपदी त्यांची निवड झाल्यानंतर खरी ठरली. सम्राट चौधरी बिहारचे मुख्यमंत्री होणार याचे संकेत मिळायला सुरुवात झाली होती.



विधानसभा निवडणुकीच्या प्रचारात गृहमंत्री अमित शाह यांनी सम्राट चौधरी यांच्याकडे लवकरच मोठी जबाबदारी देण्याचे संकेत दिले होते. तर तत्कालीन मुख्यमंत्री नितीशकुमार यांनी आपल्या समृद्धी यात्रेदरम्यान जमुई येथील सभेत सम्राट चौधरी यांच्या खांद्यावर हात ठेवत ते आपले उत्तराधिकारी असण्याचे संकेत दिले होते. भाजपने बिहारमधील दीर्घकालीन राजकीय समीकरणे डोळ्यासमोर ठेवत सम्राट चौधरी यांना मुख्यमंत्री बनवले आहे. बिहारचे राजकारण हे जातिवादाचे आहे. नितीशकुमार यांनी राज्यातील पिछडा समाजाच्या कुर्मी आणि कोईरी समाजाला हाताशी धरत राजकारण केले, हे पुरेसे नसल्यामुळे त्यांनी अतिपिछडा समाजही आपल्यासोबत आणला. सम्राट चौधरी हे कुशवाह समाजाचे आहे. कुर्मी आणि कोईरी हा समाज लव म्हणून ओळखला जातो, लव आणि कुश असे दोन समाज एकत्र आणत लव-कुशचे राजकारण करण्यासाठी भाजपने सम्राट चौधरी यांची मुख्यमंत्रिपदी निवड केली आहे. जदयूत असताना सम्राट चौधरी आणि नितीशकुमार यांच्यात फारसे पटत नव्हते. चौधरी राजदमधून जदयूत आल्यानंतर जितनराम मांझी यांच्या मंत्रिमंडळात त्यांचा समावेश झाला. पण मांझी यांना हटवून नितीशकुमार मुख्यमंत्री झाल्यावर मात्र त्यांनी आपल्या मंत्रिमंडळात चौधरींना स्थान दिले नाही. नितीशकुमार यांच्यामुळे सम्राट चौधरी यांनी जदयू सोडत भाजपात प्रवेश केला. नितीशकुमार यांनी राजदसोडत पुन्हा रालोआत येण्याचा निर्णय घेतला, तेव्हा त्यांना रालोआत प्रवेश देण्यास ज्या भाजपा नेत्यांनी विरोध केला, त्यात सम्राट चौधरीही होते. पण नंतर भाजपच्या केंद्रीय नेतृत्वाच्या सूचनेवरून चौधरी यांनी नितीशकुमार यांच्याशी जुळवून घेतले आणि नितीशकुमार यांनीही चौधरी यांच्याबद्दलचा किंतू आपल्या मनातून काढून टाकला.

बिहारचे राजकारण गेली २० वर्षे नितीशकुमार यांच्याभोवती फिरत होते. नितीशकुमार यांना वगळून कोणत्याच राजकीय पक्षाला बिहारचे राजकारण आतापर्यंत करता आले नाही. त्यामुळे राज्यात कोणत्याही आघाडीचे सरकार आले तरी मुख्यमंत्री नितीशकुमारच राहात होते. भाजप सोडून राजदसोबत गेले तरी मुख्यमंत्री नितीशकुमारच राहात होते आणि राजदसोडून भाजपासोबत आले तरी नितीशकुमार यांना मुख्यमंत्री करण्याशिवाय पर्याय राहात नव्हता. अनेकवेळा भाजप आणि राजदपेक्षाही नितीशकुमार यांच्या जदयूचे आमदार कमी असतानाही मुख्यमंत्रिपद नितीशकुमार यांच्याकडेच राहत होते.

नितीशकुमार यांची आणखी एक जमेची बाजू म्हणजे त्यांच्यावर कधीही भ्रष्टाचाराचे आरोप झाले नाहीत. प्रदीर्घ काळ मुख्यमंत्री असतानाही भ्रष्टाचाराच्या मुद्यावर आपली पाटी कोरी ठेवणे ही मामुली बाब नाही. नितीशकुमार यांना देशात सर्वात जास्त काळ मुख्यमंत्रिपदावर राहण्याचा विक्रम करता आला नाही, पण सर्वात जास्त म्हणजे दहावेळा मुख्यमंत्रिपदाची शपथ घेण्याचा विक्रम त्यांच्या नावावर आहे. २००१ मध्ये नितीशकुमार पहिल्यांदा अल्पकाळासाठी मुख्यमंत्री झाले, पण २००५ च्या विधानसभा निवडणुकीनंतर त्यांनी मागे वळून पाहिले नाही. २००५, २०१०, २०१५, २०२० आणि २०२५ अशा सलग पाच विधानसभा निवडणुका नितीशकुमार यांनी जिंकल्या, दहावेळा मुख्यमंत्रिपदाची शपथ घेण्यासाठी त्यांना सहावेळा मुख्यमंत्रिपदाचा राजीनामाही द्यावा लागला. पुन्हा मुख्यमंत्रिपदाची शपथ घेण्यासाठी मुख्यमंत्रिपदाचा एवढ्या वेळा राजीनामा देण्याचा नितीशकुमार यांचा विक्रमही कोणाला मोडता येईल, असे वाटत नाही.

सम्राट चौधरी यांनी मुख्यमंत्रिपदाची शपथ घेतल्यामुळे बिहारला दोन दशकांनंतर प्रथमच विधानसभेत निवडून आलेला नेता मुख्यमंत्री म्हणून मिळाला आहे. मुख्यमंत्रिपदावर असताना एकदाही नितीशकुमार यांनी विधानसभेची निवडणूक लढवली नाही. मागच्या दाराने विधान परिषदेचे सदस्य होत ते मुख्यमंत्रिपदाची शपथ घेत होते. विधान परिषदेचे सदस्य म्हणून सर्वाधिक काळ मुख्यमंत्रिपदावर राहण्याचा विक्रमही देशात नितीशकुमार यांचा असावा.

सम्राट चौधरी यांचे वडील शकुनी चौधरी राजदचे नेते होते. त्यांच्यामुळेच सम्राट चौधरी याचा वयाच्या १९ व्या वर्षी राबडीदेवी मंत्रिमंडळात समावेश झाला. लालूप्रसादांनी त्यांना विधान परिषदेत घेतले, पण त्यांच्या कमी वयावरून वाद झाल्यामुळे त्यांना मंत्रिपदाचा राजीनामा द्यावा लागला. आज मुख्यमंत्री म्हणून सम्राट चौधरी यांना मोठी संधी मिळाली आहे. या संधीचे सोने करण्याचे आव्हान त्यांच्यासमोर आहे. मुख्यमंत्री म्हणून नितीशकुमार यांचा प्रभाव मोडून काढत आपली छाप उमटवण्याचे काम त्यांना करायचे आहे. आतापर्यंत धडाडीचे नेते म्हणून केलेले काम पाहता सम्राट चौधरी यात यशस्वी होतील, याबाबत शंका नाही.

९८८१७१७८१७

### प्रशासन : पदव्यांच्या झगमगाटात हरवलेली मानवी संवेदना

कोणत्याही कार्यालयात अधीक्षक किंवा प्रशासकीय अधिकारी ही पदे व्यवस्थापनाचा कणा मानली जातात. व्यवस्थापन आणि कर्मचारी यांच्यातील मुख्य दुवा म्हणून या पदाची ओळख असते. कर्मचाऱ्यांचे गाऱ्हाणे, त्यांच्या समस्या आणि व्यवस्थापनाचे उद्देश यामध्ये सुवर्णमध्य साधून प्रशासकीय समन्वय राखणे, हे या पदाचे मुख्य कर्तव्य आहे. पूर्वीच्या काळी या पदावर बसलेली व्यक्ती प्रशासनातील गुंतागुंत, नियम आणि परिपत्रकांचा सखोल अभ्यास करून, केवळ कागदी घोडे न नाचवता समस्यांवर ठोस उपाय शोधत असे. मात्र, बदलत्या काळानुसार आणि खाजगी क्षेत्राच्या वाढत्या प्रभावामुळे या पारंपरिक प्रशासकीय पदाचे स्वरूप बदलून ते आता एच. आर. झाले आहे. आज या पदासाठी एम.बी.ए. सारख्या पदव्युत्तर पदव्यांच्या जोरावर भरती करण्याकडे कल वाढला आहे. नाशिकच्या अलिकडील दुर्दैवी प्रकरणात एच. आर. विभागाचा उल्लेख वारंवार झाला. संबंधित पीडितेने वारंवार तक्रार करूनही तिची दखल घेतली गेली नाही, हे वास्तव अस्वस्थ करणारे आहे. यावरून एक मोठा प्रश्न उपस्थित होतो की, आज कॉर्पोरेट क्षेत्रात या पदावर काम करणाऱ्यांकडे प्रशासकीय कामाचा आणि मानवी संवेदनांचा नेमका किती अनुभव आहे? केवळ इंग्रजी भाषेवर प्रभुत्व असणे किंवा पॉवरपॉईंट प्रेझेंटेशन सादर करणे म्हणजे प्रशासन चालवणे नव्हे. प्रशासन ही केवळ एक तांत्रिक प्रोसेस नाही, तर ती माणसे हाताळण्याची आणि त्यांना न्याय देण्याची एक नैतिक जबाबदारी आहे. अखेर प्रशासन म्हणजे केवळ फाईल्सचा ढिगारा किंवा नियमावलीचे कोरडे वाचन नव्हे, तर ती एक जिवंत आणि प्रतिसाद देणारी व्यवस्था असायला हवी. नाशिकसारख्या प्रकरणांनी हे सिद्ध केले आहे की, जेव्हा प्रशासकीय पदावर बसलेली व्यक्ती प्राप्त तक्रारींकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करते, तेव्हा केवळ संस्थाच नाही तर संपूर्ण समाज पोखरला जातो. आता वेळ आली आहे की, बहुराष्ट्रीय कंपन्यांनी यातून बोध घ्यावा. केवळ पदव्यांच्या झगमगाटावर न थांबता, ज्यांच्याकडे समृद्ध प्रशासकीय अनुभव, नियमांचे अचूक ज्ञान आणि नैतिक जबाबदारीचे भान आहे, अशाच अनुभवी व्यक्तींना या पदांवर प्राधान्य द्यावे.

**अविनाश देशपांडे**/पुणे

## वाचक पत्रे

### अक्षय्य तृतीया

वैशाख महिन्याच्या शुक्ल पक्षाच्या तृतीयेला अक्षय्य तृतीया साजरी केली जाते. सौभाग्य आणि शुभ परिणामांचा कधीही क्षय होत नाही ते अक्षय. या दिवशी केलेले कार्य मनुष्याच्या जीवनात कधीही न संपणारे शुभ फल देते म्हणूनच या दिवशी एखादे चांगले कर्म आणि दान याचे शुभ परिणाम मिळतात आणि त्याचा प्रभाव संपत नाही. हा दिवस भगवान विष्णू यांना समर्पित आहे. भगवान विष्णूने परशुरामाच्या रूपात पृथ्वीवर अवतार धारण केला म्हणून परशुराम यांचा वाढदिवस या दिवशी साजरा केला जातो. दुसऱ्या मान्यतेनुसार पृथ्वीची सर्वांत पवित्र मानली जाणारी गंगा नदी भगीरथी यांनी पृथ्वीवर आणली होती. हा दिवस माता अन्नपूर्णा देवी यांचा वाढदिवस देखील मानला जातो. या दिवशी अन्नपूर्णा देवीला मुरड कानोले याचा नैवेद्य दाखवून पूजा केली जाते. आपली माहेरी आलेली गौर परत सासरी चालली या भावनेने तिची पाठवणी करण्याचा हा दिवस. त्यामुळे गोडधोडाचा नैवेद्य दाखविला जातो.

साडेतीन मुहूर्तांपैकी एक असल्यामुळे नवीन वस्तू खरेदी, या दिवशी लग्न करणे शुभ मानले जातात. या व्यतिरिक्त उपनयन सोहळा, नवीन घरात प्रवेश, नवा व्यवसाय सुरू करणे, नवे प्रोजेक्ट हाती घेणे अशी शुभ कार्ये तसेच सोने, चांदी, गाडी यांची खरेदी मोठ्या प्रमाणावर केली जाते. या दिवशी पितरांची पूजा करून त्यांचे स्मरण केले जाते. ब्राह्मणाला सुरई, दही-पेढे, तूप-साखर, फळं, चिंच, वस्त्र यापैकी कशाचेही दान दिले जाते. घरी खीर, वडे, चिंचोणी, कुरडया, पापड, पन्ह आदी उन्हाळी पदार्थ करून देवाला नैवेद्य अर्पण केला जातो. अक्षय या शब्दाचा अर्थच अविनाशी म्हणजे कधीही न संपणारा. त्यामुळे हा दिवस पवित्र मानतात. नवीन खरेदी केलेली वस्तू शुभ परिणाम देते आणि आयुष्यात भरभराट करून देणारी अशी ही अक्षय्य तृतीया.

**स्नेहल खंडागळे**/नागपूर

### जरा शाळकरी मुलांचा विचार करा

राज्यात सर्वत्र उष्णतेची लाट आली आहे. विदर्भ तर तापला आहे. त्यासाठी सरकार सर्व स्तरातील लोकांसाठी उपाययोजना राबवणार आहे. मग भर उन्हात दुपारी १२, १ वाजता शाळेतून घरी येणारी लहान मुले त्यांना दिसत नाही का? मुलांची शाळेची वेळ कमी का केली जात नाही? कितीतरी लहान मुले उन्हाने आजारी पडतात. शाळा मे पर्यंत सुरू ठेवण्याची काहीच गरज नसते. पण फक्त शुल्क पूर्ण मिळावे म्हणून शाळेचा हा अट्टहास आहे. बिचाऱ्या कोवळ्या मुलांचाही जरा विचार व्हावा आणि शाळेला एप्रिल-मे च्या सुट्ट्या द्याव्या. जेणेकरून मुले आजारी पडणार नाहीत.

**अपर्णा अग्निहोत्री**/नागपूर

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com
तसेच **कुठलाही लेख** पाठवायचा असल्यास ९८५०७५३२८१ या व्हॉट्स ॲप क्रमांकावर पाठवावा.

CMYK

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## महत्वाचे...



## पालकमंत्री गोरे यांना नगरसेवक जाधव यांच्याकडून भारतीय संविधानाची प्रतिमा भेट

**सोलापूर, दि. १६ एप्रिल-**

भारतीय घटनेचे शिल्पकार महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५व्या जयंतीनिमित्त पार्क चौक येथील त्यांच्या पूर्णाकृती पुतळ्यास अभिवादन करून सोलापूर महानगरपालिका प्रभाग क्रमांक २२चे भाजपाचे नगरसेवक किसन जाधव यांनीपालकमंत्री जयकुमार गोरे यांना भारतीय संविधानाची प्रतिमा भेट देत आंबेडकरांच्या विचारांना अभिवादन केले. यावेळी आमदार सचिन कल्याणशेट्टी, आमदार देवेंद्र कोठे, महापौर विनायक दादा कोंड्याल, भाजपा शहराध्यक्षा रोहिणीताई तडवळकर, भाजपा नेते शहाजी पवार, नगरसेवक गणेश वानकर, स्वीकृत नगरसेवक मनीष केत, नगरसेवक सिद्धेश्वर कमटम, संजय भंडगे, संतोष ऋतिक गायकवाड, माणिक कांबळे, महादेव राठोड, यल्लाप्पा शिवपुरी आदी उपस्थित होते.



## जनमंगल पतसंस्थेतर्फे डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती साजरी

**सोलापूर, दि. १५ एप्रिल-**

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती निमित्त जनमंगल पतसंस्थेच्या कार्यालय मध्ये आज जनमंगल पतसंस्था व जनमंगल फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. या कार्यक्रम प्रसंगी जनमंगल पतसंस्थेच्या चेअरमन सविता कानिफनाथ थोरात, सचिवा प्रीती कांबळे, संचालिका शिल्पा बावधनकर तसेच इतर संचालिका तसेच जनमंगल फाउंडेशनचे अध्यक्ष कानिफनाथ थोरात, जनमंगल फाउंडेशनचे सदस्य संतोष क्षीरसागर, सागर बावधनकर उपस्थित होते.

## दि पंढरपूर अर्बन को-ऑप. बँक लि; पंढरपूर

### नोटीस

आमचे बँकेचे मयत सभासद, ठेवीदार व कर्जदार देवकन्या लक्ष्मण जाधव राहणार बार्शी यांचे नावावर सेव्हिंग खाते, मुदत ठेव खाते असून सदर खात्याला वारस हक्काने नाव दाखल करणेबद्दल मयताचे वारसा पैकी त्यांचा अर्जदार - सोमेश संतोष जाधव - नातू यांनी बँकेकडे विनंती अर्ज केला आहे. या विनंती अर्जाप्रमाणे अर्जदाराचे नाव वारस हक्काने दाखल करणेस अन्य वारसांनी लेखी संमत्या दिलेल्या आहेत. तरी सदर मयतास अर्जदार यांनी अर्जात नमुद केले. व्यतिरिक्त अन्य कोणी वारस हक्कदार, मृत्युपत्र चालविणारे वगैरे कोणी असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिध्द केले तारखेपासून ७ दिवसांचे आत बँकेकडे लेखी कळवावे. सदर मुदतीत कोणाची कसल्याही प्रकारची लेखी तक्रार न आल्यास अर्जदार यांनी अर्जात नमुद केले व्यतिरिक्त अन्य कोणी वारस, हक्कदार, मृत्युपत्र चालविणारे वगैरे कोणी नाहीत असे समजून मयताचे नावावरील वर नमुद केलेल्या सेव्हिंग खाते, मुदत ठेव खात्यास अर्जदार सोमेश संतोष जाधव यांचे नाव वारसहक्काने दाखल करणेत येईल. मागाहून कोणाची कसल्याही प्रकारची तक्रार चालणार नाही. कळावे.

**ठिकाण : पंढरपूर**
**तारीख : ०३/०४/२०२६**

**सही/-**
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**दि पंढरपूर अर्बन को-ऑप बँक लि. पंढरपूर**



## निमा स्थापना दिनानिमित्त उळे शासकीय रुग्णालयात औषधी वनस्पतीची लागवड

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १५ एप्रिल-**

नॅशनल इंटिग्रेटेड मेडिकल असोसिएशन अर्थात निमा या इंटिग्रेटेड मेडिकल प्रॅक्शनर यांच्या संघटनेच्या ७८व्या स्थापना दिनानिमित्त निमा सोलापूर शाखेकडून आरोग्य मंदिर ,मौजे उळे, तालुका दक्षिण सोलापूर या ठिकाणी आयुर्वेदिक औषधी वनस्पती व वृक्ष लागवड करण्यात आली. यावेळी निमा सोलापूरचे माजी राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. विनायक टेंभुर्णीकर, अध्यक्ष डॉ. नागनाथ जिड्डीमनी, उपाध्यक्ष डॉ. सचिन बोंगरगे, कोषाध्यक्ष डॉ. प्रवीण ननवरे, एक्झिक्युटिव्ह मेंबर श्री कुंभार, डॉ उत्कर्ष वैद्य, निमा सेंट्रल कार्यकारणी सदस्य डॉ. राजश्री मठ, डॉ. अनुश्री मुंढेवाडी, वूमन फोरम सोलापूर अध्यक्ष डॉ. श्रुती मराठे आणि उळे गावच्या सरपंच अंबिका कोळी, ग्रामपंचायत सदस्य मनोज गुंड व ग्रामस्थ उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी उळे उपकेंद्राच्या सीएचओ डॉ. मंजुषा देशमुख-ननवरे व स्टाफ यांनी परिश्रम घेतले.

# मंद्रूप ग्रामपंचायतीकडून शौचालयाची कामे निकृष्ट

**१५ वित्त आयोगातील विकास कामाबद्दल नागरिकांच्या तक्रारी**

**तभा वृत्तसेवा,**
**दक्षिण सोलापूर, दि. १५ एप्रिल-**

पंधरावा वित्त आयोगातून मंद्रूप ग्रामपंचायतीने फायबर शौचालय बसविले आहे. शौचालय बसविताना शौचासाठी खड्डा न मारताच फायबर शौचालय बसविण्यात आल्याने बंद पडून परीसरात दुर्गंधी पसण्याची शक्यता आहे. त्यामुळे नागरीकांनी निकृष्ट कामाबद्दल तक्रार केली असून निधी वायफळ गेल्याची चर्चा सुरू आहे. वित्त आयोगाची निधी खर्ची टाकून तब्बल एका वर्षानंतर शौचालय बसविण्यात




येत असल्याने प्रशासनाच्या अनागोंदी कारभाराची कहर दिसून येत आहे.

मंद्रूप ग्रामपंचायतीकडून पंधरावा वित्त आयोगातून विविध विकास कामे करण्यात आली. माझी वसुंधरा पुरस्कार मिळालेल्या ग्रामपंचायतीकडून प्लास्टीक साहीत्य वाटप करून शौचालय बसविण्यामुळे नाराजी व्यक्त करण्यात येत आहे. कसिष्ठ अभियंतासह वरिष्ठ अधिकार्यांना 'मॅनेज' करून शौचालय बसविण्याअगोदर त्या कामांचे बिल काढण्यात आला आहे. त्यामुळे या कामात मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार झाला असून ग्रामपंचायतीकडून माहिती लपविण्यात येत आहे . मंद्रूपचे प्रभारी ग्रामसेवक नागेश जोडमोटे यांनी पदभार दिल्यानंतर दुसर्याच दिवशी ग्रामपंचायतीकडून विविध ठिकाणी शौचालय बसविण्यात आली आहेत .मात्र ही शौचालय बसवीत असताना कोणत्याही प्रकारचा नियोजन दिसून आले नाही. उघड्यावर रस्त्याशेजारी शौचालय बसविल्याने दुर्गंधीचा त्रास होत आहे. शौचालय निकृष्ठ बसविण्यात आल्याने व मजबूत नसल्याने शौचालय टिकाऊ संदर्भात शंका उपस्थित करण्यात येत आहे. विकासकामे करण्यापूर्वी सहा महिने अगोदर चुकीच्या पध्दतीने बिल काढणाऱ्या कर्मचारी व अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याची मागणी होत आहे.

## श्री सिद्धेश्वर वुमेन्स पॉलिटेक्निकमध्ये महिला मेळावा उत्साहात

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १५ एप्रिल-**

समाज कल्याण, पुणे विभाग व श्री सिद्धेश्वर वुमेन्स पॉलिटेक्निक यांच्या संयुक्त विद्यमाने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचा प्रसार व जनजागृती अभियानांतर्गत महिला मेळावा व व्याख्यान उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाले.

सामाजिक समता सप्ताहानिमित्त सहाय्यक आयुक्त सुलोचना सोनवणे, प्राचार्य प्रा. गजानन धरणे, ॲड. द्वारका देवळे, डॉ. मृणालिनी मोरे, शारदाताई हजारे, भारतीय बौद्ध महासभा लातूरच्या वंदनाताई कांबळे व सर्व विभागप्रमुख यांच्या उपस्थितीत याचे उद्घाटन झाले. डॉ. श्रीशैल मळेवाडी यांनी मान्यवरांचे स्वागत केले. पाहुण्यांची ओळख प्रा. शुभांगी मशाळकर यांनी करून दिली. सुलोचना सोनवणे यांनी प्राचार्य धरणे, प्रा. प्रमोद शिवगुंडे, प्रा. नवनाथ माने, प्रा. प्रतिभा पाटील, प्रा. स्वाती मनियाल, डॉ. श्रीशैल मळेवाडी, रेणुका इरशेट्टी व पौर्णिमा शिवपूजे यांना भारतीय संविधानाची प्रत भेट दिली.



शारदाताई हजारे यांनी विद्यार्थिनींना मानवतेच्या दृष्टीने विचार करणे, योग्य निर्णय घेणे आणि राज्यघटनेचे वाचन करून स्वतःचे अधिकार जाणून घेणे याचे महत्त्व पटवून दिले. त्यांनी अंधश्रद्धा निर्मूलन व मुलींनी स्वतःच्या सुरक्षेबाबत सजग राहण्याचा संदेश दिला. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन डॉ. श्रीशैल मळेवाडी यांनी केले.

ॲड. देवळे यांनी महिलांच्या सुरक्षिततेसाठी उपलब्ध असलेल्या विविध कायद्यांची माहिती दिली. विशेषतः १९६१ चा हुंडा प्रतिबंधक कायदा याबाबत मार्गदर्शन केले. तसेच सावित्रीबाई फुले यांनी मुलींसाठी सुरू केलेल्या पहिल्या शाळेचा उल्लेख करून शिक्षणाचे महत्त्व अधोरेखित केले. डॉ. मोरे यांनी नशामुक्त भारत प्रकल्प आणि व्यसनमुक्ती अभियानाविषयी मार्गदर्शन केले. त्यांनी २१व्या शतकातील तणाव, नैराश्य, गेमिंग आणि गॅम्बलिंग यांसारख्या समस्यांवर भाष्य केले. विद्यार्थिनींनी क्रिटिकल थिंकिंग, क्रिएटिव्ह थिंकिंग आणि सहानुभूती यांसारखी जीवनकौशल्ये आत्मसात करण्याचे आवाहन केले. प्राचार्य धरणे यांनी सर्वांना मतदानाचा समान अधिकार, दलितांना न्याय आणि चवदार तळ आंदोलनाचे ऐतिहासिक महत्त्व यावर प्रकाश टाकला.

### खरेदीपूर्व जाहीर नोटीस

तमाम लोकांस या खरेदीपुर्व जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, मिळकतीचे वर्णन :- जिल्हा व उपजिल्हा सोलापूर पैकी तालुका उत्तर सोलापूर पैकी शहर सोलापूर महानगरपालिकेच्या हद्दवाढ भाग नेहरु नगर येथील मिळकत यासी गट नं. ८/१ यापैकी प्लॉट नं. १५५ यापैकी क्षेत्र ९२.९३ चौ.मी. अथवा ०.९२.९३ आर.चौ.मी. यावरील बांधकामासह.

येणेप्रमाणे चतुःसिमेतील घरजागा ही द्रौपदी बाबु भडंगे यांचे खरेदी मालकी व कब्जे वहिवाटीची आहे. सदरहु मालकांनी सदरहु मिळकत ही आमचे अशिलांना विक्री करण्याचे ठरविले आहे. तसेच सदरहु मालकांनी सदरहु घरजागा ही निर्वेध व निजोखमी असल्याची हमी व खात्री आमचे अशिलांना दिली आहे.

तरी परंतु सदर घर जागेवर अन्य कोणाचा हक्क, दावा, लिज, गहाण, दान, बक्षीस, पोटगी, खरेदी-विक्री व इतर स्वरुपाचे करार असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ०७ (सात) दिवसांच्या आत आपले हक्काचे व अधिकाराचे लेखी कागदोपत्री पुराव्यानिशी खालील पत्यावर आणून देऊन खात्री करुन द्यावी. जर मुदतीत कोणाची हरकत न आल्यास सदरील घरजागा ही निर्वेध व निजोखमी आहे असे समजून आमचे अशिलांनी सदर घरजागेचा खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. तद्नंतर कोणाचीही तक्रार चालणार नाही. कोणाचीही फसगत होऊ नये म्हणून ही खरेदीपूर्व जाहीर नोटीस दिली ता. १५/०४/२०२६.

**सही/-**
**ॲड. जगदिश महादेव बिडवे**
**ॲड. रामेश्वर चंद्रकांत हारके**
**प्लॉट नं. १०४, शिवानंद नगर,**
**अक्कलकोट रोड, सोलापूर**
**अशिलातर्फे ॲडव्होकेट**
**मो.नं. ८८८८३५०६६५**

### महावितरण — खरेदीपूर्व जाहीर नोटीस

तमाम लोकांस कळविणेत येते की,

**मिळकतीचे वर्णन:** मिळकत डि. सोलापुर सब डि. व ता. करमाळा ग्रामपंचायत कुंभेज येथील मौजे कुंभेज हद्दीतील शेतमजीन अ) गट नं. ३१७ पैकी क्षेत्र पो. खराब ०० है. ४० आर, आकार ००रु. ०० पैसे यासी चतुः सिमाः

- **पुर्वेस :** गट नं. ३१८ गणी पठाण यांची जमीन
- **दक्षिणेस:** गट नं. ३१७ पैकी लैलाबी पठाण यांची जमीन
- **पश्चिमेस :** गट नं. ३१८ पैकी शिल्लक जमीन
- **उत्तरेस :** नवनाथ पवार यांना विक्री केलेली जमीन

येणेप्रमाणे वरील वर्णनाची जमीन.

वर वर्णन केलेली मिळकत ही **मकबुल महंमद शेख** यांच्या मालकीची होती व आहे. सदर मिळकत मकबुल महंमद शेख यांनी विक्री करणेचे ठरवून तशी आमचे अशिल **मा. कार्यकारी अभियंता बार्शी विभाग, महावितरण बार्शी** यांचे सोबत बैठक घेतलेली आहे. त्याबाबत खरेदीखताची बोलणी झालेली आहे.

सदर मिळकतीवर कोणचाही बक्षिस, गहाण, दान, लिज, पोटगी, चोळी बांगडी खरेदी, साठेखत, करार मदार, कुळ वहिवाट, इसारपावती इत्यादी कोणत्याही स्वरुपाचा हक्क संबंध असल्यास त्यांनी सदरची नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ८ दिवसांचे आत आमचे अशिल अथवा त्यांचे विधीज्ञांशी मुळ कागदपत्रानिशी पटवून दयावी, अन्यथा सदर मिळकतीत असे कोणाचेही हितसंबंध नाहीत व असल्यास त्यांनी ते जाणीव पूर्वक सोडून दिलेले आहेत, असे समजुन सदर मिळकतीचा खरेदीखताचा व्यवहार पुर्ण करतील व नंतर कोणाचीही तक्रार चालणार नाही, याची नोंद घेणेत यावी. त्याबाबत कोणाचीही फसगत होऊ नये, म्हणून जाहीर प्रसिध्दीकरण केले असे.

**ता. १५ / ०४ / २०२६**

पत्ता – कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय
सं व सू विभाग, महावितरण, आझाद चौक, बार्शी, जि. सोलापूर

अशिलांतर्फे ॲडव्होकेट
Neel R.B. Advocate
B.Sc. LLB., DLL & LW.
Regd. No. Mah. 54 / 2000
Karmala Dist. Solapur

**PRO/BMTZ/16/26 DT. 26-27**

**कार्यकारी अभियंता, महावितरण, बार्शी**

## IDFC FIRST Bank Limited

**(erstwhile Capital First Limited, amalgamated with IDFC Bank Limited and presently known as IDFC First Bank Limited)**
**CIN : L65110TN2014PLC097792**
**Registered Office: -** KRM Towers, 8th Floor, Harrington Road, Chetpet, Chennai-600031.
Tel : +91 44 4564 4000 | Fax: +91 44 4564 4022

IDFC FIRST Bank

### आर्थिक मालमत्तेचे सिक्युरिटायझेशन आणि पुनर्रचना व सुरक्षा हितसंबंधांची अंमलबजावणी अधिनियम, २००२' च्या कलम १३ (२) अन्वये सूचना

खाली नमूद केलेल्या कर्जदार आणि सह-कर्जदारांनी IDFC FIRST Bank Limited (पूर्वीची Capital First Limited; जी IDFC Bank Limited मध्ये विलीन झाली असून सध्या IDFC First Bank Limited म्हणून ओळखली जाते) कडून खालीलप्रमाणे सुरक्षित कर्जे घेतली आहेत. खाली नमूद केलेल्या कर्जदार आणि सह-कर्जदारांची ही कर्जे त्यांच्या संबंधित मालमत्तेच्या गहाणाद्वारे सुरक्षित करण्यात आली आहेत. संबंधित कर्ज करारांमधील अटी व शर्तींचे पालन करण्यात ते अपयशी ठरल्यामुळे आणि त्यांच्या कर्जाच्या परतफेडीत अनियमितता निर्माण झाल्यामुळे, रिझर्व्ह बँकेच्या (RBI) मार्गदर्शक तत्त्वांनुसार त्यांची कर्जे 'अनुत्पादक मालमत्ता' (NPA) म्हणून वर्गीकृत करण्यात आली आहेत. IDFC FIRST Bank Limited (पूर्वीची Capital First Limited; जी IDFC Bank Limited मध्ये विलीन झाली असून सध्या IDFC First Bank Limited म्हणून ओळखली जाते) कडे त्यांच्याकडून येणे असलेली रक्कम, त्यांना जारी करण्यात आलेल्या संबंधित सूचनांनुसार खालील तक्त्यामध्ये सविस्तरपणे नमूद करण्यात आली आहे; तसेच सदर रकमांवर पुढील व्याज देखील लागू होईल आणि हे व्याज संबंधित तारखांपासून करारातील दराप्रमाणे आकारले जाईल.

| अं. क्र. | कर्ज खाते क्र. | कर्जाचा प्रकार | कर्जदार आणि सह-कर्जदारांची नावे | कलम १३ (२) सूचना दिनांक | कलम १३ (२) सूचनेनुसार थकबाकीची रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 118639183 | मालमत्तेवर कर्ज | 1. किरण किसन नाळे<br>2. सुशिला किसन नाळे | 07/02/2026 | INR 10,31,831.45/- |

**मालमत्तेचा पत्ता** : ग्रामपंचायत मालमत्ता क्रमांक 1297/1 असलेली, एकूण 2100 चौरस फूट क्षेत्रफळ आणि 1000 चौरस फूट बांधकाम क्षेत्र असलेली, बांधकामाधीन मालमत्तेचा संपूर्ण तुकडा व हिस्सा; गावः टेंभुर्णी, तालुकाः माढा, जिल्हा : सोलापूर, महाराष्ट्र-413211 येथे स्थित असून, चतुःसीमा खालीलप्रमाणे आहेत : पूर्व - दत्तात्रय नाळे, पश्चिम - स्वतःची जागा, उत्तर - रस्ता, दक्षिण - हनुमंत नाळे.

| अं. क्र. | कर्ज खाते क्र. | कर्जाचा प्रकार | कर्जदार आणि सह-कर्जदारांची नावे | कलम १३ (२) सूचना दिनांक | कलम १३ (२) सूचनेनुसार थकबाकीची रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| 2 | 143066545 | मालमत्तेवर कर्ज | 1. शशिकांत लक्ष्मण थावरे<br>2. मनिषा लक्ष्मण थावरे | 06/12/2026 | INR 9,36,354.34/- |

**मालमत्तेचा पत्ता** : ग्रामपंचायत मिळकत क्र. 145 ची संपूर्ण जमीन, एकूण क्षेत्रफळ 1840 चौ. फूट, गाव : खुडूस, ग्रामपंचायत खुडूस, तालुका : माळशिरस, जिल्हा : सोलापूर, महाराष्ट्र-413113, आणि सीमा खालीलप्रमाणे :- पूर्व - रस्ता, उत्तर - शहाजी धुळा थावरे यांचे घर, पश्चिम - मोकळी जागा, दक्षिण - भीमराव बुधनवार यांचे घर

| अं. क्र. | कर्ज खाते क्र. | कर्जाचा प्रकार | कर्जदार आणि सह-कर्जदारांची नावे | कलम १३ (२) सूचना दिनांक | कलम १३ (२) सूचनेनुसार थकबाकीची रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| 3 | 118634445 | मालमत्तेवर कर्ज | 1. सुनील कैलास लोंढे<br>2. कैलास शंकर लोंढ | 30/01/2026 | INR 4,78,796.69/- |

**मालमत्तेचा पत्ताः** ग्रामपंचायत मिळकत क्र. 1539 ची संपूर्ण जागा, एकूण क्षेत्रफळ 1404 चौ. फूट, मौजेः बेंबळे, ग्रामपंचायत बेंबळे, उपविभागः माढा, विभागः सोलापूर, महाराष्ट्र-413211, आणि सीमा :- पूर्व - रस्ता, पश्चिम - गौतम अनपट, उत्तर - रस्ता, दक्षिण - विष्णू अनपट

| अं. क्र. | कर्ज खाते क्र. | कर्जाचा प्रकार | कर्जदार आणि सह-कर्जदारांची नावे | कलम १३ (२) सूचना दिनांक | कलम १३ (२) सूचनेनुसार थकबाकीची रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| 4 | 117473866 | मालमत्तेवर कर्ज | 1. तानाजी अण्णा पांढरे<br>2. सुरेखा तानाजी पांढरे | 18/02/2026 | INR 6,08,096.62/- |

**मालमत्तेचा पत्ता** : कोंडबावी, ता. माळशिरस, जि. सोलापूर, महाराष्ट्र-413101 येथील जीपी मिळकत क्र. 302/1 असलेली संपूर्ण बांधकाम मालमत्ता. एकूण क्षेत्रफळ 1,100 चौ. फूट, बांधकाम क्षेत्रफळ 700 चौ. फूट. आणि सीमा :- उत्तर - राजेंद्र अण्णा पांढरे, दक्षिण - दादासो आबा शिंदे, पूर्व - रस्ता, पश्चिम - मोकळी जागा

आपणास याद्वारे IDFC FIRST Bank Limited (पूर्वीची Capital First Limited, जी IDFC FIRST Bank Limited मध्ये विलीन झाली आहे आणि सध्या IDFC FIRST Bank Limited म्हणून ओळखली जाते) वरील तक्त्यात दर्शविलेल्या तपशिलानुसार, त्यातील करारानुसार व्याजदरासह, संबंधित तारखांपासून आणि इतर खर्च, शुल्क इत्यादींसह, या प्रकाशनाच्या तारखेपासून 60 दिवसांच्या आत रक्कम अदा करण्याचे आवाहन करण्यात येत आहे. असे करण्यात अयशस्वी झाल्यास, IDFC FIRST Bank Limited (पूर्वीची Capital First Limited, , जी IDFC FIRST Bank Limited मध्ये विलीन झाली आहे आणि सध्या IDFC FIRST Bank Limited म्हणून ओळखली जाते) देय असलेली रक्कम वसूल करण्यासाठी, SRFESI कायद्याच्या कलम 13 (4) आणि कलम 14 अन्वये, वर नमूद केलेल्या गहाण ठेवलेल्या मालमत्तांविरुद्ध कार्यवाही सुरू करण्यास अधोस्वाक्षरीकर्ता बांधील राहील. शिवाय, उक्त कायद्याच्या कलम १३ (13) अन्वये, तुम्हाला उक्त तारण ठेवलेल्या मालमत्ता विक्री/भाडेपट्ट्याने किंवा इतर कोणत्याही प्रकारे हस्तांतरित करण्यास मनाई आहे.

**सही/-**
**अधिकृत अधिकारी, आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड**
**(पूर्वीची कॅपिटल फर्स्ट लिमिटेड, आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये विलीन होऊन सध्या आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड म्हणून ओळखली जाते)**

**दिनांक : 16/04/2026**
**स्थळ : सोलापूर, महाराष्ट्र**

### सावधानतेची जाहीर नोटीस

तमाम लोकांना या सावधानतेच्या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मिळकतीचे वर्णन : डि।। सब डि।। सोलापूर पैकी तालुका दक्षिण सोलापूर पैकी मौजे कुरघोट येथील शेतजमीन यांसी गट नंबर १५९/२ यांसी एकूण क्षेत्र ३ हे. ७१ आर. यांसी आकार ६ रु. ०० पै. यापैकी क्षेत्र १ हे. २७ आर. यांसी आकार २ रु. ०५ पै. येणेप्रमाणे असलेली शेतजमीन व यातील बांध-बंधारे, झाडेझुडपे, ऊरळ्या, ताली व यातील तंदगभुत वस्तुसह व वहिवाटीच्या हक्कासह असलेली शेतजमीन.

सदर वर नमुद केलेली शेतजमीन ही श्री आनंद कृष्णा आटकर यांचे मालकीची असून आमचे अशिल श्री विकास दशरथ आटकर हे सदर वर नमुद केलेल्या शेतजमीनीच्या लगतचे खातेदार असून सदर शेतजमीनीचे अद्याप हद्द कायम झालेली नाही. तसेच सदर मिळकतीची हद कायम करुन हिस्सेराशी ठरलेली नाही. अशा परिस्थितीत वर नमुद केलेल्या शेतजमीनीचे श्री आनंद कृष्णा आटकर यांनी नमुद केलेल्या मिळकती संदर्भात खरेदी-विक्री तसेच करार, मदार, साठेखत, इसारापावती, बोजा व इतर करारपत्र करुन विल्हेवाट लावण्याच्या प्रयत्नात असल्याचे आमचे अशिलांना खात्रीलायकरित्या समजले आहे. सदर मिळकतीचा अद्याप रितसर हद्द कायम झालेली नाही. सदर मिळकतीच्या लगत आमचे अशिलांची मिळकत असल्याने आमचे अशिलांना वर नमुद केलेली मिळकत खरेदी करण्याचा अग्रहक्क व प्रथम अधिकार आहे.

सबब, वर नमुद केलेल्या मिळकती संदर्भात श्री आनंद कृष्णा आटकर यांच्यासोवत कोणीही कसल्याही स्वरुपाचा खरेदी-विक्री, साठेखत, करार, मदार, गहाणखत, दान, बक्षिस, वगैरे अन्य स्वरुपाचा कोणताही व्यवहार करु नये. यापरही कोणीही अशा स्वरुपाचा व्यवहार केल्यास वर नमुद केलेल्या मिळकतीवर कोणतेही कायदेशीर अधिकार चालणार नाही तसेच आमचे अशिल संबंधीताविरुध्द कायदेशीर कारवाई करतील याची नोंद घ्यावी. कोणाचीही कसल्याही स्वरुपाची फसगत व फसवणूक होऊ नये म्हणून ही सावधानतेची जाहीर नोटीस दिली असे.

ही सावधानतेची जाहीर नोटीस दिली तारीख १५/०४/२०२६.

**सही/-**
**ॲड. शामराव एस. बिराजदार**
**बी.एस.एल., एलएल.बी.**
**पत्ता. गाळा नं.४, बेसकर कॉम्प्लेक्स, बी.एम.सी बँकेच्या खाली, जिल्हा न्यायालयाजवळ, सोलापूर**
**मो.नं. ९९७५१२४८८९ / ९४०३७७१२९१**
**श्री विकास दशरथ आटकर तर्फे ॲडव्होकेट**

## सारथी स्पोकन इंग्लिशतर्फे उन्हाळी शिबिरास सुरुवात

**सोलापूर, दि. १५ एप्रिल-**

सारथी स्पोकन इंग्लिशच्या वतीने १५ एप्रिलपासून इयत्ता ४ थी ते ९ वी मराठी, सेमी इंग्लिश आणि इंग्रजी माध्यमाच्या विद्यार्थ्यांसाठी इंग्लिश स्पीकिंगच्या उन्हाळी शिबिरास सुरुवात झाली. सारथीच्या कन्ना चौक येथील मुख्य शाखेत आणि वालचंद कॉलेज समोरील भावनाऋषी हॉस्पिटलजवळील शाखेत सकाळी ९.३० ते ११.०० आणि दुपारी ४.०० ते ५.३० या वेळेत १० जून पर्यंत हे शिबिर सुरु आहे. माहितीसाठी मुख्य प्रशिक्षक प्रा. विठ्ठल वंगा (९८९०९२५९९६) यांच्याशी संपर्क साधावा.

### खरेदीपूर्व जाहीर नोटीस

तमाम लोकांस विशेषतः ता. बार्शी पैकी मौजे नागोबाचीवाडी येथील तसेच आसपासचे परिसरातील लोकांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, डि. सोलापूर सब डि.व ता. बार्शी पैकी मौजे नागोबाचीवाडी हद्दीतील प्लॉट मिळकतीचा तपशिल ग.नं. २४१ यापैकी प्लॉट नं. २२१ प्लॉट याचे क्षेत्रफळ १.११.९६ आर चौ.मी. आकार रु. १००,०० आहे. असा संपूर्ण खुला प्लॉट आहे. यासी चतुःसिमा :- पुर्वेस - ९ मी. रुंदीचा रस्ता, दक्षिणेस - प्लॉट नं. २२२, पश्चिमेस - ॲमिनीटी स्पेस, उत्तरेस - प्लॉट नं. २२० याचे पाणी व वागणूक पुर्वबाजुचे रस्त्याने जाते व आहे.

डि.सोलापूर सब डि.व ता. बार्शी पैकी मौजे नागोबाचीवाडी हद्दीतील प्लॉट मिळकतीचा तपशिल ग.नं. २४१ यापैकी प्लॉट नं. २२२ प्लॉट याचे क्षेत्रफळ १.११.९६ आर चौ.मी. आकार रु.१००.०० आहे असा संपूर्ण खुला प्लॉट आहे यासी चतुःसिमा :- पुर्वेस - ९ मी. रुंदीचा रस्ता, दक्षिणेस - प्लॉट नं. २२३, पश्चिमेस - ॲमिनोटी स्पेस उत्तरेस - प्लॉट नं. २२१ याचे पाणी व वागणुक पुर्वबाजुचे रस्त्याने जाते व आहे.

सदर मिळकत ही सुधाकर शंकरराव चौधरी व विनोदकुमार विठ्ठलराव श्रीरामवार यांचे मालकी कब्जे वहिवाटीची अशी बिनशेती प्लॉट मिळकती असून सदर मिळकत त्यांनी त्यांचे कायदेशीर गरजेसाठी विक्रीस काढून ती आमचे दोनही खरेदीदार अशिलास कायम खुप खरेदी देणेचे ठरवले व उभयतांनी सदर मिळकतीची बाजारभावाने किंमत ठरवून व ती मान्य केली व सदर व्यवहाराचा भाग म्हणून आमचे अशिलाकडून इसाराची रक्कम स्विकारलेली आहे. तसेच बाजुही ठरलेली आहे. सदर मिळकत ही निर्वेध निजोखमी व बोजारहीत असलेचा निर्वाळा विद्यमान मालकानी आमचे अशिलास दिलेला आहे.

सबब या जाहीर नोटीसीने कळविणेत येते की, याउपरही वर नमूद प्लॉट मिळकती संबंधाने जर कोणाचे काही गहाण, दान, लिज, बोजा, टाच, बक्षिसपत्र, मृत्यूपत्र वा तत्सम स्वरुपाचे कोणतेही हस्तांतर वा कर्जबोजाचे हवक वा वहिवाटीचे हक्क अगर तत्सम कोणत्याही स्वरुपाचे हक्क अधिकार असतील तर संबंधीतानी ही जाहीर नोटीस प्रसिध्द झाले पासून ७ दिवसांचे आत आमचे खालील पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यानिशी येवून आमची खात्री करुन द्यावी मुदतीत कोणाचीही हरकत आली नाही तर सदर मिळकत ही खरेदीयोग्य आहे असे समजून आमचे अशिल पुढील खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील मागाहून कोणाचीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही. कोणाचीही फसवणूक होऊ नये म्हणून ही जाहीर नोटीस प्रसिध्द केली असे.ता. १६/०४/२०२६

**सही/-**
**ॲड. श्री. महेश विलास जाधव**
**स्वामी समर्थ कॉम्प्लेस, कोर्टासमोर बार्शी, ता. बार्शी.जि. सोलापूर**
**मो.नं. ९८६०९१२३१८**
**(अशिलातर्फे ॲडव्होकेट)**

### जाहिर प्रसिध्दीकरण

दिवाणी किरकोळ अर्ज नं.२७/२०२६
निशाणी नं. ५

## बार्शी येथील मे. जिल्हा व सत्र न्यायाधीश सो यांचे न्यायालयात

१) **आदित्य प्रकाश माने-देशमुख,**
वय - १४ वर्षे, धंदा - शिक्षण,
रा. पिंपळखुटे, ता. माढा, जि. सोलापूर

२) **श्री. प्रकाश रामचंद्र माने-देशमुख**
वय - ४८ वर्षे, धंदा - शेती,
रा. पिंपळखुटे, ता. माढा, जि. सोलापूर
(अर्जदार नं. १ चे अपाक वडिल अर्जदार नं. २) — **अर्जदार**

विरुध्द

**महाराष्ट्र शासन,** — **सा.वाला**
**(सदरची नोटीस मा. जिल्हा सरकारी वकिल यांचेवर बजावण्यात यावी.)**

ज्या अर्थी डि सोलापूर सब डी व ता. माढा पैकी मौजे पिंपळखुटे येथील गट नं. ३२२/१अ एकूण क्षेत्र हे. ०१-२१ आर आकार रु. ०१-२५ पैसे यापैकी अर्जदार नं. १ आदित्य प्रकाश माने-देशमुख अपाक वडिल अर्जदार नं. २ प्रकाश रामचंद्र माने-देशमुख यांचे हिश्याची दक्षिण बाजूचे क्षेत्र हे. ००-६०.५० आर, याचा आकार रु. ००-६० पैसे, यांसी चतुःसिमा :- पुर्वेस - रस्ता, दक्षिणेस - गट नं. ३२२/१ब, पश्चिम - बाळू तुळशीराम बाळसराफ यांची जमीन, उत्तरेस - याच गटातील उर्वरीत मिळकत.

वर नमूद मिळकत अज्ञान आदित्य प्रकाश माने-देशमुख याचे नावे आहे. यातील अर्जदार नं. १ तर्फे अ.पा.क. म्हणून त्यांचे वडिल अर्जदार नं. २ प्रकाश रामचंद्र माने- देशमुख हे आहेत. सदर अज्ञानाचे शैक्षणिक गरजेपोटी व उर्वरीत मिळकत सुधारण्यासाठी अज्ञानाचे नावे असलेली वर नमूद मिळकत विक्री करणेस परवानगी मिळणेकामी यातील अर्जदारांनी सदरचा अर्ज दाखल केलेला आहे. त्याअर्थी सदरहू अर्जदार हे सदर मिळकतीचे मालक, हक्कदार नाहीत अथवा मिळकतीत कोणाचे हितसंबंध असतील तर या जाहिर प्रसिध्दीकरणाचे तारखेपासून एक महिन्याचे आत किंवा पुढील नेमलेली तारीख ०४/०५/२०२६ रोजीपर्यंत त्याने या कोर्टात स्वतः किंवा आपल्या विधिज्ञामार्फत हजर होऊन आपल्या हरकती कळवाव्या आणि या लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न नोंदविल्यास, तर सदरहू कोर्ट सदरहू अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्याला सदरहू अज्ञानाची मिळकत विक्रीची परवानगी देण्यात येईल, हे प्रसिध्दीकरण आमचे सही निशी व मे. कोर्टाचे शिक्या निशी

प्रसिध्द केले असे ता. ०४/०४/२०२६

**सही/-**
**कनिष्ठ लिपीक**

**कोर्टाचा शिक्का**

**सही/-**
**अक्षीक्षक,**
**जिल्हा न्यायालय, बार्शी**

## जाहीर समन्स

**मा. उपनिबंधक सहकारी संस्था, (परसेवा)**
**सोलापूर जिल्हा नागरी सहकारी बँक्स् को-ऑप. असोसिएशन लि. सोलापूर**
११३(अ), सिध्देश्वर पेठ, स्टेट बँक ऑफ इंडिया, ट्रेझरी शाखेशेजारी, सोलापूर-०१

**श्री वारणा सहकारी बँक, लि., वारणा नगर शाखा, सोलापूर - अर्जदार**
**विरुद्ध**
(खालील तपशिलातील नमुद केलेले थकबाकीदार सभासद) **- जाब देणार**

| अ. क्र. | केस नंबर | दावा रक्कम | जाब देणार नं. | जाब देणाऱ्यांचे नाव व पत्ता |
|---|---|---|---|---|
| १ | १०३१/२०२५-२६ | १,७७,४५८/- | २ | **स्वाती ताराचंद भोसले**<br>रा. प्लॉट नं. ३३३, उध्दव नगर भाग-२, जुळे सोलापूर |
| | | | ३ | **पांडुरंग मालबा चोरमुले**<br>रा. प्लॉट नं. ९४, रोहिणी नगर भाग-१, सैफुल, विजापूर रोड, सोलापूर |

या कामी अर्जदार बँक यांनी दाखाल केलेल्या अर्जातील वर नमुद केलेल्या जाब देणार यांनी दिलेला पत्ता उपलब्ध होत नसल्याने सदर जाहीर समन्स देत आहेत.

**उपनिर्दीष्ठ अर्जासबंधी आपले म्हणणे मांडण्यासाठी स्वतः जातीने वार - मंगळवार दि. २८/०४/२०२६ रोजी दुपारी १२.०० वाजता कागदपत्रासह या कार्यालयात हजर रहावे.**

या नोटीसद्वारे जाब देणार यांना असेही कळविण्यात येते की, वरील तारखेस वेळेवर हजर न राहिल्यास आपल्या गैरहजेरीत अजाची सुनावणी घेण्यात येईल. त्याप्रमाणे वरील तारखेस अगर तत्पुर्वी आपला संपुर्ण पत्ता कळविण्यास कसुर केल्यास आपला बचाव रद्द समजण्यात येईल.

आज दि. १३/०४/२०२६ रोजी माझी सही व कार्यालयाचे मुद्रेसह हे जाहीर समन्स दिले आहे.

**शिक्का**

**सही/-**
**उपनिबंधक**
**सहकारी संस्था (परसेवा)**
**सोलापूर जिल्हा नागरी सहकारी बँक्स को-ऑप. असोसिएशन लि., सोलापूर**

# आयपीएलचा थरार



## महत्त्वाचे

### हार्दिककडून सुनील छेत्रीला मुंबई इंडियन्सची जर्सी




**मुंबई** : भारतीय फुटबॉलचा दिग्गज सुनील छेत्री याने प्रतिष्ठित वानखेडे स्टेडियमवर पार पडलेल्या मुंबई इंडियन्सच्या सराव सत्राला विशेष उपस्थिती लावली. त्याच्या उपस्थितीमुळे सराव सत्रात एक चैतन्यमय ऊर्जा संचारली व मुंबई इंडियन्सचे अनेक खेळाडू या अनुभवी आक्रमक फुटबॉलपटूशी संवाद साधण्यासाठी उत्सुक असल्याचे दिसून आले. भारतातील सर्वात गौरवशाली फुटबॉलपटूंपैकी एक असलेल्या सुनील छेत्रीने खेळाडू व सपोर्ट स्टाफसोबत वेळ घालविला. त्याने महेला जयवर्धने, शार्दुल ठाकूर, दीपक चहर आणि कर्णधार हार्दिक पांड्या यांच्यासह इतर अनेकांशी संवाद साधला आणि आपल्या देदीप्यमान कारकिर्दीतील अनुभव व अंतर्दृष्टी त्यांच्यासोबत वाटून घेतल्या. मुंबई इंडियन्स व त्यांच्या चाहत्यांना केवळ या सामन्यासाठीच नव्हे, तर संपूर्ण स्पर्धेसाठी मी मनापासून शुभेच्छा देतो, असे छेत्रीने म्हटले आहे. या भेटीदरम्यानचा एक महत्त्वाचा क्षण तेव्हा आला, जेव्हा हार्दिक पांड्याने छेत्रीला मुंबई इंडियन्सची अधिकृत जर्सी भेट दिली.

# लखनौला स्वस्तात गुंडाळले

## सर्वबाद १४६ ● बंगळुरूच्या गोलंदाजांचा कहर ● रसिखचे ४ बळी, भुवनेश्वरचे ३ बळी

◆ **बंगळुरू, १५ एप्रिल**

१९ व्या इंडियन प्रीमियर लीग हंगामात बुधवारी एम. चिन्नास्वामी स्टेडियमवर विरुद्धच्या सामन्यात रसिख खान, भुवनेश्वर कुमार व कृणाल पांड्याच्या प्रभावी गोलंदाजीच्या बळावर रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूने (आरसीबी) प्रतिस्पर्धी लखनौ सुपर जायण्ट्सला मर्यादित २० षटकांत सर्वबाद १४६ धावांत गुंडाळले. त्यामुळे आरसीबीसमोर विजयासाठी १४७ धावा काढण्याचे सोपे लक्ष्य राहिले.

आरसीबीचा कर्णधार रजत पाटीदारने नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण करण्याचा निर्णय घेतला. आरसीबीने अंतिम एकादशमध्ये एक बदल केला आहे. जेकब डफीच्या जागी जोश हेझलवुडने पुनरागमन केले, तर विराट कोहली इम्पॅक्ट प्लेयर म्हणून खेळणार आहे. लखनौने आपल्या संघात कोणताही बदल केलेला नाही.

मिचेल मार्श व एडन मार्करामने २४ चेंडूत ३२ धावांची सलामी भागीदारी करीत लखनौच्या डावाची चांगली सुरुवात केली. रसिख सलामच्या गोलंदाजीला बळी पडण्यापूर्वी मार्करामने ८ चेंडूंत १२ धावा केल्या.



कृणाल पांड्याने मिचेल मार्शचा त्रिफळा उडविला, तो क्षण

### हेझलवुडचा प्रभावी मारा पंत जखमी, पूरन बाद

पुनरागमन करणाऱ्या वेगवान गोलंदाज जोश हेझलवुडच्या पहिल्या १८ चेंडूंत ११ निर्धाव चेंडूंचा समावेश आहे, यात कर्णधार ऋषभ पंतची दुखापतग्रस्त होऊन निवृत्त झाला होता व निकोलस पूरनच्या बळीचा समावेश आहे.

मार्शच्या मदतीला आलेला कर्णधार ऋषभ पंत चार चेंडू खेळून जखमी निवृत्त झाला. हेझलवूडने निकोलस पूरनचा (१) त्रिफळा उडविला. पुढे मिचेल मार्शने आयुष बदोनीच्या साथीने संघाला ७१ धावांवर पोहोचवले, त्याचवेळी कृणाल पांड्याने मार्शचा त्रिफळा उडविला. मार्शने ३२ चेंडूंत ३ चौकार व २ षट्कारांसह ४० धावांचे योगदान दिले. नंतर कृणाल पांड्याने अब्दुल सामदच्या रुपाने आपला दुसरा बळी टिपला. लखनौची ११.२ षटकांत ४ बाद ८३ धावा अशी अवस्था झाली. पुढे बदोनीने मुकुल चौधरीच्या साथीने लखनौला कसा-बसा शंभर धावांचा टप्पा ओलांडून दिला. याचवेळी रसिख खानने बदोनीला शर्माकडून झेलबाद केले. आयुष बदोनीने २४ चेंडूंत ४ चौकार व एका षट्कारांसह ३८ धावांची भर घातली. नंतर मुकुल चौधरीच्या साथीला जखमी निवृत्त झालेला ऋषभ पंत मैदानावर आला, परंतु त्याने एक धाव काढल्यानंतर भुवनेश्वर कुमारच्या चेंडूवर त्याचा झेल उडाला व तो फिल सॉल्टने अप्रतिमरित्या पकडला. पंत बाद झाला तेव्हा लखनौची १६.५ षटकांत ६ बाद १२४ धावा अशी स्थिती होती. नंतर मुकुल चौधरीने जॉर्ज लिंडे याच्या सह कार्याने खंबीरपणे फलंदाजी करत लखनौची धावसंख्या वाढविण्याचा प्रयत्न केला, परंतु रसिखने मुकुलचा त्रिफळा उडवून रोखले. मुकुलने २८ चेंडूंत ३ चौकार व २ षट्कारांसह ३९ धावांची खेळी केली. नंतर भुवनेश्वर कुमारनेही तळाच्या फळीतील लिंडे (७) व मोहम्मद शमीला (०) बाद करून लखनौला जबरदस्त हादरा दिला. रसिख सलामने आवेश खानच्या (१) रुपात आपला चौथा बळी घेत लखनौ सुपर जायण्ट्सचा डाव २० षटकांत सर्वबाद १४६ धावांत संपविला. आरसीबीकडून रसिख खानने ४ बळी, भुवेश्वर कुमारने ३ बळी, कृणाल पांड्याने २ बळी, तर जोश हेझलवुडने एक बळी टिपला. कृणाल पांड्याने आयपीएलमध्ये १०० बळी पूर्ण केले.

(वृत्तसंस्था)

# मुंबई पराभवाची मालिका खंडित करण्यास उत्सुक; गाठ पंजाबशी

◆ **मुंबई, १५ एप्रिल**

इंडियन प्रीमियर लीगमध्ये गुरुवारी येथील वानखेडे स्टेडियमवर पाच वेळचा विजेता मुंबई इंडियन्स व फॉर्मात असलेला पंजाब किंग्स यांच्यादरम्यान आयपीएल सामना खेळला जाणार आहे. या घरच्या मैदानावरील सामन्याच्या माध्यमातून मुंबई इंडियन्स आपल्या पराभवाची मालिका खंडित करण्याच्या प्रयत्नात असणार आहे, तर तिकडे पंजाब किंग्स गुणतालिकेतील आपले अव्वल दोन क्रमांकातील स्थान अधिक बळकट करण्याचा प्रयत्न करणार आहे.

पाच वेळा विजेतेपद पटकावणाऱ्या या संघाने हंगामाची सुरुवात विजयाने केली असली, तरी त्यानंतर त्यांना सलग तीन सामन्यांत पराभवाचा सामना करावा लागला आहे. नुकत्याच झालेल्या सामन्यात रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू (आरसीबी) कडून त्यांना पराभव पत्करावा लागला होता.

दुसरीकडे, पंजाब किंग्स हा संघ या हंगामात आतापर्यंत अजिंक्य राहिलेला एकमेव संघ आहे. सध्या दहा संघांच्या आयपील गुणतालिकेत पंजाब किंग्स ७ गुणांसह दुसऱ्या स्थानावर, तर मुंबई २ गुणांसह नवव्या स्थानावर आहे.



यजमान मुंबई इंडियन्स संघ वानखेडे स्टेडियमवर सर्वस्व पणाला लावण्यासाठी आपल्या भक्कम फलंदाजीच्या वरच्या व मधल्या फळीवर अवलंबून असेल. तथापि, त्यांना रोहित शर्माची उणीव भासू शकते. त्याच्या पायाला दुखापत झाली होती.

आत्मविश्वास बळावलेला पंजाब किंग्सची चौथ्या विजयावर नजर असेल. श्रेयस अय्यरच्या नेतृत्वाखाली पंजाब किंग्स संघ या हंगामातील सर्वात संतुलित व बहारदार फॉर्ममध्ये असलेल्या संघांपैकी एक ठरला आहे. सातत्यपूर्ण फलंदाजी व भरवशाच्या गोलंदाजीच्या जोरावर या संघाने आतापर्यंत खेळलेल्या चारपैकी तीन सामन्यांमध्ये विजय मिळविला आहे.

### काट्याची टक्कर

आयपीएलच्या इतिहासात मुंबई आणि पंजाब हे संघ ३४ वेळा आमने-सामने आले आहेत. त्यांच्यातील विजयाचा रेकॉर्ड १७-१७ असा बरोबरीत आहे (यात सुपर ओव्हरच्या निकालांचाही समावेश आहे). विशेष म्हणजे, वानखेडे स्टेडियमवर झालेल्या १० लढतींमध्ये या दोन्ही संघांनी प्रत्येकी पाच वेळा एकमेकांचा पराभव केला आहे.

**आजचा सामना**

**मुंबई इंडियन्स वि. पंजाब किंग्स**
**स्थळ** : वानखेडे स्टेडियम, मुंबई
**वेळ** : सायं. ७.३० वाजतापासून
**थेट प्रसारण** : स्टार स्पोर्ट्सवर

### सूर्यकुमार, बुमराहच्या कामगिरीकडे लक्ष

सूर्यकुमार यादव आयपीएल मध्ये ४,५०० धावांचा टप्पा गाठण्याच्या उंबरठ्यावर आहे. सध्या त्याच्या ४,४१७ धावा आहेत. दरम्यान, आयपीएलमधील बळींच्या बाबतीत जसप्रीत बुमराह (१८३) हा रविचंद्रन अश्विनला (१८७) मागे टाकू शकतो.

या आयपीएलमध्ये १५० बळींचा टप्पा पूर्ण करण्यासाठी ट्रेंट बोल्टला आणखी सहा बळींची आवश्यकता आहे.

युझवेंद्र चहल (३०) हा मोहित शर्मा आणि ड्वेन ब्राव्हो (प्रत्येकी ३३ बळी) यांना मागे टाकून, आयपीएलमध्ये मुंबई इंडियन्स विरुद्ध सर्वाधिक बळी घेणारा गोलंदाज होऊ शकतो.

(वृत्तसंस्था)

## केकेआरविरुद्ध अचूक गोलंदाजी करण्याचा प्रयत्न केला : नूर अहमद

**नवी दिल्ली** : हो, हवा थोडी दमट होती व खूप घाम येत होता. केवळ माझी बोटं कोरडी ठेवण्याचा व योग्य जागी गोलंदाजी करण्याचा प्रयत्न केला. खेळपट्टी चेंडूला थोडी पकड देत होती व मला त्याचा फायदा घ्यायचा होता. माझ्या संघासाठी काम केल्याचा मला खूप आनंद आहे, असे नूर अहमदने म्हटले आहे. अफगाणिस्तानचा फिरकी गोलंदाज नूर अहमदने एम. ए. चिदम्बरम् स्टेडियमवर कोलकाता नाईट रायडर्सविरुद्ध चेन्नई सुपर किंग्सच्या नुकत्याच झालेल्या विजयात महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. नूरने खेळपट्टीचा हुशारीने वापर केला. हंगामाच्या सुरुवातीला संथ कामगिरीनंतर पुन्हा लयीत येण्याचा प्रयत्न करणाऱ्या या युवा डावखुरा मनगटी फिरकी गोलंदाजाने नियंत्रित गोलंदाजी केली व त्यामुळे हलकी मदत करणाऱ्या खेळपट्टीवर सीएसकेला प्रतिस्पर्ध्यांचा पाठलाग रोखण्यात मदत झाली. या अफगाण फिरकीपटूने कबूल केले की स्पर्धेचा सुरुवातीचा टप्पा त्याच्यासाठी आणि संघासाठी सोपा नव्हता.

# व्हिक्टर ॲक्सेलसेन जगातील सर्वश्रेष्ठ खेळाडू : लक्ष्य सेन

### बॅडमिंटनपटू निवृत्त

◆ **नवी दिल्ली, १५ एप्रिल**

दोन वेळचा ऑलिम्पिक विजेता व्हिक्टर ॲक्सेलसेन हा जगातील आतापर्यंतचा सर्वश्रेष्ठ बॅडमिंटनपटूंपैकी एक म्हणून ओळखला जाईल, असे भारतीय बॅडमिंटनपटू लक्ष्य सेन म्हणाला.

बुधवारी डेन्मार्कचा स्टार बॅडमिंटनपटू व्हिक्टर ॲक्सेलसेन याने आंतरराष्ट्रीय बॅडमिंटन क्षेत्रातून आपली निवृत्ती जाहीर केली. पाठीच्या सततच्या त्रासामुळे सर्वोच्च स्तरावर खेळणे कठीण झाल्याचे त्याने सांगितले. या निवृत्तीच्या घोषणेनंतर त्याच्या सन्मानार्थ लक्ष्य सेनने एक भावनिक पोस्ट सामायिक केली.



व्हिक्टर ॲक्सेलसेन



लक्ष्य सेन

या ३२ वर्षीय डॅनिश खेळाडूने टोकियो आणि पॅरिस ऑलिम्पिकमध्ये सलग सुवर्णपदके जिंकली होती आणि २०१७ व २०२२ च्या जागतिक स्पर्धेत अव्वल स्थान पटकावले होते. तो युरोपियन स्पर्धेत सुवर्णपदके जिंकणाऱ्या सहा डॅनिश संघांचाही एक भाग होता.

बॅडमिंटनला तुमच्यासारखा खेळाडू लाभला आहे आणि हा खेळ खेळलेल्या सर्वकालीन महान खेळाडूंपैकी एक म्हणून ते तुम्हाला कायम लक्षात ठेवेल. पण तुम्हाला इतरांपेक्षा वेगळे ठरवणारी गोष्ट केवळ तुम्ही एक चॅम्पियन आहात ही नाही, तर तुम्ही एक व्यक्ती म्हणून कसे आहात ही आहे, जी सामने आणि पदकांच्या पलीकडे कायम राहते, असे सेनने पोस्ट केले.

या भारतीय स्टारने २०२२ मध्ये दुबईत एकत्र सराव करण्यापासून ते प्रतिष्ठित ऑल इंग्लंड ओपन आणि पॅरिस ऑलिम्पिकच्या उपांत्य फेरीतील अविस्मरणीय लढतीसह खेळाच्या सर्वात मोठ्या मंचांवर आमनेसामने येण्यापर्यंत आपला प्रवास केला.

(वृत्तसंस्था)

# वाडा प्रमुखांची क्रीडामंत्र्यांशी भेट

### उत्तेजक द्रव्य नियंत्रण उपायांवर चर्चा

◆ **नवी दिल्ली, १५ एप्रिल**

भारताच्या जलद दौऱ्यावर असलेले जागतिक उत्तेजक द्रव्य विरोधी संस्थेचे (वाडा) अध्यक्ष विटोल्ड बांका यांनी देशात जागतिक मानकांनुसार उत्तेजक द्रव्य विरोधी उपायांच्या 'प्रभावी अंमलबजावणीवर' चर्चा करण्यासाठी बुधवारी येथे क्रीडामंत्री मनसुख मांडविया यांची भेट घेतली.

बांका यांनी सोमवारी राष्ट्रीय उत्तेजक द्रव्य विरोधी संस्थेच्या (नाडा) अधिकाऱ्यांची भेट घेतली होती. या भेटीत त्यांनी भारतातील 'क्रीडा क्षेत्राची सचोटी' जपण्याबाबत 'तातडीच्या आणि गंभीर' चर्चा केल्या होत्या. गुरुवारी दिल्लीत त्यांची एक पत्रकार परिषद नियोजित आहे; या परिषदेत ते भारतातील उत्तेजक द्रव्य चाचण्यांमधील निराशाजनक आकडेवारीवर भाष्य करतील अशी अपेक्षा आहे.

आज नवी दिल्लीत वाडाचे अध्यक्ष विटोल्ड बांका यांच्याशी माझी अत्यंत उत्तम बैठक झाली. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली, भारत स्वच्छ क्रीडा संस्कृती रुजवण्यासाठी कटिबद्ध आहे. येथे स्पर्धेचा खरा आत्मा आणि सचोटी सुरक्षित राखली जाईल, असे मांडविया यांनी म्हटले आहे. ही बैठक उत्तेजक द्रव्य विरोधी प्रयत्नांमध्ये सातत्यपूर्ण प्रगती करण्यावर केंद्रित होती, असे बांका यांनी सांगितले. भारताचे युवा व्यवहार आणि क्रीडामंत्री, तसेच कामगार आणि रोजगार मंत्री डॉ. मनसुख मांडविया यांची भेट घेऊन आनंद झाला. आम्ही उत्तेजक द्रव्य विरोधी प्रयत्नांना पुढे नेण्यावर व भारतातील क्रीडा क्षेत्राची सचोटी बळकट करण्यावर चर्चा केली, यात जागतिक मानकांनुसार सातत्यपूर्ण प्रगती आणि प्रभावी अंमलबजावणीच्या महत्त्वाचाही समावेश होता, असे बांका यांनी आपल्या पोस्टमध्ये नमूद केले.

(वृत्तसंस्था)

# जावोखिर सिंदारोव्ह कॅण्डिडेट्स बुद्धिबळ विजेता



जावोखिर सिंदारोव्ह



विश्वविजेता डी. गुकेश

◆ **सायप्रस, १५ एप्रिल**

उझबेकिस्तानचा जावोखिर सिंदारोव्ह फिडे कॅण्डिडेट्स बुद्धिबळ २०२६ स्पर्धेचा विजेता ठरला. या विजयाबरोबरच सिंदारोव्ह या वर्षाच्या अखेरीस होणाऱ्या जागतिक बुद्धिबळ अजिंक्यपद स्पर्धेतील लढतीसाठी पात्र ठरला आहे. सिंदारोव्हला विद्यमान विश्वविजेता भारतीय ग्रॅण्डमास्टर डी. गुकेश याच्याविरुद्ध झुंज द्यावी लागणार आहे. अत्यंत उत्सुकता निर्माण केलेल्या या जागतिक स्पर्धेसाठी हे दोन्ही युवा दिग्गज सज्ज होत आहेत.

संपूर्ण स्पर्धेत अपराजित राहिलेल्या सिंदारोव्हने, १३ व्या फेरीच्या अखेरीस ९.५ गुण मिळवित व एक सामना शिल्लक असतानाच, अत्यंत वर्चस्वपूर्ण शैलीत कॅण्डिडेट्सचे विजेतेपद निश्चित केले.

### विश्वविजेतेपदासाठी नोव्हेंबरमध्ये सिंदारोव्ह-गुकेश अंतिम लढत

जागतिक अजिंक्यपद स्पर्धेचा अंतिम सामना नोव्हेंबर-डिसेंबर या कालावधीत नियोजित असल्याने, नव्या पिढीतील दोन सर्वात तेजस्वी ताऱ्यांमधील या आगामी महामुकाबल्यावर सर्वांचे लक्ष आधीच केंद्रित झाले आहे.

जागतिक अजिंक्यपद स्पर्धेच्या आव्हानापूर्वी सिंदारोव्हने गुकेशचे जगातील सर्वोत्तम खेळाडूंपैकी एक म्हणून कौतुक केले आहे.

डी. गुकेश हा इतिहासातील सर्वात तरुण विश्वविजेता आहे. त्याच्याकडे अनेक प्रबळ कौशल्ये आहेत व हा सामना अत्यंत रोमांचक ठरेल. या सामन्यासाठी मी खूपच उत्सुक आहे; तसेच मी त्याला केवळ शुभेच्छा देईन, असे सिंदारोव्ह सामन्यानंतर म्हणाला.

एकीकडे सिंदारोव्ह अत्यंत बहारदार आणि जोमदार फॉर्ममध्ये या स्पर्धेत उतरत असला, तरी इतिहासातील सर्वात तरुण विश्वविजेता असलेला गुकेश हा आजही एक अत्यंत बलाढ्य प्रतिस्पर्धी मानला जातो; विशेषतः २०२४ मध्ये डिंग लिरेनवर मात करून विजेतेपद पटकावल्यापासून, जरी त्याचा कामगिरीचा आलेख तुलनेने शांत राहिला असला, तरीही त्याचे सामर्थ्य अबाधित आहे.

(वृत्तसंस्था)

# हिंगे, साकिबसमोर पुन्हा नव्याने सुरुवात करण्याचे आव्हान : फिंच

◆ **नवी दिल्ली, १५ एप्रिल**

युवा वेगवान गोलंदाज प्रफुल्ल हिंगे आणि साकिब हुसेनने राजस्थान रॉयल्सविरुद्ध जबरदस्त कामगिरी केली, परंतु आता त्यांच्यासमोर वाढता दबाव हाताळत पुन्हा नव्याने सुरुवात करण्याचे आव्हान असेल, असे ऑस्ट्रेलियाचा दिग्गज ॲरोन फिंच म्हणाला. २०२१ च्या पुरुष टी-२० विश्वचषकातील ऑस्ट्रेलियाचा विजेत्या संघाचा कर्णधार ॲरोन फिंच याने हिंगे व साकिबचे कौतुक केले व त्यांना आतापर्यंतच्या आयपीएल २०२६ हंगामातील सर्वात चर्चेतील चेहरे म्हणून संबोधले आहे.

हिंगेने ३४ धावांत ४ बळी टिपण्याची किमया केली. यात त्याने सामन्यातील पहिल्याच षटकात तीन बळी घेणारा पहिला गोलंदाज होण्याचा विक्रम प्रस्थापित केला. दुसरीकडे, हुसेनने २४ धावांत ४ बळी घेतले. या दोघांच्या प्रभावी गोलंदाजीच्या सनसनाटी गोलंदाजीच्या जोरावरच सनरायझर्स हैदराबाद संघाने संघावर ५७ धावांनी दणदणीत विजय मिळविला. आता शनिवारी सायंकाळी हैदराबाद संघाचा सामना पाच वेळा विजेते ठरलेल्या चेन्नई सुपर किंग्जशी होईल, तेव्हा या दोघांकडून पुन्हा एकदा तशाच भुरळ घालणाऱ्या गोलंदाजीच्या प्रदर्शनाची प्रचंड अपेक्षा असेल.




साकिब हुसेन व प्रफुल्ल हिंगे

त्यांनी अत्यंत उत्कृष्ट कामगिरी केली व ते खरोखरच अप्रतिम होते. आतापर्यंतच्या या स्पर्धेतील सर्वात चर्चेतील विषय तेच ठरू शकतात. इतक्या कमी वयात व अगदीच नवखे असतानाही, राजस्थानसारख्या बलाढ्य फलंदाजी फळीला गारद करणे - हे पाहणे खरोखरच शानदार होते.

(वृत्तसंस्था)

# रोहित पंजाबविरुद्धच्या सामन्याला मुकणार

◆ **मुंबई, १५ एप्रिल**

गुरुवारी पंजाब किंग्जविरुद्ध होणाऱ्या मुंबई इंडियन्सच्या इंडियन प्रीमियर लीग सामन्यासाठी रोहित शर्माची निवड होण्याची शक्यता जवळपास मावळली आहे; सध्या संघाचे वैद्यकीय पथक त्याच्या दुखापतीची तपासणी करीत आहे.

गत रविवारी रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूविरुद्ध झालेल्या व मोठ्या धावसंख्येने गाजलेल्या सामन्यादरम्यान, सहाव्या षटकात फलंदाजी करीत असताना रोहितला त्याच्या पायात वेदना जाणवल्या होत्या. त्यामुळे तो मैदान सोडून बाहेर गेला होता.

रोहित जेव्हा दुखापतीमुळे बाहेर पडला, तेव्हा तो १३ चेंडूंमध्ये १९ धावांवर फलंदाजी करीत होता. त्यानंतर मुंबई इंडियन्सला हा सामना १८ धावांनी गमवावा लागला. या हंगामातील त्यांचा हा सलग तिसरा पराभव होता.



वैद्यकीय पथक व प्रशिक्षक वर्ग त्याची तपासणी करीत आहेत; त्यातून काय निष्पन्न होते हे आम्हाला लवकरच समजेल, असे संघाच्या एका अधिकाऱ्याने बुधवारी मुंबई इंडियन्सच्या सराव सत्रादरम्यान सांगितले.

दरम्यान, इंग्लंडचा अष्टपैलू खेळाडू विल जॅक्स हा मुंबई इंडियन्सच्या संघात सहभागी होण्यासाठी प्रवासात आहे. या हंगामात आतापर्यंतचे चारही सामने त्याने गमावले आहेत आणि गुरुवारी होणारा सामनाही तो खेळू शकणार नाही, असे दिसते. जॅक्स आणि न्यूझीलंडचा कर्णधार मिचेल सॅण्टनर या दोघांनीही भारतात येऊन संघात सहभागी होण्यापूर्वी, काही अतिरिक्त कालावधीची मागणी केली होती.

(वृत्तसंस्था)

## जोबर्ग महिला गोल्फ स्पर्धेत दीक्षाकडे संघाचे नेतृत्व

**जोहान्सबर्ग** : स्टार गोल्फपटू दीक्षा डागर, ही सध्या लेडीज युरोपियन टूर व सनशाइन लेडीज टूर यांच्या संयुक्त मान्यतेने गुरुवारी येथे सुरू होणाऱ्या जोबर्ग लेडीज ओपन गोल्फ स्पर्धेत पाच सदस्यीय भारतीय संघाचे नेतृत्व करणार आहे. दीक्षा सध्या महिला गोल्फपटूंच्या गुणतालिकेत अव्वल १० खेळाडूंमध्ये समाविष्ट आहे.

तिने सहा स्पर्धांपैकी दोन स्पर्धांमध्ये अव्वल १० मध्ये स्थान मिळविले आहे, तिच्यासोबत इतर भारतीय खेळाडू - अवनी प्रशांत, प्रणवी उर्स, हिताशी बक्षी आणि सनशाइन लेडीज टूरची माजी विजेती त्वेसा मलिक - सहभागी होतील. दक्षिण आफ्रिकेत पदार्पण करणाऱ्या हिताशीला पुन्हा एकदा आपला सूर गवसला आहे. अवनीचा हा हंगाम काहीसा साधारण राहिला आहे; पाच स्पर्धांपैकी तीन स्पर्धांमध्ये तिला कट मिळवण्यात यश आले.

# झारखंड महिला हॉकी संघाची भरारी

### १६ वर्षांत ३४ पदके

◆ **नवी दिल्ली, १५ एप्रिल**

हॉकी झारखंडने १६ व्या हॉकी इंडिया सब-ज्युनियर महिला राष्ट्रीय हॉकी अजिंक्यपद स्पर्धेचे सुवर्णपदक जिंकून तळागाळातील स्तरावर आपले वर्चस्व कायम राखले आहे. हे त्यांचे सलग तिसरे विजेतेपद (२०२४, २०२५, २०२६) असून, यामुळे देशातील अव्वल कनिष्ठ संघांपैकी एक म्हणून त्यांचे स्थान निश्चित झाले आहे.




विजेतेपदाच्या चषकासह झारखंड महिला हॉकी संघ

हॉकीच्या पायाभूत सुविधांच्या विकासात, विशेषतः २०१४ ते २०२६ या काळात ॲस्ट्रोटर्फ (कृत्रिम गवत मैदाने) उभारण्यात झारखंडने लक्षणीय प्रगती केली आहे. सिमडेगा आणि खुंटी या दोन्ही ठिकाणी प्रत्येकी दोन ॲस्ट्रोटर्फ मैदाने उपलब्ध आहेत. रांचीमध्ये बारियातू, हाटिया (रेल्वे), एजी कॉम्प्लेक्स आणि मोराबादी तसेच हजारीबाग व जमशेदपूर येथील नवल टाटा हॉकी अकादमीमध्ये दोन ॲस्ट्रोटर्फ मैदाने आहेत. पायाभूत सुविधांच्या या विस्तारामुळे संपूर्ण राज्यात हॉकीची विकसित करण्यास मोठा हातभार लागला आहे.

गत १६ वर्षांत, झारखंडच्या सुसंघटित युवा विकास कार्यक्रमामुळे हॉकी इंडिया राष्ट्रीय अजिंक्यपद स्पर्धांमध्ये, विशेषतः महिलांच्या गटात, लक्षणीय यश प्राप्त झाले आहे. राज्याने महिलांच्या स्पर्धांमध्ये एकूण ३४ पदके जिंकली आहेत; यामध्ये १० सुवर्ण, ११ रौप्य आणि १३ कांस्य पदकांचा समावेश असून, यातून त्यांच्या तळागाळातील उपक्रमांची ताकद आणि विश्वासार्हता अधोरेखित होते.

झारखंडच्या कनिष्ठ महिला संघाने १४ पदके (५ सुवर्ण, ५ रौप्य, ४ कांस्य) जिंकली आहेत, तर सब-ज्युनियर महिला संघाने १२ पदके (४ सुवर्ण, ५ रौप्य, ३ कांस्य) पटकावली आहेत; यामध्ये अलीकडेच मिळवलेल्या सलग तीन विजेतेपदांचाही समावेश आहे.

(वृत्तसंस्था)

# १९ वर्षीय स्टॅन मूडी विश्व स्नूकर स्पर्धेसाठी पात्र

◆ **नवी दिल्ली, १५ एप्रिल**

एका दिवसातच ब्रिटनच्या १९ वर्षीय गोल्फपटू स्टॅन मूडीने जागतिक स्नूकर स्पर्धेसाठी पात्रता मिळविली. टॉन्सिलायटिसच्या (घशातील गाठींच्या संसर्गामुळे) उपचारांसाठी रुग्णालयात दाखल असताना तिथून मूडीने स्वतःहून घरी परतल्यानंतर अवघ्या एका दिवसातच, चीनच्या जियांग जूनचा पराभव करीत पहिल्यांदाच जागतिक स्नूकर स्पर्धेसाठी पात्रता मिळविली आहे. भविष्यातील एक स्टार खेळाडू म्हणून त्याच्याकडे दीर्घकाळापासून पाहिले जात आहे. मूडी २००७ मध्ये जड ट्रम्प याच्यानंतर क्रुसिबल (स्पर्धेचे मुख्य ठिकाण) येथे खेळणारा पहिला ब्रिटिश किशोरवयीन खेळाडू ठरेल.

जियांग जूनचा १०-९ ने पराभव करण्यासाठी त्याने सामन्याच्या शेवटच्या फ्रेममध्ये (डावात) एक शानदार शतक (१०० हून अधिक गुण) नोंदविले.

त्याचा हा विजय विशेषतः कौतुकास्पद ठरला, कारण आदल्या रात्रीच तो टॉन्सिलायटिसमुळे रुग्णालयात दाखल होता; परंतु त्याने स्वतःहून रुग्णालयातून सुट्टी घेतली व शारीरिक अस्वस्थता असूनही खेळत राहून, स्नूकरच्या या सर्वात मोठ्या मंचावर आपले स्थान निश्चित केले.

(वृत्तसंस्था)

CMYK

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत

https://epaper.dainiktarunbharat.com/



## महत्वाचे...



## विश्वभूषण डॉ. बाबासाहेब आंबेडकर प्रतिष्ठानकडून प्रशांत माळवदे यांचा सन्मान

**पंढरपूर, दि. १५ एप्रिल-**

येथील सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग डॉ.बाबासाहेब आंबेडकर समाज भूषण पुरस्कार प्राप्त विश्वभूषण डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर प्रतिष्ठान यांच्यावतीने डॉ. आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंती महोत्सवानिमित्त डिजिटल मीडियातील उल्लेखनीय कार्याबद्दल पत्रकार प्रशांत माळवदे यांचा श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर समिती सदस्य हभप ज्ञानेश्वर महाराज जळगावकर यांच्या हस्ते गौरव करण्यात आला. यावेळी प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष डी. राज. सर्वगोड समितीचे अध्यक्ष श्रीकांत चंदनशिवे सचिव ज्ञानेश्वर कांबळे, डिजिटल मीडिया पत्रकार संघटनेचे पश्चिम महाराष्ट्र अध्यक्ष प्रवीण नागणे, शेतकरी संघटनेचे नेते प्रभाकर देशमुख, माजी नगराध्यक्ष उज्वला भालेराव, प्रा. अनिल ननवरे, सल्लागार नितीन काळे, प्रा. सुदाम गायकवाड, प्रा. राजुभाई मुलानी, अपराजित सर्वगोड, रामदास नागटिळक, विशाल आर्वे उपस्थित होते. त्यांचे श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर समिती सदस्य संभाजी शिंदे, अन्न आयोग अध्यक्ष महेश ढवळे, एलआयसी विकास अधिकारी बी.एस.चौगुले, जिल्हा परिषद सदस्य सुप्रिया गायकवाड, पंचायत समिती सदस्य विजय शिंदे,अक्काताई लोखंडे, सरपंच रणजीत जाधव, न्यू इंग्लिश स्कूलचे प्राचार्य के. डी. शिंदे, वसंतराव काळे हायस्कूलचे मुख्याध्यापक संजय काळे, संस्कार इंग्लिश मीडियम स्कूलचे अध्यक्ष सीताराम माने यांनी अभिनंदन केले.



## यशवंत बुध्द विहार संस्थेतर्फे महात्मा फुले, डॉ. आंबेडकर जयंती साजरी

**माळीनगर, दि. १५ एप्रिल-**

भारतीय बौद्ध महासभा प्रणित यशवंत बुद्ध विहार संस्था माळीनगर यांच्या वतीने महात्मा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची संयुक्त जयंती सोहळा यशवंत आंबेडकर बुद्ध विहार माळीनगर येथे संपन्न झाला. बाबासाहेबांच्या१३५ व्या जयंतीनिमित्त प्रमुख वक्ते दिपालीताई नलावडे यांच्या हस्ते निळ्या ध्वजास मानवंदना देण्यात आली. अध्यक्षस्थानी राहुरी कॉलेजचे माजी मुख्याध्यापक मधुकर जगताप हे होते. प्रथम गौतम बुद्ध यांच्या मूर्तीचे पूजन मेजर विलास जाधव तंटामुक्त अध्यक्ष यांच्या हस्ते तर महात्मा फुले यांच्या प्रतिमेचे पूजन ग्रामपंचायत सदस्य लक्ष्मण डोईफोडे यांच्या हस्ते व डॉ. बाबासाहेबांच्या प्रतिमेचे पूजन माळीनगरचे सरपंच अनुपमा एकतपुरे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करण्यात आला. प्रस्ताविक दीपक लोंढे यांनी केले. माजी सरपंच बुद्धविहाराचे ट्रस्ट अध्यक्ष अभिमान जगताप यांनी सूत्रसंचालन केले. यावेळी रामभाऊ तडवळकर यांनी विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप केले. मच्छिंद्र हजारे,महादेव बंडगर, श्रीमंत माने, अमोल जगताप, संजय तडवळकर, रमेश जगताप, कांतीलाल भाले, दर्शन सुरवसे, बलभीम नाईकनवरे, अरुण सोनवणे, प्रकाश बनसोडे, सुवर्णा जगताप, करुणा जगताप, सुषमा तडवळकर, सुशांता जगताप, सुभाष कांबळे, निशा दळवी, राजेश कांबळे, अनिल एकचपुरे, संजू लोखंडे, प्रदीप निंबाळक, डॉ. नलावडे, अशोक लोंढे, अजित नाईकनवरे उपस्थित होते.

## निधन वृत्त...

### शाहू पवार



**सोलापूर, दि. १५ एप्रिल-**

डुमणे नगर बाळे येथील तथा माजी मंडल कृषी अधिकारी शाहू धोंडीबा पवार (वय ६०) यांचे पुणे येथे निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, मुलगी, मुलगा, सून, नातवंडे, भाऊ असा परिवार आहे. कृषी सहायक शरद पवार व शीतल पवार यांचे वडील होते. त्यांच्यावर सोमवारी (ता. १३) बाळे येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

### शारदाबाई हंचनाळे



**सोलापूर, दि. १५ एप्रिल-**

शूक्रवार पेठ येथील शारदाबाई सिद्रामप्पा हंचनाळे (वय ६८) यांचे बुधवारी अल्पशा आजाराने निधन झाले,त्यांच्या पश्चात पती, ३ मुली, सुन जावई, नातवंडे असा परिवार आहे. तुळजापूर वेस येथील रुद्रभूमीत दुपारी त्याच्या पर्थिवावर अंत्यसंस्कार झाले.

### कांताबाई तिकोटे



**सोलापूर, दि. १५ एप्रिल-**

मड्डी वस्ती, भवानी पेठ येथील कांताबाई तिकोटे वय (८०) यांचे आकस्मित निधन झाले. बुधवारी दुपारी त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात मुलगा, मुलगी, सून, नातवंडे असा मोठा परिवार आहे. कांताबाई तिकोटे या सोलापूर महानगरपालिकेच्या माजी सफाई कर्मचारी होत्या.

### अन्नपूर्णा नारा



**सोलापूर, दि. १५ एप्रिल-**

जुना विडी घरकुलच्या एच ग्रुप भागातील, गं.भा. अन्नपूर्णा अंबाजी नारा, (वय ७८) यांचे बुधवारी १५ एप्रिल रोजी निधन झाले. त्यांच्या पश्चात मुले, सुना, मुली, जावई, नातवंडे, परतवंडे असा परिवार आहे. त्यांच्यावर गुरुवार, दि. १६ एप्रिल सकाळी १० वाजता अक्कलकोट रस्त्यावरील पद्मशाली स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत. महालक्ष्मी मंडप व साउंड सर्व्हिसचे आनंद नारा व रामकृष्ण नारांच्या त्या मातोश्री होत.

# उमाबाई श्राविकेचा बाल वैज्ञानिक आयान तांबोळीला कांस्य पदक

### डॉ. होमी भाभा बालवैज्ञानिक स्पर्धेतील कामगिरी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १५ एप्रिल-**

ग्रेटर बॉम्बे सायन्स टीचर्स असोसिएशनतर्फे आयोजित अतिशय प्रतिष्ठित अशा 'डॉ. होमी भाभा बालवैज्ञानिक स्पर्धेत उमाबाई श्राविका व कनिष्ठ महाविद्यालयाचा इयत्ता ६ वीचा विद्यार्थी आयान हरूण तांबोळी याने कांस्य पदक पटकावून जिल्ह्याची मान उंचावली.

पर्यावरणपूरक संशोधनावर सखोल अभ्यास करून त्याने मांडलेल्या सविस्तर प्रबंधाची दखल घेत मुंबईत झालेल्या यशवंतराव नाट्य सभागृहामध्ये त्याला कांस्य, प्रमाणपत्र आणि रोख रक्कम देऊन गौरविण्यात आले. हा प्रकल्प सादर करण्यासाठी मुख्याध्यापक सुकुमार मोहोळे, दीप्ती शहा, उपमुख्याध्यापिका पंडित मॅडम, पर्यवेक्षक बाळासाहेब पौळ, वर्गशिक्षिका पल्लवी खांडवे, विज्ञान विषयशिक्षिका उपाध्ये,



सोनटक्के, बेळळे व स्पर्धा परीक्षा विभाग प्रमुख पाटील यांचेही मार्गदर्शन लाभले.

ही स्पर्धा लेखी, प्रात्यक्षिक आणि प्रकल्प व मुलाखत तीन कठीण टप्प्यांत घेतली होती. आयानने केवळ समस्या मांडून न थांबता प्रशासनाकडे पाठपुरावाही केला आहे. त्याने ग्रामपंचायत आणि नगरसेवक यांना भेटून सार्वजनिक ठिकाणी तात्पुरत्या कचरा कुंड्या बसवण्याची विनंती केली. सामाजिक संस्थांना 'अन्नदान' किंवा 'पाणी वाटप' करताना प्लास्टिक प्लेट्स व कपांऐवजी पर्यावरणपूरक पर्यायांचा वापर करण्याचे आवाहन केले. त्याच्या या पुढाकारामुळे सोलापूर महानगरपालिका हद्दीत कचरा कुंड्या बसवण्याचे आश्वासनही त्याला मिळाले.

### अविघटनशील प्लास्टिक कचऱ्याचे कृषी क्षेत्रावरील दुष्परिणाम

आयानने एक क्षेत्रीय अभ्यास ह्या विषयाअंतर्गत कोजागिरी पौर्णिमेच्या वेळेस सोलापूर ते तुळजापूर पायी चालत जाणाऱ्या भाविकांच्या यात्रेनंतर निर्माण होणाऱ्या प्लास्टिक कचऱ्याचे जमिनीवर होणारे दुष्परिणाम शोधून त्यावरील उपाययोजना असा शोधप्रबंध सादर केला होता. या प्रकल्पासाठी या मार्गावरील शेतकऱ्यांच्या मुलाखती घेऊन या प्लास्टिक कचऱ्याचे जमिनीवर होणारे दुष्परिणाम जाणून घेतले व यावर उपाययोजना म्हणून केवळ अभ्यासच नाही, तर प्रत्यक्ष कृती करून दाखवली.



## रोहिणी चौधरी यांना कृतीनिष्ठ शिक्षक पुरस्कार प्रदान

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १५ एप्रिल-**

मरवडे (ता. मंगळवेढा, जि. सोलापूर) येथे छत्रपती परिवार मरवडे यांच्या वतीने आयोजित जिल्हास्तरीय कृतीनिष्ठ शिक्षक पुरस्कार प्रदान सोहळा उत्साहात पार पडला. या सोहळ्यात नूमवि मराठी शाळेच्या शिक्षिका रोहिणी चौधरी यांना कृतीनिष्ठ शिक्षक पुरस्कार वर्षा केनवडे (राज्याध्यक्षा, महिला आघाडी प्राथमिक शिक्षक समिती) यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला.

कार्यक्रमास माजी शिक्षक आ. दत्तात्रय सावंत, प्रा. शिवाजीराव काळुंगे तसेच माजी पालकमंत्री प्रा. लक्ष्मणराव ढोबळे यांची प्रमुख उपस्थिती लाभली. कार्यक्रमाचे आयोजन सुरेश पवार गुरुजी यांनी केले. चौधरी यांच्या या यशाबद्दल शाळा समितीचे अध्यक्ष मनोज भालेराव, नियमक मंडळाचे सदस्य सुरेश बाबू मंकणी, शाळेच्या मुख्याध्यापिका स्मिता माळवदकर यांनी त्यांचे अभिनंदन केले.



## बावकरवाडी ग्रामस्थांकडून अमोल भोराळे यांचा अक्कलकोटमध्ये सत्कार

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. १५ एप्रिल-**

एका शिक्षकाने आयुष्यभर दिलेली सेवा आणि त्यागाची पावती ही केवळ पुरस्कारात नसून, ग्रामस्थांच्या प्रेमात असते, याचा प्रत्यय नुकताच अक्कलकोट येथे आला. बावकरवाडी (ता. अक्कलकोट) येथून बदली झालेले शिक्षक अमोल गुरुनाथ भोराळे यांचा जुन्या शाळेतील शिक्षक आणि ग्रामस्थांच्या वतीने एका सोहळ्यात सन्मान करण्यात आला.

श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे अमोलराजे जन्मेजयराजे भोसले यांच्या हस्ते हा सत्कार पार पडला. यावेळी अक्कलकोटचे उपसभापती सागर कल्याणशेट्टी, सरपंच वर्षा भंडारकवठे, युवा नेते अभिजित पाटील, शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष नागेश बावकर, ज्योतिबा जाधव आणि कृषी अधिकारी प्रकाश जाधव उपस्थित होते.

# अवघ्या दोन दिवसांत जबरी चोरीचा पर्दाफाश

### साडेनऊ लाखांचा मुद्देमाल जप्त, दोघे आरोपी अटकेत

**तभा वृत्तसेवा,**
**टेंभुर्णी, दि. १५ एप्रिल-**

टेंभुर्णी पोलीस ठाण्याने जबरी चोरीचा गुन्हा अवघ्या दोन दिवसांत उघडकीस आणत साडेनऊ लाखांचा मुद्देमाल जप्त केला असून दोन आरोपींना अटक केली आहे. यामध्ये सहा तोळ्यांची सोन्याची चैन (अंदाजे साडेचार लाख रुपये) व गुन्ह्यात वापरलेले वाहन जप्त करण्यात आले आहे.

दि. ११ एप्रिल रोजी रात्री वरवडे ते व्होळे (ता. माढा) रस्त्यावर व्होळे गावाजवळील पुलाजवळ फिर्यादी ऋषिकेश अर्जुन गाडे (वय २९, रा. गुंफावाडी, ता. लातूर) हे मित्रासह जात असताना तीन अनोळखी इसमांनी बिगर नंबर प्लेटच्या मोटारसायकलवर येत त्यांची गाडी आडवी लावली. आमच्यावर का थुंकला? असा बहाणा करून फिर्यादी व त्याच्या मित्राला गाडीतून खाली ओढून मारहाण केली. त्यानंतर फिर्यादीच्या गळ्यातील सहा तोळ्यांची सोन्याची चैन (अंदाजे साडेचार लाख रुपये) जबरदस्तीने ओढून नेली. तसेच मित्र सुनील यालाही मारहाण करून त्यांच्याकडील दोन मोबाईल



असा एकूण सुमारे चार लाख पासष्ट हजार रुपयांचा ऐवज लंपास करण्यात आला.

या प्रकरणी टेंभुर्णी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. गुन्ह्याच्या तपासासाठी सहाय्यक पोलीस अधीक्षक राहुल आत्राम (आयपीएस) यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक गणेश चौधरी यांच्याकडे तपास सोपविण्यात आला. शिरूर तालुक्यातील निमोणे परिसरात शोधमोहीम राबवून पिंटू उर्फ लक्ष्मण भीमा गायकवाड (वय ३०) व योगेश अनिल भोसले (वय २१) यांना ताब्यात घेण्यात आले. चौकशीत त्यांनी गुन्ह्याची कबुली दिल्यानंतर त्यांच्याकडून चोरीस गेलेली सहा तोळ्यांची सोन्याची चैन (साडेचार लाख रुपये) हस्तगत करण्यात आली. तसेच गुन्ह्यात वापरलेले अशोक लेलँड 'बडा दोस्त' वाहन (क्रमांक एमएच तेरा डी क्यू नऊ सात दोन तीन) जप्त करण्यात आले. एकूण साडेनऊ लाख रुपयांचा मुद्देमाल पोलिसांनी हस्तगत केला आहे. सदर कारवाई पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी, अपर पोलीस अधीक्षक प्रीतम यावलकर, सहाय्यक पोलीस अधीक्षक अंजना कृष्णा (करमाळा उपविभाग) व राहुल आत्राम यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक गणेश चौधरी, पोलीस हवालदार विलास नलावडे, संदीप गिरमकर, सुरज मुलाणी, मोहन तळेकर तसेच सायबर पोलीस ठाण्याचे हवालदार व्यंकटेश मोरे यांच्या पथकाने केली. या गुन्ह्याचा पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक गणेश चौधरी करीत आहेत.

# खाकी वर्दीतील शेतकऱ्याचा सेंद्रिय पॅटर्न

### 'पोलिस किसान' उपक्रमांतर्गत बार्शीत सेंद्रिय वेलची केळी विक्रीचा शुभारंभ




**तभा वृत्तसेवा,**
**वैराग, दि. १५ एप्रिल-**

समाजाचे रक्षण करण्यासोबतच समाजाला विषमुक्त आणि सकस आहार मिळावा, या उद्देशाने पोलिस किसान ही संकल्पना आता प्रत्यक्षात उतरताना दिसत आहे. सोलापूरचे पोलीस अतुल कुलकर्णी यांच्या प्रेरणेने आणि पोलीस किसान संस्थेचे संस्थापक, सेवानिवृत्त डीवायएसपी नानासाहेब कदम यांच्या मार्गदर्शनाखाली एका पोलीस हवालदाराने शेतीमध्ये यशस्वी प्रयोग केला आहे.

बार्शी तालुक्यातील ढेंबरेवाडी येथील रहिवासी आणि वैराग पोलीस ठाण्यात पोलीस हवालदार म्हणून कार्यरत असलेले जराचंद हरीदास काळेल यांनी आपल्या कुटुंबासह स्वतःच्या शेतात पूर्णतः सेंद्रिय पद्धतीने वेलची केळीचे उत्पादन घेतले आहे. या विषमुक्त सेंद्रिय केळीला थेट बाजारपेठ मिळावी आणि ग्राहकांना उत्तम दर्जाची केळी मिळावी, यासाठी बार्शीतील व्ही. के. मार्ट येथे 'शेतकरी ते थेट ग्राहक' विक्री केंद्राचा शुभारंभ मोठ्या उत्साहात करण्यात आला. या उपक्रमाचे उद्घाटन बार्शी शहर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक बालाजी कुकडे यांच्या हस्ते पार पडले. यावेळी पोलीस किसान संस्थेचे संस्थापक नानासाहेब कदम, आई लक्ष्मी कळेल, वडिल हरिदास काळेल, भाऊ नवनाथ काळेल उपस्थित होते.

### घरपोच सेवा उपलब्ध

बार्शीतील नागरिकांना ही विषमुक्त सेंद्रिय वेलची केळी हवी असल्यास घरपोच सेवा (Home Delivery) देखील उपलब्ध करून देण्यात आली आहे.

पोलीस दलात काम करत असताना समाजाप्रती असलेले उत्तरदायित्व म्हणून आम्ही हा विषमुक्त अन्नाचा प्रयोग केला आहे. समाजाला सकस आहार मिळावा हाच यामागचा मुख्य उद्देश आहे.

**जराचंद काळेल** (सेंद्रिय शेतकरी व पोलीस हवालदार)

## श्री स्वामी समर्थ महाराजांच्या चरणी पं. हेमंत पेंडसे यांची स्वरपूजा

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. १५ एप्रिल-**

श्री स्वामी समर्थांच्या १४८ व्या पुण्यतिथी निमित्ताने येथील श्री वटवृक्ष स्वामी महासज मंदिरात आयोजित करण्यात आलेल्या धर्मसंकीर्तन महोत्सवाची सांगता मुंबई येथील पद्मश्री जितेंद्र अभिषेकी यांचे शिष्य ख्यातनाम गायक पं.हेमंत पेंडसे यांच्या सुरेल स्वरपूजेने झाली.

गायन सेवेच्या सुरुवातीला सर्व कलाकारांचा परिचय ओंकार पाठक यांनी करत वटवृक्ष देवस्थान अक्कलकोट यांचेवतीने सर्व कलाकारांचा अध्यक्ष महेश मालक इंगळे यांच्या हस्ते कृपावस्त्र देऊन सत्कार करण्यात आला.

यानंतर गायक पं.हेमंत पेंडसे यांच्या गायनाला सुरुवात झाली. सुरुवातीला हिंडोल रागातील रागमाला गात उपस्थित श्रोत्यांना अभिजात शास्त्रीय संगीताची मेजवानी दिली. त्यानंतर सुंदर भक्ती रचना त्यामध्ये आधी रचिली पंढरी, अबीर गुलाल उधळीत रंग, आम्ही



विठ्ठलाचे वारकरी, रंगी रंगिली राधा, मन राम रंगी रंगले, सुखाचे जे सुख, आदी अजरामर रचना गात अक्कलकोट स्वामी भक्तांना स्वरांनी चिंब करत कैवल्याच्या चांदण्याला भुकेला चकोर या अजरामर भैरवीने गायन सेवेसह १४८ व्या श्री स्वामी समर्थांच्या पुण्यतिथी महोत्सवानिमीत्त आयोजीत धर्मसंकीर्तन महोत्सवाची सांगता मोठ्या भक्तीभावात केली. त्यांना तितकीच सुंदर साथसंगत हार्मोनियमवर ओंकार पाठक, तबल्यावर नितीन दिवाकर, पखवाजवर ज्ञानेश्वर दुधाणे, टाळवर अक्षय सरदेशमुख स्वरसाथ यश कोल्हापूरे, देशमुख यांनी केली. यावेळी वटवृक्ष देवस्थानचे प्रथमेश इंगळे, सचिव आत्माराम घाटगे, विश्वस्त संपतराव शिंदे महेश गोगी, उज्वलाताई सरदेशमुख, श्रीशैल गवंडी, प्रा. शिवशरण अचलेर, बाळासाहेब कुलकर्णी, दिपक जरीपटके, सुनिल पवार, सुरेश भोसले, रमेश शिंदे, अमर पाटील, प्रसाद पाटील, स्वामीनाथ लोणारी, प्रकाश कासेगांवकर, मनोज जाधव, सागर गोंडाळ, विपूल जाधव उपस्थित होते.

# टेंभुर्णी येथे नारीशक्ती वंदन विधेयकाच्या समर्थनार्थ रॅली

### हजारो महिलांचा उत्स्फूर्त सहभाग

**तभा वृत्तसेवा,**
**टेंभुर्णी, दि. १५ एप्रिल-**

टेंभुर्णी येथे नारीशक्ती वंदन या ऐतिहासिक विधेयकाच्या समर्थनार्थ भव्य महिला रॅली मोठ्या उत्साहात पार पडली. विविध स्तरांतील महिला, विद्यार्थिनी व महिला पदाधिकाऱ्यांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवत महिला सक्षमीकरणाचा ठोस संदेश दिला.

रॅलीचे उद्घाटन मान्यवरांच्या हस्ते भारत माता, राजमाता जिजाऊ तसेच क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करून करण्यात आले. यावेळी देशातील महिलांच्या



सन्मान व सक्षमीकरणासाठी पारित करण्यात आलेल्या नारीशक्ती वंदन विधेयकाचे स्वागत करण्यात आले.

कार्यक्रमादरम्यान विशेष आकर्षण ठरलेल्या स्वाक्षरी भिंती वर महिलांनी स्वाक्षऱ्या करून या ऐतिहासिक निर्णयाला पाठिंबा दर्शविला. तसेच देशाचे माननीय पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे आभार मानत महिलांच्या राजकीय सक्षमीकरणासाठी हा निर्णय महत्त्वाचा असल्याचे मत व्यक्त केले.

कार्यक्रमात नीता मगर व जगताप यांनीही मनोगत व्यक्त करत या विधेयकाबद्दल समाधान व्यक्त केले. रॅलीची सुरुवात करमाळा रोड येथील सनराईज स्कूलपासून करण्यात आली. रॅली दरम्यान धन्यवाद मोदीजी तसेच महिला सक्षमीकरणाचे संदेश देणारे विविध फलक व घोषणाबाजी हे आकर्षण ठरले. रॅलीत धनश्री खटके, दिपाली बाळासाहेब देशमुख, मंगल खडके, सविता जगताप, सुवर्णा देशमुख, वंदना चौधरी, मनीषा काळे, अनिता आजिनाथ लोंढे, नीता मगर, सुजाता शंकर वगरे, पूजा गांधी, अनिता जाधव, अर्चना सावंत, आशा निमसे, उर्मिला बारबोले, मीनाक्षी पाटणे, राजश्री नेवसे, स्वरालीताई बोबडे उपस्थित होत्या.

CMYK

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत

https://epaper.dainiktarunbharat.com/



# पाणी निचरा, कचरा व बायो एनर्जीवर उपाययोजना करा

### आयुक्त सचिन ओम्बासे यांचे निर्देश : कचरा डेपो परिसरात वृक्षारोपणाचे आदेश



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १५ एप्रिल-**

शहरातील नागरी सुविधांचा दर्जा उंचावण्यासाठी महानगरपालिकेच्या विविध कामांची आयुक्त सचिन ओम्बासे यांनी प्रत्यक्ष पाहणी करत अधिकाऱ्यांना ठोस सूचना दिल्या. पाणी निचरा, कचरा व्यवस्थापन आणि बायो एनर्जी प्रकल्पातील त्रुटींवर लक्ष केंद्रित करत नागरिकांच्या अडचणी कमी करण्यासाठी तातडीने उपाययोजना राबविण्याचे निर्देश महापालिका आयुक्त डॉ सचिन ओम्बासे यांनी दिले.

शहरातील नागरी सुविधांचा दर्जा उंचावण्यासाठी आणि नागरिकांना होणाऱ्या अडचणी कमी करण्याच्या दृष्टीने सोलापूर महानगरपालिकेच्या विविध कामांची आज आयुक्त सचिन ओम्बासे यांनी पाहणी करून संबंधित अधिकाऱ्यांना आवश्यक सूचना दिल्या. यावेळी सहायक आयुक्त शशिकांत भोसले, मुख्य सफाई अधीक्षक अनिल चराटे, विभागीय अधिकारी राघवेंद्र गायधनकर, कनिष्ठ अभियंता लायका मनगोळी, चेतन प्रचंडे, उद्यान अधीक्षक कोमल काशिद, प्र. उद्यान अधीक्षक स्वप्नील सोलंकर, उद्यान सुपरवायझर सुहास शिंदे, सहाय्यक निरीक्षक दारफळे, मुख्य आरोग्य निरीक्षक नल्ला बंधू यांच्यासह इतर अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

नाना-नानी पार्क परिसरात पावसाळ्यात साचणाऱ्या पाण्याच्या समस्येवर उपाययोजना म्हणून पार्कमधून सोमपा परिवहन विभागालगत असलेल्या नाल्यात पाणी सोडण्यासाठी मिनी कॅनल (कालवा) तयार करण्यात आला आहे. या माध्यमातून पार्कसमोरील साचलेले पाणी थेट नाल्यात सोडले जाणार असून उद्यानात पाणी साचून लहान मुले व ज्येष्ठ नागरिकांना होणारा त्रास टाळण्यावर भर देण्यात आला आहे. यावेळी पाण्याचा निचरा योग्य पद्धतीने होईल आणि सुरक्षेच्या दृष्टीनेही आवश्यक उपाययोजना करण्यात याव्यात, अशा सूचना आयुक्तांनी दिल्या. तसेच लगतच्या टेनिस कोर्टची पाहणी केली .पार्कमधील आकांक्षी शौचालयाचीही पाहणी करून पाण्याची कमतरता भासू नये यासाठी स्वतंत्र बोअरवेल उभारण्याच्या सूचनाही देण्यात आल्या.

त्यानंतर आयुक्तांनी इंद्रधनु सोसायटी परिसरातील कचरा ट्रान्सफर प्रकल्पाची पाहणी केली. यापूर्वी देगाव, दमानी नगर, थोबडे वस्ती व परिसरातील कचरा उघड्या रॅम्पवरून छोट्या वाहनांमधून मोठ्या आरसी गाडीत टाकताना कचरा उडून परिसरात पसरण्याची समस्या निर्माण होत होती. या पार्श्वभूमीवर आता त्या ठिकाणी संरक्षित मोठा हॉल उभारण्यात आला असून त्यामुळे कचरा इतरत्र न पसरता योग्य पद्धतीने संकलित व वाहतूक करता येणार आहे. या कामाबाबतही आयुक्तांनी समाधान व्यक्त करत पुढील आवश्यक सुधारणा करण्याच्या सूचना दिल्या.

तुळजापूर रोड येथील बायो एनर्जी प्लांटचीही आयुक्तांनी पाहणी केली. या प्लांटमध्ये कचऱ्याचा पुनर्वापर करून ऊर्जा निर्मिती केली जात असली तरी उर्वरित कचऱ्याचे ढीग बाहेर मोठ्या प्रमाणात साचत असल्याचे निदर्शनास आले. त्यामुळे हा कचरा इतरत्र न पसरता त्याची योग्य विल्हेवाट लावावी, अशा सूचना आयुक्तांनी दिल्या. तसेच कचरा डेपो परिसरातील रस्त्यांच्या दुतर्फा वृक्षारोपण करण्याचेही निर्देश देण्यात आले.

**पाहणीतील महत्त्वाचे मुद्दे**

- नाना-नानी पार्कमध्ये पाणी साचण्यावर उपाय म्हणून मिनी कॅनलची उभारणी करा
- पार्क व टेनिस कोर्ट परिसरात सुरक्षिततेच्या उपाययोजनांवर भर
- आकांक्षी शौचालयासाठी स्वतंत्र बोअरवेल उभारण्याचे आदेश
- इंद्रधनु सोसायटी परिसरात कचरा ट्रान्सफर प्रकल्पासाठी संरक्षित हॉल
- कचरा उडून पसरण्याची समस्या कमी करण्यासाठी सुधारित व्यवस्था
- तुळजापूर रोडवरील बायो एनर्जी प्लांटमध्ये साचणाऱ्या कचऱ्यावर उपाययोजना करणे
- कचरा डेपो परिसरात वृक्षारोपणाचे आदेश

# २ मेपासून बेकायदेशीर पार्किंगवर कारवाई

### मुख्य रस्ते, विविध ठिकाणी वाहने उभी केल्यास होणार दंड : आयुक्त डॉ. ओम्बासे

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १५ एप्रिल-**



शहरातील मुख्य रस्ते व विविध ठिकाणी बेकायदेशीररीत्या दुचाकी व चारचाकी वाहने उभी करून वाहतुकीस अडथळा निर्माण करणाऱ्यांवर सोलापूर महानगरपालिकेकडून कडक कारवाई करण्यात येणार आहे.

नागरिकांकडून वारंवार येणाऱ्या तक्रारी, वाढती वाहतूक कोंडी आणि अपघातांचा धोका लक्षात घेऊन महापालिका प्रशासनाने ही मोहीम हाती घेतली आहे. आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी हा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. महानगरपालिकेच्या अतिक्रमण, घनकचरा व्यवस्थापन विभाग आणि वाहतूक विभागाच्या संयुक्त विद्यमाने ही विशेष कारवाई राबविण्यात येणार असून, नियमभंग करणाऱ्या वाहनांवर दंडासह जप्तीची कारवाई करण्यात येईल. बेकायदेशीररीत्या उभी केलेली वाहने तात्काळ जप्त करण्यात येणार असून, संबंधित दंड व खर्च भरल्यानंतरच ती परत मिळणार आहेत. ही मोहीम दि. २ मे पासून सुरू करण्यात येणार असून, नागरिकांनी आपली वाहने रस्त्यावर उभी न करता नियोजित ठिकाणी पार्किंग करावे व वाहतुकीस सहकार्य करावे, अधिक माहितीसाठी smccommissioneryahoo.com या ई-मेलवर संपर्क साधावा, असे आवाहन महापालिकेचे आयुक्त डॉ. ओम्बासे यांनी केले आहे.

**अशी आहे दंडाची रक्कम**

दुचाकी वाहनांसाठी १,५०० रुपये दंड व ५०० रुपये जप्ती/हाताळणी खर्च - २ हजार रुपये तर चारचाकी वाहनांसाठी ५ हजार रुपये दंड व २ हजार रुपये जप्ती/हाताळणी खर्च एकूण रक्कम ७ हजार.

## महत्वाचे...

### लक्ष्मी सरवदे यांना उत्कृष्ट महिला सरपंचरत्न पुरस्कार जाहीर

**जेऊर दि.१५ एप्रिल-**



करमाळा तालुक्यातील घारगाव ग्रामपंचायतीच्या विद्यमान ग्रामपंचायत सदस्या तथा माजी सरपंच लक्ष्मी संजय सरवदे यांना सामाजिक, शिक्षण, आरोग्य, पर्यावरण, प्रशासन यामध्ये एकात्मिक दृष्टिकोन ठेवून केलेल्या कार्यामुळे शिवस्वराज्य युवा संघटन महाराष्ट्र राज्य यांच्या मार्फत २०२६ चा राज्यस्तरीय शिवस्वराज्य पंढरीरत्न उत्कृष्ट महिला सरपंचरत्न पुरस्कार जाहीर झाला आहे. निवड पत्र अध्यक्ष श्री संदीप राजे मुटकुले पाटील यांनी दिले आहे हा गौरवाचा सोहळा दिनांक १९ एप्रिल रोजी योगभवन एलआयसी ऑफिसच्या पाठीमागे, गयामाता नगर पंढरपूर या ठिकाणी पार पडणार आहे या पुरस्कार समारंभाचे आयोजन शिवस्वराज्य युवा संघटन महाराष्ट्र राज्य यांच्याकडून आठवा वर्धापन दिनानिमित्त करण्यात आले आहे.

### बंधपत्राच्या कालावधीतच पुन्हा गुन्हा दाखल; युवकाची कारागृहात रवानगी

**सोलापूर, दि.१५ एप्रिल-**

शरीराविषयी गुन्हे तसेच बेकायदेशीर कृत्यांमध्ये सातत्याने सहभागी असलेल्या साहील सैफन शेख (वय २२ वर्ष, रा. धनलक्ष्मी नगर, कल्पना नगरच्या पाठीमागे, सोलापूर) याची अखेर सोलापूर जिल्हा मध्यवर्ती कारागृहात रवानगी करण्यात आली आहे. साहील शेख याच्याविरुद्ध सन २०२५ व २०२६ या कालावधीत बेकायदेशीर शस्त्र बाळगणे, मारामारी करणे व दुखापत करणे यांसारखे गंभीर गुन्हे दाखल झाले होते. या पार्श्वभूमीवर एमआयडीसी पोलीस ठाण्याने भारतीय नागरिक सुरक्षा संहिता कलम १२६ अन्वये विशेष कार्यकारी दंडाधिकारी तथा पोलीस उपायुक्त परिमंडळ विजय कबाडे यांच्याकडे प्रस्ताव सादर केला होता. त्याअन्वये, संबंधित आरोपीकडून भारतीय नागरिक सुरक्षा संहिता कलम १३६ नुसार सार्वजनिक शांतता राखण्याच्या अटीवर २५ हजार रुपयांचे एक वर्ष मुदतीचे बंधपत्र घेण्यात आले होते. मात्र, बंधपत्राच्या कालावधीतच त्याच्यावर पुन्हा गुन्हा दाखल झाल्याने त्याला २५ हजार रुपयांचा दंड भरण्याची नोटीस देण्यात आली होती. मात्र पर्याप्त संधी देऊनही त्याने निर्धारित मुदतीत आपले म्हणणे सादर केले नाही व दंडही भरला नाही. त्यामुळे विजय कबाडे यांनी साहील शेख याला सोलापूर जिल्हा मध्यवर्ती कारागृहात ठेवण्याचे आदेश दिले आहेत.



# सोलापूर प्राईव्हेट हॉस्पिटल ओनर्सतर्फे

## १५ क्षयरुग्णांना पोषण आहार किट

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १५ एप्रिल-**

राष्ट्रीय क्षयरोग निर्मूलन कार्यक्रमांतर्गत सुरू असलेल्या १०० दिवसीय प्रधानमंत्री टीबी मुक्त भारत अभियान (टप्पा-२) यशस्वी करण्यासाठी सोलापूर प्राईव्हेट हॉस्पिटल ओनर्स असोसिएशनच्या वतीने शहर क्षयरोग केंद्रातील १५ क्षयरुग्णांना सहा महिन्यांसाठी पोषण आहार किटचे वाटप करण्यात आले. असोसिएशनचे अध्यक्ष डॉ. संजय मंठाळे, सचिव डॉ. निशिकांत मस्के, सदस्य डॉ. प्रकाश घाटोळे, डॉ. ज्योती चिडगुपकर यांच्यासह एनटीईपी कर्मचारी उपस्थित होते.

शहरात २४ मार्चपासून सुरू झालेल्या या अभियानाच्या पार्श्वभूमीवर सामाजिक उत्तरदायित्व जपत सोलापूर प्राईव्हेट हॉस्पिटल ओनर्स असोसिएशनने हा स्तुत्य उपक्रम राबवला. वितरित करण्यात आलेल्या किटमध्ये मटकी एक किलो, हिरवा मूग एक किलो, सोयाबीन वडी एक किलो, शेंगदाणे एक किलो, गुळ एक किलो, हिरवा वाटाणा १०० ग्रॅम, चणा १०० ग्रॅम आणि खजूर ५०० ग्रॅम यांचा समावेश आहे. समाजातील प्रतिष्ठित व्यक्ती, दानशूर नागरिक, स्वयंसेवी संस्था, कॉर्पोरेट क्षेत्रातील संस्था, लोकप्रतिनिधी आणि समाजसेवक यांनी पुढाकार घेत 'निक्षय मित्र' बनून क्षयरुग्णांना पोषण आहारासाठी सहाय्य करावे, असे आवाहन यावेळी प्रमुख पाहुणे डॉ. राजा येवले (नवी दिल्ली), डॉ. आनंद श्रीधरन (नवी दिल्ली) तसेच शहर क्षयरोग अधिकारी डॉ. अरूंधती हराळकर यांनी केले आहे.



### पतीवर संशय घेऊन पत्नीने पिले फवारणीचे औषध

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १५ एप्रिल-**

पतीवर संशय घेऊन एका पत्नीने रागाच्या भरात गवतावर फवारणी करण्याचे औषध पिल्याची घटना अक्कलकोट तालुक्यातील जेऊर गावात आज बुधवारी सकाळी घडली. दिपाली बसवराज पाटील (वय २५ वर्ष, रा. जेऊर) असे त्या पत्नीचे नाव असून आज बुधवारी सकाळी घरामध्ये तिने नवऱ्यावर संशय घेतला व रागाच्या भरात गवतावर फवारणी करण्याचे औषध पिऊन टाकले. याचा त्रास होऊ लागल्याने तिला उपचाराकरिता शासकीय रुग्णालयात पती बसवराज यांनी दाखल केले.

सोलापूरकरांच्या अंगाची लाहीऽऽ लाही...

# पारा ४३.३ अंशांवर, रात्रीही उकाडा कायम

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १५ एप्रिल-**



राज्यात उन्हाचा कडाका दिवसेंदिवस वाढत असताना सोलापूर जिल्ह्याला उष्णतेच्या लाटेने अक्षरशः होरपळून काढले आहे. सोलापूरचे कमाल तापमान ४३.३ अंश सेल्सिअस इतके नोंदवण्यात आले असून, वाढत्या उष्म्यामुळे जनजीवन विस्कळीत झाले आहे. केवळ दिवसच नव्हे, तर रात्रीचे तापमानही सरासरीपेक्षा अधिक असल्याने नागरिकांना दुहेरी संकटाचा सामना करावा लागत आहे.

शहरात सकाळपासूनच सूर्याच्या तीव्र झळा लागण्यास सुरुवात होते. दुपारी १२ ते ४ या वेळेत रस्ते ओस पडत असून, नागरिकांनी घराबाहेर पडणे टाळले आहे. त्यातच किमान तापमान २६.५ अंश सेल्सिअसवर पोहोचल्याने रात्रीच्या वेळीही मोठ्या प्रमाणात उकाडा जाणवत आहे. जमिनीतून निघणाऱ्या उष्ण वाफांमुळे घरांमध्ये राहणेही कठीण झाले आहे. उन्हाच्या तीव्रतेमुळे शीतपेये, रसवंती गृहे, कलिंगड विक्रीच्या दुकानांवर गर्दी दिसत आहे. मात्र, इतर व्यावसायिक प्रतिष्ठानांमध्ये दुपारच्या वेळी शुकशुकाट पाहायला मिळत आहे. येत्या काही दिवसांत तापमानाचा हा पारा आणखी वाढण्याची शक्यता हवामान विभागाकडून वर्तवण्यात आली आहे.

# सुयश सेंट्रल स्कूलचा अथर्व दळवे प्रथम

**सोलापूर, दि. १५ एप्रिल-**

केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळ (सीबीएसई), नवी दिल्लीच्या दहावीच्या परीक्षेत सुयश सेंट्रल स्कूलच्या अथर्व दळवे याने ९५ टक्के गुण मिळवून प्रथम आला.




स्कूल मधील ३५ पैकी ३४ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. ९० टक्केहून आधिक गुण १० विद्यार्थ्यांनी मिळविले अभ्यासातील गुणवत्तेसोबत खेळ, कला व कौशल्यावर त्यांनी यश मिळविले. यात शिक्षक व पालकांचा मोठा वाटा आहे. यशस्वी विद्यार्थ्यांचे मुख्याध्यापिका विद्या शिंदे यांनी अभिनंदन केले. **यशस्वी विद्यार्थी (कंसात टक्केवारी) :** अथर्व दळवे (९५), अद्वैत पाटील (९३.८), आर्यन परडे (९३.३), पृथ्वीराज जाधव (९१), सार्थक शिंदे (९१).

# बार्शीत २६ वर्षीय नर्तिकेवर नवऱ्याने केला चाकूने हल्ला

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. १५ एप्रिल-**


येथील रेणुका कला केंद्र, जामगाव (आ) ता. बार्शी येथे राहणाऱ्या २६ वर्षीय नर्तिका अश्विनी नागेश उर्फ नंग्या काळे यांच्यावर तिच्या नवऱ्याने चाकूसारखा दिसणारा लोखंडी भाला घेऊन जीवे मारण्याच्या उद्देशाने हल्ला केला.

ही घटना १४ एप्रिल रोजी सायंकाळी पाच वाजण्याच्या सुमारास घडली. अश्विनी यांना छातीच्या उजव्या बाजूला, पोटाच्या डाव्या बाजूला, डाव्या हाताच्या बोटावर आणि पाठीवर वार करुन गंभीर जखमी करण्यात आले. सध्या त्यांच्यावर जगदाळे मामा हॉस्पिटल, बार्शी येथे उपचार सुरु आहेत. अश्विनी काळे यांचे लग्न जितेंद्र भोसले (रा. घाटपिंपरी, ता. वाशी, जि. धाराशिव) यांच्याशी झाले असून त्यांना वैष्णवी आणि महेश्वरी अशा दोन मुली आहेत. नवरा करण जितेंद्र भोसले यांना कोणतेही कामधंदा नसल्याने आणि दारुच्या व्यसनामुळे अश्विनी यांना उपजीविकेसाठी नर्तिकेचे काम करावे लागत होते.

अश्विनी यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, नवरा करण याने तिला वारंवार फोनवरुन कला केंद्रात काम करू नको, माझ्यासोबत घरी ये, असे सांगत धमक्या देत होता. तू आली नाहीस तर खलास करतो, अशीही धमकी दिली होती. १४ एप्रिल रोजी दुपारी करण याने रेणुका कला केंद्रातील अश्विनी यांच्या खोलीत येऊन तिला गावाकडे घरी जाण्यास सांगितले. अश्विनी यांनी कामधंदा नसल्याने आणि दारु पिण्याच्या सवयीमुळे सोबत जाण्यास नकार दिला. यावरुन दोघांमध्ये बराच वेळ भांडण झाले. करण याने मोठमोठ्याने ओरडा, शिवीगाळ आणि हाताने मारहाण सुरु केली. अश्विनी यांनी प्रतिकार करत त्याला भिंतीवर ढकलले. त्यानंतर करण याने अश्विनी यांना खोलीत ओढले आणि तुला जिवेच मारतो असे म्हणत कमरेला असलेला चाकूसारखा लोखंडी भाला उपसून वार केले.

यावेळी अश्विनी यांनी मोठ्याने वाचवा, वाचवा अशी आरोळी दिली. कला केंद्रातील सपना देवगण शिंदे, यासीन हसन शेख, कृष्णा गोविंद वाघमारे यांनी धावत आले आणि मारहाण करणाऱ्या करण याला रोखले. सपना शिंदे यांनी अश्विनी यांना रिक्षाने तातडीने जगदाळे मामा हॉस्पिटलमध्ये दाखल केले. रेणुका कला केंद्राचे चालक मंगल दिपक देशमुख व सुरज नवनाथ नाईकवाडी यांना घटनेची माहिती देण्यात आली.

अश्विनी यांनी पूर्ण शुद्धीवर असताना १४ एप्रिल रोजी रात्री फिर्याद दिली आहे. त्यात करण जितेंद्र भोसले यांच्यावर जिवे मारण्याच्या उद्देशाने हल्ला केल्याचा आरोप आहे. बार्शी तालुका पोलीस ठाण्यात याप्रकरणी गुन्हा दाखल असून पुढील तपास सुरु आहे.

**सोलापूर : शहरात दिवसेंदिवस तापमानात वाढ होत आहे. बुधवारी ४३.३ अंश सेल्सिस तापमान होते. त्यामुळे सोलापूरकर हैराण झाले होते.**



**सोलापूर : जुनी मिल पोलीस लाईन परिसरात श्री स्वामी समर्थ मंदिरात गुरुपीठावरील चैतन्य पादुका बुधवारी भाविकांच्या दर्शनासाठी ठेवल्या होत्या. (छायाचित्रे : केवल तिवारी)**

# दुसऱ्या पटपडताळणीचा अहवाल जाहीर

## विद्यार्थ्यांची उपस्थिती ९५.३९ टक्के

### उपस्थितीमध्ये मंगळवेढा-पंढरपूर आघाडीवर, मनपात तुलनेने कमी उपस्थिती

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १५ एप्रिल**




सोलापूर शहर जिल्ह्यातील खाजगी अनुदानित तसेच सरकारी शाळेतील विद्यार्थ्यांची पट पडताळणी मोहीम सुरू असून, मोहिमेच्या दुसऱ्या दिवशी शिक्षण सोलापूर जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शिक्षण विभागाच्या वतीने (दि.१५) जिल्ह्यातील शाळांची प्रत्यक्ष पटपडताळणी करण्यात आली. यातपासणीत एकूण ५२४ शाळांमधील ७४,६८७ विद्यार्थ्यांपैकी ७१,२४१ विद्यार्थी उपस्थित असल्याचे आढळले, तर ३,४४६ विद्यार्थी अनुपस्थित होते. जिल्ह्याची एकूण उपस्थिती टक्केवारी ९५.३९% इतकी नोंदविण्यात आली. तालुका निहाय आकडेवारीनुसार, मंगळवेढा (९९.१५%) आणि पंढरपूर (९९.०४%) तालुक्यांमध्ये सर्वाधिक उपस्थिती दिसून आली. त्याखालोखाल सांगोला (९८.६३%) व बार्शी (९८.२३%) तालुक्यांचा क्रमांक लागतो. दुसरीकडे, अक्कलकोट (९४.९६%) व मनपा सोलापूर (९०.०३%) येथे उपस्थितीचा टक्का तुलनेने कमी असल्याचे दिसून आले. माढा तालुक्यात सर्वाधिक ११९ शाळांची तपासणी करण्यात आली असून, तेथे ९६.९६% उपस्थिती नोंदली गेली. माळशिरस, मोहोळ, करमाळा व उत्तर सोलापूर या तालुक्यांमध्येही ९६% पेक्षा जास्त उपस्थिती दिसून आली, ज्यामुळे जिल्ह्यातील एकूण शैक्षणिक स्थिती समाधानकारक असल्याचे चित्र समोर आले.

या पटपडताळणीमुळे शाळांमधील विद्यार्थ्यांच्या उपस्थितीची अचूक स्थिती स्पष्ट झाली असून, ज्या ठिकाणी उपस्थिती कमी आहे, त्या भागांवर शिक्षण विभागाकडून लक्ष देण्यात येणार असल्याचे संकेत मिळत आहेत.





# 'सिंहगड'चा दहावी परीक्षेत शंभर टक्के निकाल

**सोलापूर, दि. १५ एप्रिल-**

केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळ (सीबीएसई), नवी दिल्ली दहावीच्या परीक्षेत सिंहगड पब्लिक स्कूल व ज्युनिअर कॉलेज (सीबीएसई), केगाव येथील विद्यार्थ्यांनी यंदाही परंपरा कायम राखत १०० टक्के निकालाची नोंद केली आहे. यात विक्रांत पवार (९५.२०%) याने प्रथम क्रमांक पटकावला. राजवीर गुंड (९४.४०%) द्वितीय, तर प्रमेघ भोसले (९३.४०%) तृतीय क्रमांकावर राहिले.शाळेतून ७७ पैकी ७७ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. यापैकी १४ विद्यार्थ्यांनी ९० टक्क्यांपेक्षा अधिक गुण मिळवून विशेष प्राविण्य मिळवले, तर ३६ विद्यार्थी विशेष प्राविण्यासह उत्तीर्ण झाले.

तसेच १६ विद्यार्थ्यांनी प्रथम श्रेणीत यश मिळवले. त्यांचे कॅम्पस डायरेक्टर संजय नवले, प्राचार्या शाहीन शेख, उपप्राचार्य प्रकाश नवले, उपप्राचार्या निखहत शेख आदींनी अभिनंदन केले.

**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून तरुण भारत कार्यालय, श्री. मसलेकर निवास, जिल्हा न्यायालय पाठीमागे, समर्थ नगर, धाराशिव (उस्मानाबाद) ४१३५०१, कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. दूरध्वनी : ९७६७०९९७११ / ८८८८८४७२३९ ● मुख्य समुह संपादक : **दिलीप यशवंत पेठे.** ● मुख्य संपादक : **प्रशांत वसंतराव माने** (पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर आहे) दैनिक सोलापूर तरुण भारत. RNI No. MAHMAR/2023/86468. **E-mail starunbharatgmail.com.** ● **Websate:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही.

**Owned by, SOLAPUR TARUN BHARAT MEDIA LTD. Printed by, Published by** DILIP SHIVMURTI DULANGE **Printed at** SOLAPUR TARUN BHARAT MEDIA LT. 19,20 INDUSTRIAL ESTATE, HOTGI ROAD, SOLAPUR, Dist. SOLAPUR, 413003.**Publised at** TARUN BHARAT OFFICE Mr. Maslekar Residence, Behind District Court, Samarth Nagar, Dharashiv. PIN - 413501 |**RNI No. MAHMAR/2023/86468**

● **CHIEF GROUP EDITOR :** DILIP YASHWANT PETHE ● **CHIEF EDITOR :** PRASHANT VASANTRAO MANE

धाराशिव
# दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## श्री तुळजाभवानी देवीला १ लाख ९ हजार रुपयांची देणगी



**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.१५ एप्रिल -**
सौरभ भीमराव राठोड (रा. वडगांव, ता. पुसद, जि. यवतमाळ) यांनी श्री तुळजाभवानी देवींच्या चरणी १ लाख ९ हजार रुपयांची देणगी अर्पण केली.

सौरभ राठोड हे सहकुटुंब श्री तुळजाभवानी देवींच्या दर्शनासाठी आले होते. दर्शन घेतल्यानंतर त्यांनी भक्तिभावाने ही देणगी अर्पण केली.

यावेळी मंदिर संस्थानच्या वतीने राठोड कुटुंबाचा श्री तुळजाभवानी देवींची प्रतिमा व महावस्त्र देऊन सत्कार करण्यात आला.

याप्रसंगी सहायक जनसंपर्क अधिकारी अतुल भालेराव, विश्वास सातपुते तसेच मंदिर संस्थानचे कर्मचारी उपस्थित होते.



## संक्षिप्त वृत्त...



### जिल्हाध्यक्षपदी पाटील यांची निवड

**भूम, दि.१५ एप्रिल -**
भारतीय जनता पार्टीचे कार्यकर्ते सुदाम पाटील यांची कामगार मोर्चाच्या धाराशिव जिल्हाध्यक्ष पदी निवड करण्यात आली. त्यांचा भाजपा, भूम येथील कार्यालयात सत्कार करण्यात आला. आणि पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा देण्यात आल्या. यावेळी भाजपा नेते बाळासाहेब क्षीरसागर, जिल्हा उपाध्यक्ष महादेव वडेकर, तालुकाध्यक्ष संतोष सुपेकर, शहराध्यक्ष बाबासाहेब वीर, शरद चोरमले, बिभीषण पवार, सिद्धार्थ जाधव, आब्बु चाऊस आदी पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते.



### १०० रामभक्तांची अयोध्या यात्रा

**इटकळ, दि.१५ एप्रिल -**
धाराशिव व सोलापूर जिल्ह्यातील १०० रामभक्तांनी १४ एप्रिल रोजी अयोध्या येथे जाऊन श्रीरामलल्लाचे दर्शन घेत भक्तिमय वातावरणाचा अनुभव घेतला. या यात्रेचे नियोजन हभप. दत्तात्रय क्षिरसागर महाराज व नागनाथ स्वामी यांनी केले. ऊळे, कंदलगाव, तामलवाडी, कोंडी, इटकळ, सोलापूर, अक्कलकोट आदी भागांतील ५५ महिला व ४५ पुरुष सहभागी झाले होते. यात्रेदरम्यान वैजनाथ मंदिर, औंढा नागनाथ मंदिर, चित्रकूट, काशी विश्वनाथ मंदिर आदी तीर्थस्थळांना भेट देण्यात आली. अयोध्येत पोहोचल्यानंतर भाविकांनी शरयू नदीत स्नान करून जय श्रीरामच्या घोषणांनी परिसर दुमदुमून टाकला. आयोजकांचे सर्वांनी कौतुक करत आभार मानले.



### ईट प्राथमिक आरोग्य केंद्रास ग्रा.पं. निधीतुन फ्रिज भेट

**भूम, दि.१५ एप्रिल -**
प्राथमिक आरोग्य केंद्र, ईट येथे ग्रामपंचायत निधीतून फ्रीज उपलब्ध करून देण्यात आले. प्राथमिक आरोग्य केंद्र, जनआरोग्य समिती अध्यक्ष पदी निवड झाल्यानंतर येथील कर्मचारी यांनी फ्रीजची मागणी करताच जि.प. सदस्या शुभांगी सुनिल देशमुख यांनी तात्काळ ग्रामपंचायत निधीतून ते उपलब्ध करुन दिले. हे वाटप प्रसंगी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे नेते सुनील देशमुख, अर्जुन सुळ, बाबासाहेब भोसले, ग्रा.पं. अधिकारी उत्तमराव गुळवे, आरोग्य अधिकारी डॉ. अश्विनी पन्हाळे, कविता कोकाटे, कैलास लोखंडे, आदी उपस्थित होते.



### महावितरण कार्यालयात फुले-आंबेडकर संयुक्त जयंती साजरी

**तुळजापूर, दि.१५ एप्रिल -**
महात्मा ज्योतिबा फुले व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या संयुक्त जयंतीनिमित्त महावितरण विभागीय कार्यालयात 'क्रेलिक प्रतिमा लोकार्पण' सोहळा उत्साहात पार पडला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कार्यकारी अभियंता नंदकुमार काळे होते. यावेळी अधीक्षक अभियंता संजय आडे, मुख्य अभियंता अरविंद बुलबुले, ठेकेदार संघटनेचे अध्यक्ष विशाल शिंगाडे, तालुका अध्यक्ष बाबा घोंगते, कर्मचारी संघटना जिल्हाध्यक्ष बापू जगदे यांच्यासह अनेक अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. महावितरण सार्वजनिक जयंती उत्सव समितीच्या वतीने आयोजित कार्यक्रमानंतर उपस्थितांसाठी स्नेहभोजनाचे आयोजन करण्यात आले.



### उमरग्यात भीमरायांना अभिवादन

**उमरगा, दि.१५ एप्रिल -**
राज्यघटनेचे शिल्पकार महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त उमरगा शहरात विविध मान्यवरांच्या उपस्थितीत अभिवादन करण्यात आले. जि.प. उपाध्यक्ष उषा गायकवाड, नगराध्यक्ष किरण गायकवाड तसेच पंचायत समिती सभापती ॲड. आकांक्षा चौगुले यांनी शहरातील परिषदेच्या आवारातील डॉ. आंबेडकर यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. यावेळी नगरसेवक पंढरीनाथ कोणे, सचिन जाधव यांच्यासह इतर मान्यवर व कार्यकर्ते उपस्थित होते. जयंतीनिमित्त शहरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते.

# पीक कर्ज भरावे की वाट पाहावी?
# कर्जमाफीच्या निर्णयाअभावी शेतकरी संभ्रमात



**महावीर जालन**
**भूम, दि.१५ एप्रिल -**
राज्य सरकारने अर्थसंकल्पात गाजावाजा करत पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमाफी योजना जाहीर केली. मात्र मार्च महिना उलटूनही अद्याप या योजनेचा अधिकृत शासन निर्णय निघालेला नसल्याने शेतकरी द्विधा मनःस्थितीत सापडले आहेत.

कर्ज भरावे की कर्जमाफीची वाट पाहावी, या पेचात राज्यातील लाखो शेतकरी अडकले आहेत. त्यातच पीकविम्याचा लाभही न मिळाल्याने परिस्थिती अधिकच बिकट झाली आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ६ मार्च रोजी ३० सप्टेंबर २०२५ पर्यंतचे दोन लाख रुपयांपर्यंतचे थकीत पीककर्ज माफ करण्याची घोषणा केली होती. मात्र, या घोषणेचे अद्याप शासन निर्णयात रूपांतर झालेले नाही. त्यामुळे बँकांकडे कर्जमाफीची कोणतीही अंमलबजावणी प्रक्रिया सुरू झालेली नाही.

३१ मार्चपर्यंत कर्जाचे नूतनीकरण किंवा परतफेड झाली नाही, तर सवलतीचा व्याजदर संपून शेतकऱ्यांवर अतिरिक्त व्याजाचा बोजा पडण्याची शक्यता आहे. तसेच जुने कर्ज थकीत राहिल्यास आगामी खरीप हंगामासाठी नवीन



पीककर्ज मिळण्यात अडचणी निर्माण होऊ शकतात. नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांसाठी ५० हजार रुपयांचे प्रोत्साहनपर अनुदान जाहीर करण्यात आले आहे. मात्र, त्याबाबतही अद्याप स्पष्ट अटी व शासन आदेश नसल्याने हे अनुदानही अधांतरीच आहे.

महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिलेल्या माहितीनुसार, कर्जमाफी प्रक्रियेसाठी बँकांमार्फत माहिती संकलन सुरू असून, ३० जूनपूर्वी प्रत्यक्ष लाभ देण्याचे नियोजन असल्याचे सांगण्यात आले आहे.

तरीही अधिकृत आदेश निघेपर्यंत शेतकऱ्यांमध्ये संभ्रम कायम आहे.

> मी बँक ऑफ महाराष्ट्र शाखेचा नियमित पीककर्जदार आहे. दरवर्षी वेळेवर नूतनीकरण करतो. मात्र सरकारने कर्जमाफीची घोषणा केल्यामुळे आता कर्ज भरावे की नाही, या संभ्रमात आहे.
> **- बन्सी डोके**, शेतकरी (डोकेवाडी)

**नियमित कर्जदारांचे काय?...**
ज्या शेतकऱ्यांनी प्रामाणिकपणे कर्जफेड केली, त्यांच्यासाठी ५० हजार रुपयांचे प्रोत्साहनपर अनुदान जाहीर झाले आहे. मात्र ३१ मार्चपूर्वी नवीन कर्जासाठी जुने कर्ज फेडणे आवश्यक असल्याने हे शेतकरी आर्थिक ताण सहन करत आहेत. 'घोषणा झाली पण शासनादेश नाही' या परिस्थितीमुळे शेतकऱ्यांमध्ये तीव्र नाराजी आहे. शासनाने तातडीने आदेश काढून ३१ मार्चची मुदत वाढवावी, अशी मागणी होत आहे.

## बेंबळी येथे २३ वर्षीय तरुणीवर अत्याचार; आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१५ एप्रिल -**
बेंबळी परिसरात २३ वर्षीय तरुणीवर अत्याचार केल्याची गंभीर घटना उघडकीस आली असून या प्रकरणी पोलिसांनी आरोपीविरुद्ध गुन्हा नोंदवला आहे.



पोलीस ठाणे बेंबळी येथील माहितीनुसार, इमरान शेख (रा. बेंबळी, ता. जि. धाराशिव) याने दि. ६ एप्रिल २०२६ रोजी सायंकाळी सुमारे ६ वाजण्याच्या सुमारास डॉ. बाबासाहेब साखर कारखाना ते बेंबळी मार्गालगत असलेल्या जंगल परिसरात फिर्यादी पल्लवी विजय भोसले (वय २३, रा. हंगरगा पाटी, नळदुर्ग रोड, तुळजापूर) हिच्यावर तिच्या इच्छेविरुद्ध जबरदस्तीने शारीरिक संबंध केल्याचा आरोप आहे.

या घटनेबाबत मिळालेल्या प्रथम खबरेवरून दि.१४ एप्रिल रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी पुढील तपास सुरू केला असून आरोपीविरुद्ध कठोर कारवाई करण्यात येणार असल्याची माहिती दिली आहे.

## मंगरुळजवळ ३६ वर्षीय युवकाची निघृण हत्या

**तुळजापूर तालुक्यात खळबळ**

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.१५ एप्रिल -**
तालुक्यातील मंगरुळ परिसरात ३६ वर्षीय युवकाची निघृण हत्या झाल्याची धक्कादायक घटना शुक्रवारी सकाळी उघडकीस आली. या घटनेमुळे संपूर्ण परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले असून नागरिकांमध्ये मोठी खळबळ उडाली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, कृष्णा आनंद साठे (वय ३६, रा. मंगरुळ) यांचा मृतदेह तुळजापूर-अक्कलकोट मार्गावर मंगरुळपासून सुमारे १ ते २ किलोमीटर अंतरावरील पुलाजवळ आढळून आला. सकाळी सुमारे ७ वाजण्याच्या सुमारास ही घटना उघडकीस आली. प्राथमिक तपासात अज्ञात कारणावरून साठे यांच्या डोक्यात जड वस्तूने वार करून त्यांची हत्या करण्यात आल्याचा अंदाज व्यक्त करण्यात येत आहे. विशेष म्हणजे घटनास्थळाच्या पाहणीत मृतदेह सुमारे १०० ते २०० मीटर अंतरावर फरपटत नेण्यात आल्याचे स्पष्ट झाले आहे. त्यामुळे हा खून नियोजनपूर्वक करण्यात आल्याचा संशय अधिक बळावला आहे. घटनेची माहिती मिळताच उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. निलेश देशमुख, पोलीस निरीक्षक अण्णासाहेब मांजरे, सहाय्यक पोलीस निरीक्षक नामदेव मुद्दे, पोलीस उपनिरीक्षक विजय थोटे यांच्यासह पोलीस पथक घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी पंचनामा करून तपासाला वेग दिला आहे.



तपासासाठी फॉरेन्सिक व श्वान पथकाला पाचारण करण्यात आले असून घटनास्थळावरून महत्त्वाचे पुरावे गोळा करण्याचे काम सुरू आहे.

दरम्यान, या प्रकरणात एका संशयिताला पोलिसांनी ताब्यात घेतल्याची माहिती समोर आली असून त्याची कसून चौकशी सुरू आहे.

हत्येमागील नेमके कारण, अन्य कोणाचा सहभाग आहे का, तसेच मृतदेह दूरवर का नेण्यात आला याचा सर्व बाजूंनी तपास सुरू आहे. आरोपींना लवकरात लवकर अटक करण्यासाठी पोलिसांचे प्रयत्न सुरू आहेत. या घटनेमुळे तुळजापूर तालुक्यात भीती व चिंतेचे वातावरण पसरले आहे.

## तुळजाभवानी मंदिर परिसरात कोटपा कायद्यांतर्गत धाड; २४ जणांवर कारवाई

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१५ एप्रिल -**
श्री तुळजाभवानी मंदिर परिसरात तंबाखूजन्य पदार्थांचे सेवन व बाळगणाऱ्या व्यक्तींविरुद्ध मंगळवार (दि.१४ एप्रिल) रोजी कोटपा (COTP) कायद्याअंतर्गत विशेष धाड सत्र राबविण्यात आले.

कोटपा हा तंबाखूजन्य पदार्थांच्या वापरावर नियंत्रण ठेवण्यासाठी भारत सरकारने लागू केलेला कायदा असून, तो १ मे २००४ पासून अंमलात आहे.

या कायद्यांतर्गत सार्वजनिक ठिकाणी धूम्रपानास बंदी, अल्पवयीनांना तंबाखू विक्रीवर मनाई तसेच शैक्षणिक संस्थांच्या १०० यार्ड परिसरात तंबाखू विक्रीस प्रतिबंध घालण्यात आले आहेत.



या मोहिमेदरम्यान कोटपा कायद्याच्या कलम ४, ६ () व ६ (इ) अन्वये एकूण २४ जणांवर दंडात्मक कारवाई करण्यात आली. यामध्ये मंदिर परिसरातील २२ आणि मंदिर प्रशासकीय इमारतीतील २ व्यक्तींचा समावेश असून, त्यांच्याकडून एकूण ४,६५० रुपयांचा दंड वसूल करण्यात आला.

या कारवाईत डॉ. विक्रांत राठोड, प्रदीप तटाळे (एनसीडी समुपदेशक, जिल्हा रुग्णालय धाराशिव), भाग्यश्री हिरेमठ (एनसीडी समुपदेशक, उपजिल्हा रुग्णालय तुळजापूर) तसेच कृष्णा सावंत (नर्सिंग ऑफिसर, जिल्हा रुग्णालय धाराशिव) यांनी सहभाग घेतला.

याशिवाय मंदिर संस्थानचे स्वच्छता निरीक्षक मनोज घोडगे, सहायक स्वच्छता निरीक्षक सुमित रघुजीवार आणि सहायक सुरक्षा निरीक्षक ऋषभ रेहपांडे यांनीही मोहिमेत सक्रिय सहभाग नोंदविला.

मंदिर संस्थानच्या वतीने भाविकांना आवाहन करण्यात आले आहे की, मंदिर परिसर हा पवित्र व सार्वजनिक स्थळ असल्याने येथे तंबाखूजन्य पदार्थांचे सेवन टाळावे. परिसरात कोणी थुंकताना आढळल्यास संबंधित व्यक्तीचा फोटो काढून ९०९६८५२७२५ या व्हॉट्सॲप क्रमांकावर पाठवावा. प्राप्त तक्रारींवर तत्काळ कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

मंदिर परिसरात स्वच्छता राखण्यासाठी सूचना फलक लावण्यात आले असून, भाविकांनी नियमांचे पालन करून स्वच्छतेस सहकार्य करावे, असे आवाहन मंदिर प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

## उमरग्यात पंचशील नगरात डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्साहात साजरी

**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि.१५ एप्रिल -**
महामानव भारतरत्न, भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त शहरातील पंचशील नगर येथे विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले.

यानिमित्त राष्ट्रवादीचे प्रदेश उपाध्यक्ष सुरेश बिराजदार, नगराध्यक्ष किरण गायकवाड तसेच पंचायत समिती सभापती आकांक्षा चौगुले यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी बापू बिराजदार, शरद पवार, अमर देशटवार, अमोल पाटील, नगरसेवक सचिन जाधव, सुशील दळगडे, शफी चौधरी, अनिल व्हंताळकर, प्रदीपकुमार कांबळे, हनमंत बनसोडे आदींची प्रमुख उपस्थिती होती.

पंचशील नगर समाज मंदिरात समस्त बौद्ध बांधव व परिसरातील नागरिकांच्या वतीने गौतम बुद्ध यांच्या मूर्तीचे तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन व अभिवादन करण्यात आले. यावेळी पंचशील ध्वजाचे ध्वजारोहण प्रा. सुरेशदाजी बिराजदार यांच्या हस्ते, तर निळ्या ध्वजाचे ध्वजारोहण नगराध्यक्ष किरण गायकवाड व सभापती आकांक्षा चौगुले यांच्या हस्ते पार पडले. बुद्ध वंदनेनंतर उपस्थित मान्यवरांचा सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमास जयंती कमिटी अध्यक्ष अविनाश खराते, धीरज कांबळे, गोरख नागनसुरे, मारुती खराते, सिद्धू जाधव, सुभाष कांबळे, बालू गायकवाड, फुलचंद सुरवसे, आनंद कांबळे, विशाल भाले, विजय व्हंताळकर, किरण बनसोडे, चंद्रकांत गायकवाड यांच्यासह नागरिक उपस्थित होते.

### परंडा येथे आंबेडकर जयंतीनिमित्त मिरवणूक

**तभा वृत्तसेवा**
**भूम, दि.१५ एप्रिल -**
डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त भीम प्रतिष्ठान आयोजित सार्वजनिक जयंती उत्सव समितीच्या वतीने भिमनगर (रेवणी मंडई पेठ) येथे भव्य मिरवणूक काढण्यात आली.

नगराध्यक्ष जाकिरभाई सौदागर, पोलीस निरीक्षक चोरमुले व संस्थापक अध्यक्ष रत्नकांत शिंदे यांच्या हस्ते प्रतिमेचे पूजन करण्यात आले. मिरवणुकीची सुरुवात भीमनगर येथून होऊन रमाई चौक, जुने तहसील कार्यालय मार्गे पुन्हा भीमनगर येथे सांगता झाली. या मिरवणुकीत अनेक पदाधिकारी, कार्यकर्ते व भीम अनुयायी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. उत्साहपूर्ण वातावरणात जयंती सोहळा पार पडला.

## मार्डी येथे घरफोडी; रोख रक्कम व मोबाईलसह ४० हजारांचा ऐवज लंपास

**तभा वृत्तसेवा**
**लोहारा, दि.१५ एप्रिल -**
तालुक्यातील मार्डी येथे अज्ञात चोरट्याने घरात घुसून रोख रक्कम व मोबाईल असा एकूण ४० हजार रुपयांचा ऐवज चोरून नेल्याची घटना घडली आहे.



याबाबत हिराचंद्र बाजीराव देवकर (वय ७१, रा. मार्डी ता. लोहारा जि. धाराशिव) यांनी लोहारा पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, दि.१४ एप्रिल रोजी पहाटेच्या सुमारास अज्ञात इसमाने फिर्यादीच्या घराजवळ येऊन लाकडाच्या सहाय्याने उशाजवळ ठेवलेली गेटची चावी काढली.

त्यानंतर गेटचे कुलूप उघडून घरात प्रवेश केला. घरात शिरल्यानंतर चोरट्याने रोख रक्कम व मोबाईल असा एकूण सुमारे ४० हजार रुपयांचा मुद्देमाल चोरून नेला.

या प्रकरणी लोहारा पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदविण्यात आला असून पुढील तपास पोलीस करत आहेत.

## आदर्श शिक्षक पुरस्कार विजेत्यांचा सन्मान

**तभा वृत्तसेवा**
**भूम, दि.१५ एप्रिल -**
संजीवन खांडेकर व रविंद्र भोंग यांना मिळालेल्या राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्काराबद्दल माजी नगराध्यक्ष संजय गाढवे व युवा उद्योजक भाऊसाहेब मारकड यांच्या हस्ते बुधवारी (दि.१५) साहिल कॉम्प्लेक्स येथे त्यांचा यथोचित सन्मान करण्यात आला.

संजीवन खांडेकर हे जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, वाकवड येथे कार्यरत असून त्यांना नाशिक येथे झालेल्या ६ व्या धनगर साहित्य संमेलनात धनगर समाजासाठी केलेल्या सामाजिक, शैक्षणिक व सांस्कृतिक कार्याबद्दल पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार प्रदान करण्यात आला आहे.



तसेच जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, सोनगिरी येथील शिक्षक रविंद्र पोपट भोंग यांना शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याबद्दल ध्येय एज्युकेशन, सातारा यांच्या वतीने पुणे येथे राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार देऊन गौरविण्यात आले आहे.

या सन्मान सोहळ्यास महादेव कुटे, कृष्णा कुटे, रामभाऊ खोडकर, बालाजी कुटे, नितीन गोयकर, राजमल कुटे, काकासाहेब मारकड, अविनाश हांगे, शहाजी माळी, बालाजी डोरले, संतोष लोखंडे, दयानंद शेळके आदी मान्यवर उपस्थित होते.

CMYK

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा,
छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली,
जालना व बीड तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर
(कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



# संक्षिप्त...

## फुले –शाहूंच्या विचाराचे खरे वारसदार डॉ. बाबासाहेब आंबेडकर : डॉ. गायकवाड

**तभा वृत्तसेवा**

**उदगीर दि. १५ एप्रिल :** सामाजिक अन्यायाविरुद्ध लढा देत, शिक्षणाच्या बळावर उभे राहून डॉ. बाबासाहेबानी लोकशाहीची भक्कम पायाभरणी केली. खऱ्या अर्थाने फुले–शाहूंच्या विचाराचे खरे वारसदार डॉ. बाबासाहेब आंबेडकर आहेत असे उद्गार राज्यशास्त्र विभागप्रमुख डॉ. व्ही.डी. गायकवाड यांनी काढले. छत्रपती शिवाजीराजे महाविद्यालयात डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त आयोजित केलेल्या कार्यक्रम प्रसंगी ते बोलत होते. यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्र. प्राचार्य डॉ. आर.एम. मांजरे तर प्रमुख उपस्थिती सिनेट सदस्य डॉ.विष्णू पवार, स्टाफ सेक्रेटरी डॉ. एच.ए. तिरपुडे, कनिष्ठ महाविद्यालयाचे पर्यवेक्षक प्रा.गिरी आर. पी, प्रबंधक बालाजी पाटील यांची होती. यावेळी छत्रपती शिवाजी महाराज आणि डॉ .बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन करण्यात आले. त्यानंतर त्रिशरण पंचशीलचे वाचन करण्यात आले. पुढे बोलताना गायकवाड म्हणाले,संघर्षातून उभे राहिलेले ते महामानव होते.

अत्यंत प्रतिकूल परिस्थितीवर मात करून डॉ.आंबेडकरांनी जातीय भेदभाव,अपमान आणि बहिष्कार सहन करत शिक्षण पूर्ण केले. त्यांच्या आयुष्यातील संघर्ष हा केवळ वैयक्तिक नव्हता, तर संपूर्ण वंचित समाजाच्या हक्कासाठीचा होता असेही ते म्हणाले. अध्यक्षीय समारोप प्रसंगी डॉ.मांजरे म्हणाले, स्वातंत्र्यानंतर डॉ. आंबेडकर यांच्यावर भारताचे संविधान तयार करण्याची जबाबदारी सोपवली. त्यांनी मसुदा समितीचे अध्यक्ष म्हणून काम केले.समता,स्वातंत्र्य आणि न्याय याला त्यांनी केंद्रस्थानी ठेवले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.बी.पी. सूर्यवंशी यांनी तर आभार डॉ. एस. एम. कोनाळे यांनी मानले. कार्यक्रमाला महाविद्यालयातील कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## देवणीत जल्लोषपूर्ण वातावरणात जयंती उत्सव साजरा

**तभा वृत्तसेवा**

**देवणी १५ एप्रिल :** येथील गांधी चौकात व महात्मा फुले नगरा मध्ये विश्र्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त मंगळवारी (दि.१४) सकाळी थोर समाज सुधारकांच्या प्रतिमेस अभिवादन करून ध्वजारोहण करण्यात आले.

सर्वप्रथम गांधी चौकात नगराध्यक्षा डॉ. कीर्ती संजय घोरपडे, माजी सभापती कुशावर्ता बेळ्ळे, तहसीलदार सोमनाथ वाडकर, सहाय्यक पोलीस निरीक्षक भीमराव गायकवाड यांच्या हस्ते भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमीचे पूजन करण्यात आले. यानंतर ज्येष्ठ उद्योजक मल्लिकार्जुन मानकरी यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी कमलाकर पतंगे यांच्याकडून त्रीसरण पंचशील घेण्यात आले.

महात्मा फुले नगरामध्ये नगरसेविका श्रीमती विमलताई बोरे यांच्या हस्ते प्रतिमेचे पूजन करण्यात आले. यानंतर नगराध्यक्षा डॉ. कीर्ती घोरपडे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले.

## जीवन प्रयाग सेवापर्व पुस्तकाचे प्रकाशन संपन्न

**तभा वृत्तसेवा**

**उदगीर दि. १५ एप्रिल :** जीवन प्रयाग फाऊंडेशनच्या वतीने जीवन प्रयाग सेवापर्व या पुस्तकाचे प्रकाशन कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती शिवाजीराव हूडे व प्रमुख वक्ते प्रमोद कुलकर्णी यांच्या हस्ते उत्साहात संपन्न झाले. या पुस्तकातून फाऊंडेशनच्या तीन वर्षाच्या सामाजिक, शैक्षणिक व सेवाभावी कार्याचा प्रेरणादायी प्रवास मांडण्यात आला आहे.

कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते

दीपप्रज्वलनाने करण्यात आली. कार्यक्रमाचे अध्यक्ष व प्रमुख पाहुण्यांचा परिचय प्रा. संजय बिबीनवरे यांनी करून दिला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शिवाजीराव हूडे होते, तर प्रमुख वक्ते म्हणून राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे पूर्व प्रचारक प्रमोद कुलकर्णी उपस्थित होते.

यावेळी व्यासपीठावर फाऊंडेशनचे अध्यक्ष प्रभात सूर्यवंशी, सदस्य सरस्वती लाल आदी मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रभात सूर्यवंशी यांनी केले. आपल्या भाषणात शिवाजीराव हूडे म्हणाले की, हे पुस्तक तरुण पिढीला व समाजाला दिशा देणारे आहे.

प्रमुख वक्ते प्रमोद कुलकर्णी यांनी सांगितले की, हा समाज माझा आहे आणि मी या समाजाचा आहे, या भावनेतूनच फाऊंडेशन कार्य करीत आहे. एखाद्या दिवशी फराळ किंवा रुग्णालयात फळ वाटप केले, तरी त्यातून गरजवंतांना दिलासा मिळतो. या छोट्या सेवाभावी कृतीतून समाजात 'आपल्यासाठी कोणीतरी आहे' ही भावना निर्माण होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. वैभव शेळके यांनी केले, तर आभार प्रा. संजय बिबीनवरे यांनी मानले. कार्यक्रमास नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती ही संकल्प दिवस म्हणून साजरी केली पाहिजे : बाबासाहेब पाटील

**तभा वृत्तसेवा**

**अहमदपूर दि. १५ एप्रिल :** अहमदपूर येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर सांस्कृतिक युवक मंडळ अहमदपूर,अरुण भाऊसाहेब वाघंबर आयोजित विश्र्वरत्न, परमपूज्य, भारतरत्न, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंती निमित्त पुतळ्याजवळ भाऊसाहेब वाघंबर चौक येथे जयंतीचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. महाराष्ट्राचे सहकार मंत्री नामदार बाबासाहेब पाटील यांच्या हस्ते पंचशील ध्वजारोहण करण्यात आले त्यानंतर बुद्ध वंदना झाल्यानंतर सहकार मंत्री बाबासाहेब पाटील आपल्या भाषणात म्हणाले की आज अहमदपूर मध्ये माझ्या मतदारसंघांमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती मुळे प्रचंड प्रमाणात असा उत्साह दिसून आला आहे आणि प्रत्येक वार्डामध्ये प्रभागांमध्ये विविध प्रकारच्या कला सादर करून विविध प्रकारची कार्यक्रम आयोजित करण्यात आलेली आहेत अशाच कार्यक्रमामुळे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार जनसामान्यापर्यंत पोहोचतील त्यामुळे सर्वांनी आजचा दिवस डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त संकल्प दिन म्हणून साजरा करावा आणि मी या जयंतीनिमित्त अहमदपूर शहरातील तालुक्यातील सर्व बांधवांना शुभेच्छा देतो असे आपल्या भाषणात सहकार मंत्री बाबासाहेब पाटील म्हणाले.

यानंतर बौद्ध धम्म प्रचारक सौ अंजली अरुण वाघंबर यांनी या कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले त्यांनी आपल्या भाषणात डॉ. बाबासाहेबांचे आणि भगवान गौतम बुद्धाचे विचार मांडले आणि बुद्ध धम्म कसा पुढील नेता येईल याचे त्यांनी आपल्या भाषणात मार्गदर्शन केले त्यानंतर महाराष्ट्राचे माजी राज्यमंत्री विनायकराव पाटील, पत्रकार बुद्रुक पाटील, महेश देवणे, जयंतीचे अध्यक्ष सुजित गायकवाड, विद्रोही कवी राजेंद्र कांबळे, रिपाई जिल्हाध्यक्ष बाबासाहेब कांबळे, इत्यादींनी आपली



डॉ बाबासाहेब आंबेडकर आणि भगवान गौतम बुद्ध यांच्या जीवनावर आणि कार्यावर आपल्या भाषणातून प्रकाश टाकला.

तत्पूर्वी या कार्यक्रमाचे अध्यक्ष रिपाई जिल्हाध्यक्ष बाबासाहेब कांबळे या कार्यक्रमाचे उद्धघाटक अशिष तोगरे आणि पंचशील ध्वजारोहण हस्ते सहकार मंत्री बाबासाहेब पाटील या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे महाराष्ट्राचे माजी राज्यमंत्री बाळासाहेब जाधव, माजी राज्यमंत्री विनायकराव पाटील, भाजपाचे दिलीपराव देशमुख, उपजिल्हाधिकारी मंजुषाताई लटपटे, तहसीलदार उज्वलाताई पांगरकर, गोविंद गिरी, पांडुरंग कांबळे, पंचायत समिती सभापती सुरज भैय्या पाटील, पंचायत समिती उपसभापती अयोध्या ताई केंद्रे, ॲड.टी.एन. कांबळे, जिल्हा परिषद समाज कल्याण सभापती उत्तमराव माने, महेश देवणे, राजेंद्र कांबळे, उत्तम कांबळे, पत्रकार बुद्रुक पाटील, सोमेश्र्वर कदम, गोपीनाथ जोंधळे, डॉ. सिद्धार्थ कुमार सूर्यवंशी, गायकवाड सर, शिवाजीराव जंगांपले, अफरोज पठाण, अझहर बागवान, राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुका अध्यक्ष शिवाजीराव पाटील, फिरोज शेख, अशोक सोनकांबळे चंद्रशेखर भालेराव, सुप्रियाताई भालेराव, राजाराम पाटील, नगरसेविका शिल्पाताई तोगरे, जि प सदस्य शितलताई खोमणे, प्रदीप खोमणे, शिवानंद हिंगणे, न प उपाध्यक्ष अय्याज भाई शेख, नरवटे पाटील, प्रकाश फुलारी, पत्रकार अजय भालेराव,पत्रकार भीमराव कांबळे, दयानंद वाघमारे, बागवानभाई, बाबुभाई रुईकर, मुजीब पटेल, मुन्ना कांबळे, नगरसेवक राहुल शिवपुजे, सावंन कदम, प्रकाश भालेराव, शिवाजी भालेराव, सुनील डावरे, गोपीनाथ जोंधळे, रंजनाताई गायकवाड, सविताताई मोडके, नगरसेविका मीनाक्षीताई शिंगडे, उपसंपादक बालाजी कारामुंगीकर, माजी नगराध्यक्षा अश्र्विनीताई कासनाळे,बाळू कास्नाळे, नगरसेवक निखिल कासनाळे, बाळू आगलावे,श्रीकांत बनसोडे, संजय गुणाले, मनीष शिरसागर, विश्र्वंभर पाटील, फुजेल जागीरदार, हालशे आपा, श्रीकांत मजगे, किरण बारमाळे, इत्यादी मान्यवरांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला पुष्पहार घालून अभिवादन केले. त्यानंतर या अभिवादन कार्यक्रमाला येणाऱ्या व डॉ. बाबासाहेबांना अभिवादन करण्यासाठी येणाऱ्या धम्म बांधवांना यावेळी सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांच्या हस्ते खिचडी, लाडू वाटपाचे उद्धघाटन करण्यात आले त्यानंतर उपस्थित सर्व बांधवांना खिचडी, बुंदी लाडू वाटपाचा कार्यक्रम करण्यात आला. आणि आणखीन खिचडी बुंदी लाडू वाटप चालू आहे. त्यानंतर उपस्थित प्रमुख पाहुण्यांचा सत्कार डॉ. बाबासाहेब आंबेडकर सांस्कृतिक युवक मंडळाच्या पदाधिकाऱ्यांनी शाल श्रीफळ देऊन करण्यात आला. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी खालील कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले या कार्यक्रमाचे संयोजक व निमंत्रक, अरुण वाघंबर, अंजली वाघंबर, संदीप वाघंबर, अश्र्विनी वाघंबर, दैवशाला वाघंबर, ज्योती वाघंबर रोहन लामतुरे, अनिल वाघमारे, श्रीरंग गायकवाड, सचिन गायकवाड, बालाजी गोरे, फुलारी, इत्यादी कार्यकर्त्यांनी परिश्रम घेऊन हा कार्यक्रम यशस्वी करण्यात आला.

या कार्यक्रमाचे संचालन जीवन गायकवाड यांनी केले तर आभार बौद्ध धम्माच्या प्रचारक सौ अंजली वाघंबर यांनी उपस्थित सर्व प्रमुख पाहुण्यांचे आभार मानले.

## विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त विविध समाज बांधवांच्या वतीने विनम्र अभिवादन

**तभा वृत्तसेवा**

**चाकूर दि. १५ एप्रिल :** चाकूर येथे महामानव विश्र्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त लोकशाहीर अण्णाभाऊ साठे चौकात व स्वामी विवेकानंद चौक येथे विविध समाजबांधवांच्या वतीने विनम्र अभिवादन करण्यात आले.अभिवादन कार्यक्रमप्रसंगी रामभाऊ कसबे,नगरसेवक नितीन रेड्डी, आणा भाऊ साठे क्रांती सेना जिल्हाध्यक्ष नितीन डांगे,सुरज शेटे, उमाकांत शेटे,लहुजी शक्ती सेना जिल्हाध्यक्ष संतराम मोठेराव,सुरज सोनटक्के,लहुजी शक्ती सेना ता.अध्यक्ष रामजी मोठेराव,राष्टीय काँग्रेस शहराध्यक्ष पप्पूभाई शेख, ,सुभाष मोठेराव,लहुजी शक्ती सेना सांस्कृतिक प्रमुख दिवाकर मोठेराव,अंबादास माने,पवन मोठेराव, शिवकुमार वाघमारे,शंकर मोठेराव, अभिषेक मोठेराव, महावितरण कर्मचारी भांगे,रवी महालिंगे,परमेश्र्वर गायकवाड,प्रकाश टाळकुटे,देवानंद कोटंबे, मुन्ना अरगडे,विलास वाघमारे,सूरज चव्हाण,ओम मोठेराव,प्रवीण वाघमारे,संगम मोठेराव, पिंटू वाघमारे,सुनील मोठेराव, राज मोरे, मधुकर मोठेराव,संजय सूर्यवंशी,कार्तिक शिंदे, प्रेम वाघमारे,व्यंकट मोरे, विकी कांबळे, मारुती वाघमारे,शुभम मोठेराव,बालाजी गायकवाड,अक्षय महालिंगे, ,रवी कांबळे,उत्तम बनसोडे,सुनील मोठेराव, लक्ष्मण भालेराव,श्रीहरी मोठेराव, बादल वाघमारे,अमोल मोठेराव ,इमाम सय्यद,वाघमारे, वैरागे नारायण कांबळे,गोविंद घोडकेसह विविध समाजबांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.





औसा : डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त आमदार अभिमन्यू पवार यांनी औसा शहर, बुधोडा व मतदारसंघातील विविध ठिकाणी भेट देत बाबासाहेबांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. या प्रसंगी मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते. कार्यक्रमात सामाजिक एकात्मता व संविधानाच्या मूल्यांचे जतन करण्याचा संदेश देण्यात आला. उपस्थितांनी बाबासाहेबांच्या विचारांचा जागर करत त्यांना आदरांजली वाहिली.

## भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती उत्साहात साजरी

**तभा वृत्तसेवा**

**रेणापूर दि. १५ एप्रिल :** प्रति वर्षाप्रमाणे याही वर्षी भारतरत्न परमपूज्य डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांची १३५ वी सार्वजनिक जयंती अध्यक्ष मंडळ बौद्धनगर रेणापूर यांच्यातर्फे रेणापूर शहरांमध्ये मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.



या निमित्त सकाळी सर्व प्रथम बौद्धनगर नगर येथे समाज मंदिर समोर पंचशील ध्वजारोहण कार्यक्रम रेणापूर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक सुधाकर देडे यांच्या हस्ते करण्यात आले. तदनंतर आंबेडकर चौक रेणापूर या ठिकाणी अध्यक्ष मंडळामार्फत अभिवंदन करण्यासाठी तात्पुरत्या स्वरूपात विश्र्वरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर पुतळ्या समोर पंचशील ध्वजारोहण कार्यक्रम सामाजिक कार्यकर्ते उत्तमराव घोडके यांच्या अध्यक्षतेखाली मोठ्या स्वरूपात साजरा करण्यात आला. पंचशील ध्वजारोहण रेणापूर शहराच्या नगराध्यक्षा श्रीमती शोभाताई शामराव अकनगिरे यांच्या हस्ते करण्यात आला.

या कार्यक्रमाचे स्वागत अध्यक्ष रुपेश चक्रे हे होते तर प्रमुख पाहुणे रेणापूर नगरीचे माजी प्रथम नगराध्यक्ष तथा नगरसेवक अभिषक अकनगिरे,राजू आतार, पंचायत समिती सभापती मोनिका रवी सूर्यवंशी, उप सभापती शरद दरेकर,कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती उमाकांत खलंग्रे,नगरसेवक सचिन मोटेगावकर, पदम् पाटील, शेख वाहिद, श्रीकृष्ण मोटेगावकर,गणेश सौदागर,संतोष शिंदे,महेश गाडे, भूषण पनुरे,मोसिन शेख, रवी सूर्यवंशी, महानंदा दरेकर, डॉ.श्रीपती शिंदे, श्रीमंत नागरगोजे,श्रीपाल बस्तापुरे,प्रल्हाद कोतवाड,शिवाजी अकनगिरे, सर्व पत्रकार विठ्ठल कटके,रफिक शिकलकर,चंद्रकांत कातळे,ईश्र्वर बद्दर,बाळ्या स्वामी,चंद्रकांत सूर्यवंशी प्रमुख मान्यवर उपस्थित होते.

सुरुवातीला पंचशील ध्वजारोहण कार्यक्रमामध्ये त्रिशरण पंचशील व बुद्ध वंदना प्रा. किशोर चक्रे यांनी घेतली (भारतीय बौद्ध महासभा) सुरुवातीला आलेल्या मान्यवरांच्या हस्ते महापुरुषाच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले व जयंती अध्यक्ष मंडळाच्या वतीने सर्वांचा सत्कार करण्यातआला.या कार्यक्रमामध्ये रेणापूर शहराचे माजी प्रथम नगराध्यक्ष अभिषेक अकनगिरे,रवी सूर्यवंशी, श्रीराम विद्यालय च्या शिक्षिका महानंदा दरेकर यांनी मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व प्रस्ताविक प्रा. किशोर चक्रे यांनी केले तर आभार कार्यक्रमाचे स्वागत अध्यक्ष रुपेश चक्रे यांनी यांनी केले.कार्यक्रम यशस्वीते साठी विशाल कांबळे,शाम चक्रे,सुनील चक्रे,उत्तम चक्रे,अमोल चक्रे, विक्रम गायकवाड, धोंडीराम चक्रे,राजाभाऊ चक्रे,नितीन गायकवाड, राजाभाऊ घोडके, राजकुमार कांबळे,हनुमंत लांडगे,समाधान शिंदे,अजय हनवते इत्यादी अध्यक्ष मंडळातील कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले

## जळकोट तालुक्यात विविध उपक्रमांनी जयंती साजरी

**त.भा.वृत्तसेवा**

**जळकोट दि.१५ एप्रिल :** शहर व तालुक्यात महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३५ वी जयंती विविध कार्यक्रमांनी साजरी करण्यात आली.

शहरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौकात मंगळवारी सकाळी महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुर्णाकृती पुतळ्यांचे उपनगराध्यक्ष मन्मथ किडे, चंदन पाटील यांच्या हस्ते पूजन करुन अभिवादन करण्यात आले. नगराध्यक्ष प्रभावती कांबळे यांच्या हस्ते तथागत गौतम बुद्ध यांच्या चरणी पुष्प अर्पण करण्यात आले. तहसीलदार राजेश लांडगे यांच्या हस्ते पंचशील ध्वजाचे ध्वजारोहण करण्यात आले. उपनिरीक्षक श्रीराम माचेवाड यांच्या हस्ते निळ्या ध्वजाचे ध्वजारोहण करण्यात आले. सकाळी डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक, महात्मा फुले चौक, अण्णाभाऊ साठे चौक, बसवेश्र्वर चौक ते बसस्थानकापर्यत मोटारसायकल रॅली काढण्यात आली. तर सायंकाळी सहा वाजता भव्य मिरवणूक काढण्यात आली. यावेळी प.स.चे उपसभापती माधव वाघमारे, ॲड. तात्या पाटील, मुख्याधिकारी आरबोळे, पोलीस निरीक्षक श्रीराम माचेवाड, नगरसेवक संग्राम नामवाड, महेश धूळशेटे, काँग्रेसचे सचिन केंद्रे, माजी नगराध्यक्ष किशन बोधले, गणपतराव धूळशेट्टे, ओमकार धुळशेट्टे, प्रकाश मरतुळे, सोमेश्र्वर सोपा, खादर लाटवाले, पिराजी

कोकणे, श्रावण गायकवाड, विजयकुमार तोगरे, मुक्रम बंडे, सिद्धार्थ वाघमारे, अविनाश गायकवाड, ॲड. गवळे, जयंती समितीचे अध्यक्ष वीरेंद्र वाघमारे, उपाध्यक्ष राजकुमार गवळे, सचिव सुधाकर कांबळे, सहसचिव संतोष ढवळे, कोषाध्यक्ष अरुण कांबळे, कोषाध्यक्ष कैलास कांबळे, महादेव वाघमारे आदींसह बौद्ध उपासक–उपासिका मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## रेणापूर काँग्रेस कडून डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती साजरी

**तभा वृत्तसेवा**

**रेणापूर दि. १५ एप्रिल :** रेणापूर येथे दि१४ रोजी विश्वरत्न,भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची १३५ वी जयंती रेणापूर कांग्रेसचे शहर अध्यक्ष नितीन मोटेगावकर यांच्या कार्यालयात साजरी करण्यात आली.



यावेळी विश्र्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती कार्यक्रमाचे अध्यक्ष रेणापूरचे माजी सरपंच मलिकार्जुनआप्पा हालकुडे यांच्या हस्ते प्रतिमेचे पुजन,पुष्पहार अर्पण करून करण्यात आले. यावेळी रेणाचे संचालक तुकाराम कोल्हे, रेणापूर तालुका काँग्रेस अध्यक्ष प्रमोद कापसे शहरध्यक्ष नितीन मोटेगावकर, ज्येष्ठ काँग्रेस कार्यकर्त पंडित माने,पं.स.सदस्य उद्धव जाधव, सभापती बाजार समिती उमाकांत खंलग्रे,शिवाजी आकनगिरे,नगरसेवक सचिन मोटेगावकर, पदम पाटील, बाजार समिती संचालक प्रा. राजेसाहेब खाडप, हणमंत पवार,माजी नगरसेवक भुषण पनुरे, विधी विभाग तालुकाध्यक्ष ॲड.तानाजी कनसे, सचिन पुंडलिकराव इगे, रहिम पठाण, रोहित गिरी,वैजनाथ जोगदंड, केशव माने,सतीश चव्हाण, फय्याज शेख,भीमाशंकर कोरे,मल्हारी भांबरे,जगन्नाथ गाडे,नानासाहेब व्यवहारे,बाळासाहेब करमुडे, अवदुत कातळे,अमरेश भिसे,मनोज जाधव,पृथ्वीराज देशमुख,आजम सय्यद,हमीद सय्यद, शहाजी काळे,नागेश राजे,विक्रांत पाटील, लहुदास कातळे,बाळु पटनुरे, दिग्विजय पाटील, प्रदीप काळे, मदन पांचाळ इत्यादी उपस्थित होते. कार्यक्रमाचे आभार तालुकाध्यक्ष कापसे यांनी व्यक्त केले.

## डॉ. आंबेडकरांना निलंग्यात विनम्र अभिवादन

**त.भा.वृत्तसेवा**

**निलंगा दि.१५ एप्रिल :** भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती निलंगा शहर व तालुक्यातील प्रत्येक गावागावात मोठ्या संख्येने विविध सामाजिक उपक्रमांनी साजरी करण्यात आली. निलंगा येथील टाऊन हॉल मैदानावरील डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला अभिवादन करण्यासाठी दिवसभर भीमसैनिकांची रांग लागली होती.

यावेळी अभिवादन करण्यासाठी नगराध्यक्ष संजय हलगरकर, काँग्रेस डॉक्टर सेलचे जिल्हाध्यक्ष डॉ. अरविंद भातांब्रे, माजी जि. प. अध्यक्ष पंडितराव धुमाळ, भाजपचे जिल्हा उपाध्यक्ष शेषराव ममाळे, शिवसेनेचे विनोद आर्य, सुधीर पाटील, भगवान जाधव, वंचित आघाडीच्या मंजूताई निंबाळकर, काँग्रेसचे तालुकाध्यक्ष विजयकुमार पाटील, आंबादास जाधव, आरपीआयचे जिल्हा उपाध्यक्ष अंकुश ढेरे, राष्ट्रवादीचे शहराध्यक्ष धम्मानंद काळे, गटनेते अजित नाईकवाडे, पंकज शे–ळके, चक्रधर शेळके, रजनीकांत कांबळे, नगरसेवक डॉ. गजेंद्र तरंगे, इस्माईल मनियार, सिराज देशमुख, हरीभाऊ सगरे, ईश्र्वर पाटील, रमेश कांबळे, सचिन गायकवाड, धर्मप्रकाश निंबाळकर, गणेश पेठकर, बालाजी सूर्यवंशी सुमीत इनानी, गोविंद सुर्यवंशी, प्रा. रोहित बनसोडे, विलास सुर्यवंशी, रमेश कांबळे, तुषार सोमवंशी, प्रेमनाथ गायकवाड, एम. एम. जाधव, रामलिंग पटसाळगे , डॉ. हिरालाल निंबाळकर, देवदत्त सूर्यवंशी, मुजीब सौदागर, विष्णू ढेरे, बार असोसिएशनचे अध्यक्ष ॲड पी.सी. भोसले, ॲड सी. जे. सबनीस, रवी फुलारी, नय्युम खतीब आदी भीमसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती निमित्त पुस्तक देऊन अभिवादन

**त.भा.वृत्तसेवा**

**अहमदपूर दि.१५ एप्रिल :** भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त सम्राट मित्र मंडळ, लातूर–अहमदपूर (सामाजिक संघटना) यांच्या वतीने एक आगळावेगळा आणि प्रेरणादायी उपक्रम राबविण्यात आला. जर तुमच्याकडे दोन रुपये असतील तर एक रुपयाची भाकर घ्या आणि एक रुपयाचे पुस्तक घ्या या डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांना प्रत्यक्षात उतरवत,पुस्तक देऊन अभिवादन करण्याचा हा अभिनव प्रयत्न करण्यात आला.

या उपक्रमांतर्गत आझ सकाळ पासून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याजवळ उपस्थित राहून मान्यवरांनी नागरिक व कार्यकर्त्यांनी ज्ञानरूपी पुस्तके येथे भेट देली.या उपक्रमाला समाजाच्या सर्व स्तरातून उत्स्फूर्त आणि भरभरून प्रतिसाद मिळाला.

कार्यक्रमाच्या वेळी प्रामुख्याने जेष्ठ नेते दिलीपरावजी देशमुख,मराठा प्रा.गोविंदराव शेळके,अमितभैय्यारेड्डी,रिपाई नेते अरूणभाऊ वाघंबर, सिनेट सदस्य ॲड. निखील कासनाळे, डॉ.ओ.एल.किनगांवकर,माजी उपनगराध्यक्ष कलिमोद्दीन अहमद, पत्रकार दिनकर मद्देवार, गोपीनाथराव जोंधळे,जयंती मंडळाचे अध्यक्ष सुजीत गायकवाड,जीवन गायकवाड,अंजलीताई वाघंबर,अशोकराव चापटे ,लांडगे,लामतुरे ,शिळे ,कांबळे,प्रकाश ससाणे,गोविंदराव गिरी,लखन गायकवाड ,सोहेल पठाण,डॉ.निलेश मजगे आदींनी पुस्तके भेट दिले. उपस्थित मान्यवरांनी या उपक्रमाचे मनापासून कौतुक करत सांगितले की, आजच्या काळात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांची खरी गरज आहे आणि पुस्तकाच्या माध्यमातून ज्ञान प्रसार हा त्यांच्या कार्याला खरी आदरांजली ठरते. समाजामध्ये वाचन संस्कृती वाढावी, तरुण पिढीने ज्ञानाचा मार्ग स्वीकारावा आणि बाबासाहेबांचे विचार प्रत्येक घरापर्यंत पोहोचावेत या उदात्त हेतूने हा उपक्रम राबविण्यात आल्याची प्रतिक्रीया

कार्यक्रमाचे नियोजक युवकनेते डॉ. सिद्धार्थकुमार सूर्यवंशी (सचिव – डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा समिती, अहमदपूर) यांनी दिली.

हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी जेष्ठ नेते गोपीनाथराव जोंधळे, सचिन बानाटे,आकाश पवार,शिक्षक नेते शिवाजीराव भालेराव,विलास चापोलीकर,अजय भालेराव यांच्या सह जयंती मंडळाचे पदाधिकारी तथा सम्राट मित्र मंडळाच्या सर्व सदस्यांनी विशेष परिश्रम घेतले.

लातूर
# दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## बीएसएनएल कार्यालयात आंबेडकर जयंती साजरी

तभा वृत्तसेवा

लातूर, दि. १५ एप्रिल : लातूरच्या बीएसएनएल कार्यालयात आंबेडकर जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी दूरसंचार जिल्हा प्रबंधक अनिल बनसोडे हे होते.

यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून जिल्हा न्यायाधीश राहुल भोसले, एड.बालाजी पांचाळ यांची उपस्थिती होती. मान्यवरांच्या हस्ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. त्यानंतर उपस्थित सर्वांनी प्रतिमेस पुष्प अर्पण करून विनम्र अभिवादन केले. बौद्धाचार्य देवदत्त बनसोडे यांनी त्रिशरण घेऊन कार्यक्रमाची सुरुवात केली. कार्यक्रमास उपस्थित मान्यवरांचे पुष्पगुच्छ, शाल देऊन स्वागत करण्यात आले. मंडळ अभियंता तिवारी, शाहीर यांनी आपल्या मनोगतात डॉ.आंबेडकरांच्या कार्याची महती विशद केली. न्या. राहुल भोसले यांनी आपल्या मार्गदर्शनात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी भारतीय राज्यघटनेच्या माध्यमातून समाजाला दिशा देण्याचे महान कार्य केल्याचे सांगितले. अध्यक्षीय समारोप अनिल बनसोडे यांनी केला.



## विविध वृत्त...

## सरस्वती महाविद्यालयात जयंती उत्सव साजरा



लातूर : येथील सरस्वती संगीत कला महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने विश्र्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून त्यांना विनम्र अभिवादन करून जयंती उत्साहात साजरी करण्यात आली.

याप्रसंगी महाविद्यालयातील प्रभारी प्राचार्य डॉ. पांडुरंग गोरे, प्रा. डॉ. संतोष कुलकर्णी, प्रा. डॉ. वसंत बंडे, प्रा. डॉ. सुदाम पवार, प्रा. डॉ. बालाजी शिंदे, प्रा. अमोल जाधव, प्रा. डॉ. राम खलंग्रे, प्रा. ज्योती मामडगे, प्रा. डॉ. मोनालिसा खानोरकर, प्रा. तुकाराम येमले, प्रा. श्रीमंत दोरवे, शशिकांत सोळुंके, विठ्ठल चव्हाण, बळीराम कदम, भागिरथी लाड उपस्थित होते.

याप्रसंगी महाविद्यालयातील इतिहास विभागप्रमुख प्रा. डॉ. वसंत बंडे यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे यांचे सामाजिक समतेचे विचार या विषयावर आपले विचार व्यक्त केले. यावेळी बोलताना

ते म्हणाले की, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी समग्र मानव जातीला दिलेले स्वातंत्र्य, समता, बंधुता आणि सामाजिक न्याय ही मूल्य आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे तत्त्वज्ञान हेच मानव जातीच्या कल्याणाचे सार असल्यामुळे त्यांचे विचार समाजातील प्रत्येक व्यक्तीने आत्मसात करावेत आणि आपली उन्नती साधावी असे विचार त्यांनी यावेळी व्यक्त केले. याप्रसंगी महाविद्यालयातील शिक्षकेत्तर कर्मचारी आणि विद्यार्थी उपस्थित होते.

## भविष्यात महिलांची सत्तेतील भागीदारी वाढेल : डॉ. अर्चना पाटील चाकूरकर

तभा वृत्तसेवा




लातूर,दि. १५ एप्रिल : भाजपच्या देशव्यापी नारी शक्ती वंदन अभियानाने भविष्यात महिलांची सत्तेतील भागीदारी वाढणार असल्याचे प्रतिपादन भाजपच्या महाराष्ट्र प्रदेश भाजपच्या उपाध्यक्षा डॉ.अर्चनाताई पाटील चाकूरकर यांनी मंगळवारी लातुरात पत्रकारांशी बोलताना केले. हे अभियानाचा फायदा सर्वच राजकीय पक्षातील महिला पदाधिकाऱ्यांना होणार आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दि. १६ ते १८ एप्रिल २०२६ दरम्यान संसदेचे विशेष अधिवेशन बोलावले आहे. या अधिवेशनात नारी शक्ती वंदन अभियानसह वर्ष २०२९ च्या सार्वत्रिक निवडणुकांना सामोरे जाताना संसद सदस्यांची संख्या वाढवणे, महिलांना संसद – विधिमंडळात आरक्षण देणे यासारख्या महत्वपूर्ण कायद्यात बदल करणे , घटनादुरुस्ती केली जाणार आहे. पंतप्रधानांच्या दूरदृष्टीने निर्माण झालेल्या नव्या संसद भवनात सर्वानुमते मंजूर झालेले पहिले बिल नारी शक्ती वंदन हे असल्याचा पुनरुच्चारही डॉ. चाकूरकर यांनी केला.

याच्या आधी आठवेळा हा कायदा संसदेत मांडला गेला होता. मात्र त्या त्या वेळच्या परिस्थितीमुळे कदाचित तो संमत होऊ शकला नसावा,असे आपण समजू या. पंतप्रधान मोदींनी नव्या संसद इमारतीची उभारणी वाढीव खासदार संख्या डोळ्यासमोर ठेवून केली. देशाच्या राष्ट्रपतिपदी एक महिला, दिल्लीच्या मुख्यमंत्रीपदी महिलाच विराजमान होते. हे एका रात्रीत झालेले नाही. महिलांचा खऱ्या अर्थाने सन्मान करण्याचे काम मोदी सरकारच्या माध्यमातून होतात आहे. त्यामुळे समाजात महत्वाच्या पदावर असणाऱ्या महिला भगिनींच्या भेटी घेऊन पंतप्रधानांचे अभिनंदन करणारे मेसेज देणार आहोत. यामध्ये सर्वच राजकीय पक्षाच्या महिला प्रतिनिधींना सहभागी करून घेणार आहोत. मोदींचे अनेक निर्णय महिलांच्या भोवती फिरतात. महिलांसाठी राबविलेल्या शौचालय योजनेला देण्यात आलेले इज्जत घर , उज्वला गॅस योजना, लाडकी बहीण योजना आली. माता भगिनींच्या जीवनात बदल घडवून आणला. खऱ्या अर्थाने नारी शक्तीला वंदन केले जात आहे. घरकुल योजनेतही आता महिलांचे नाव सामील करून घेतले जात आहे, ही बाब महिलांच्या मजबुतीच्या दृष्टीने महत्वपूर्ण आहे. हा विचार समाजातील तळागाळातील महिलांपर्यंत पोहचविण्याचा आमचा प्रयत्न आहे, असेदो. अर्चना पैल चाकूरकर यांनी सांगितले. यावेळी प्रेरणा होनराव, शीतल मालू,रागिणी यादव, जयश्री पाटील, जयश्री मोतीपवळे , अस्मिता काटे ,मीना गायकवाड यांची उपस्थिती होती.

## 'ज्ञानप्रकाश'च्या आर्थिक साक्षरता कार्यशाळेस प्रतिसाद

त.भा.वृत्तसेवा

लातूर दि.१५ एप्रिल : विद्यार्थ्यांमध्ये बौद्धिक क्षमतेसोबतच व्यावहारिक कौशल्यांचा विकास व्हावा, या उद्देशाने लातूर येथील 'ज्ञानप्रकाश लर्निंग होम' येथे 'गुंतवणूकः उज्ज्वल भविष्याची गुरुकिल्ली' या विषयावर आर्थिक साक्षरता कार्यशाळा उत्साहात पार पडली. या कार्यशाळेत नामांकित सीए विठ्ठल दुडिले व टॅक्स कन्सल्टंट सौ. श्रेया दुडिले यांनी विद्यार्थ्यांना गुंतवणूक आणि बचतीचे महत्त्व सोप्या भाषेत पटवून दिले.

कार्यशाळेच्या प्रारंभी श्रेया दुडिले यांनी आर्थिक साक्षरतेचे महत्त्व अधोरेखित केले. लहानपणापासूनच बचतीची सवय लावल्यास भविष्यात आर्थिकदृष्ट्या सक्षम नागरिक बनणे सुलभ होते, असे प्रतिपादन या कार्यशाळेतील सर्वात महत्त्वाचा मुद्दा म्हणजे 'चक्रवाढ व्याजाचे महत्त्व'. सीए विठ्ठल दुडिले यांनी चक्रवाढ व्याजाला जगातील आठवे आश्र्चर्य संबोधत, वेळेवर केलेली छोटी गुंतवणूक कशी वाढते हे अधोरेखित केले. केवळ बचत पुरेशी नसून, महागाईच्या दरापेक्षा अधिक परतावा देणाऱ्या पर्यायांमध्ये गुंतवणूक करणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. एसआयपी आणि स्टॉक मार्केटमधील मूलभूत संकल्पना समजून घेतल्यास तरुण पिढी आर्थिक नियोजनात यशस्वी होऊ शकते, असा मोलाचा सल्ला या सत्रातून विद्यार्थ्यांना मिळाला. त्यांनी केले. मुख्य मार्गदर्शक सीए विठ्ठल दुडिले यांनी सादरीकरणाद्वारे गुंतवणुकीचे विविध पैलू स्पष्ट करताना चक्रवाढ व्याजाची ताकद समजावून सांगितली. अल्प रकमेची सातत्यपूर्ण गुंतवणूक भविष्यात मोठ्या संपत्तीत कशी रूपांतरित होते, याचे उदाहरणांसह स्पष्टीकरण त्यांनी दिले.

यावेळी विद्यार्थ्यांना पॉकेट मनीचे नियोजन, एसआयपी, म्युच्युअल फंड आणि महागाईवर मात करण्यासाठी आवश्यक असलेल्या गुंतवणुकीच्या पर्यायांची माहिती देण्यात आली. संस्थेच्या मुख्याध्यापिका सौ. सविता सतीश नरहरे यांनी अशा उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांना व्यावहारिक ज्ञानाची जाणीव होत असल्याची भावना व्यक्त केली. या कार्यशाळेस शिक्षकवृंद आणि नववी–दहावीचे विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## शिवसेनेतर्फे गंजगोलाईत पाणपोई सुरू

लातूर : भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने येथील आंबेडकर पार्कवर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. जिल्हाप्रमुख बालाजी रेड्डी व उपजिल्हाप्रमुख बालाजी जाधव यांच्या उपस्थितीत गंजगोलाईतील सिटी बस थांब्यावर पाणपोईचा शुभारंभ करण्यात आला.

या प्रसंगी शिवसेनेचे सह संपर्क प्रमुख चंद्रनाथ मुरळीकर, युवा सेना जिल्हाप्रमुख राहुल मातोळकर, तालुकाप्रमुख शंकर रांजणकर, शहर प्रमुख माधव कलमुकले, शिवराज मुळावकर, विधानसभा प्रमुख राजेंद्र कतारे, महानगर संघटक ॲड. रवी पिचारे, विधानसभा समन्वयक सोमनाथ झुंजारे, आरोग्य सेनेचे त्र्यंबक स्वामी, शहर समन्वयक संतोष माने, उप तालुका प्रमुख सिद्धेश्र्वर जाधव, अल्पसंख्याकचे मुनीरखान पठाण, निराधारचे संतोष घोडके, फेरीवाला संघटनेचे हनुमंत पडवळ, यांच्यासह शिवसैनिक उपस्थित होते.

## शहर जिल्हा काँग्रेसच्या वतीने जयंती साजरी

त.भा.वृत्तसेवा



लातूर दि.१५ एप्रिल : लातूर : भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३५ वी जयंती लातूर शहर जिल्हा काँग्रेसच्या वतीने उत्साहात साजरी करण्यात आली. प्रारंभी डॉ. आंबेडकर पार्कवर डॉ. आंबेडकर यांच्या पुतळ्यास तर काँग्रेस भवन येथे डॉ. आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त लातूर शहर जिल्हा काँग्रेसचे अध्यक्ष ॲड. किरण जाधव यांनी डॉ. आंबेडकर यांच्या पुतळ्यास आणि काँग्रेस भवनातही डॉ. आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करुन अभिवादन केले. यावेळी माजी उपमहापौर कैलास कांबळे, राजा माने, अविनाश बट्टेवार, नामदेव इगे, करीम तांबोळी, ॲड. अंगद गायकवाड, फारुक शेख, गिरिश ब्याळे, गौत्तम वाघमारे आदी उपस्थित होते. उपस्थित पदाधिकारी, कार्यकर्त्यांनीही डॉ. आंबेडकर यांना अभिवादन केले.

## वैशाली बुद्ध विहारात जयंती उत्साहात

लातूर : येथील बौद्धनगरमधील वैशाली बुद्ध विहार येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त धम्म ध्वजाचे ध्वजारोहण , बुद्ध वंदना असा कार्यक्रम घेण्यात आला.

याप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून जिल्हा नियोजन अधिकारी सोमनाथ रेड्डी उपस्थित होते. याप्रसंगी सर्वप्रथम तथागत भगवान बुद्ध, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्प व पुष्पमाला अर्पण करून धम्म ध्वजाचे ध्वजारोहण करण्यात आले. त्यानंतर बुद्ध वंदना घेण्यात येऊन मान्यवरांचा सत्कार करण्यात आला. यावेळी लातूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे संचालक पृथ्वीराज शिरसाठ, वैशाली बुद्ध विहाराचे विश्र्वस्त सूर्यभान लातूरकर, जगन्नाथ सुरवसे, दामू कोरडे, विवेक शिरसाठ, जयंती उत्सव समितीचे ओमकार शिरसाठ, संजय कांबळे, ॲड. जोगदंड, असितकुमार कांबळे, आनंदा कांबळे, धनराज कांबळे, गौतम चिकाटे, हरिश्र्चंद्र सुरवसे, महादू गायकवाड, सुनील कांबळे, सविता चिकाटे, लता चिकटे, अनुराधा कांबळे, लता गायकवाड, छाया कांबळे, अंबाबाई घनघावे आदींसह बौद्धनगर परिसरातील सर्व बौद्ध समाज बांधव उपस्थित होते.

## लातूरमध्ये भव्य रक्तदान शिबिर

त.भा.वृत्तसेवा

लातूर, दि. १५ एप्रिल : श्री अनंत सेवाभावी संस्था, लातूर आणि अतुल मेटल वर्क्स यांच्या संयुक्त विद्यमाने एम.आय.डी.सी. परिसरातील अतुल मेटल येथे भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. सकाळी १० ते सायंकाळी ४ या वेळेत पार पडलेल्या या शिबिरात ३० रक्तदात्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत रक्तदान केले.

लातूर शहरात निर्माण झालेल्या रक्ताच्या तुटवड्याच्या पार्श्र्वभूमीवर हा उपक्रम दरवर्षी राबविण्यात येतो. एम.आय.डी.सी. परिसरातील उद्योजक, व्यापारी तसेच शहरातील नागरिकांनी या उपक्रमाला मोठा प्रतिसाद दिला.श्री अनंत सेवाभावी संस्था ही २००८ पासून सामाजिक कार्यात सक्रिय असून २०२३ पासून नियमित रक्तदान शिबिरांचे आयोजन करत आहे.

## बाबासाहेबांचा वारसा जपायचा असल्यास जीवनात पुस्तकांवर प्रेम करा : डॉ. अशोक ढवण

त.भा.वृत्तसेवा




लातूर दि.१५ एप्रिल : महाराष्ट्र ही महापुरुषांची भूमी आहे आणि आपण इथे जन्माला आलो हे आपले भाग्य आहे. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे चिंतन मूलगामी होते. कोलंबिया विद्यापीठाच्या ग्रंथालयात सर्वात आधी येणारा आणि सर्वात शेवटी जाणारा विद्यार्थी म्हणून त्यांची ओळख होती. हाच वारसा आपल्याला पुढे न्यायचा असेल, तर तरुणांनी पुस्तकांवर प्रेम करायला हवे, असे प्रतिपादन माजी कुलगुरू डॉ. अशोक ढवण यांनी केले.

येथील कृषी महाविद्यालयात महात्मा ज्योतिबा फुले व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या संयुक्त जयंती महोत्सवांतर्गत आयोजित 'सामाजिक समता सप्ताहाचा' समारोप मंगळवारी करण्यात आला. यावेळी 'भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर' या विषयावर आयोजित व्याख्यानात डॉ. ढवण प्रमुख मार्गदर्शक म्हणून बोलत होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. बाबासाहेब ठोंबरे होते. यावेळी माजी अधिकारी सोमेश्र्वर वाघमारे, डॉ. ज्योती देशमुख, डॉ. अनिलकुमार कांबळे यांची प्रमुख उपस्थिती होती. डॉ. ढवण पुढे म्हणाले की, बाबासाहेबांनी मजूरमंत्री असताना स्त्रियांसाठी प्रसूती रजा आणि विम्याची केलेली तरतूद त्यांच्या विशाल कर्तृत्वाची साक्ष देते. यावेळी सलग १८ तास अध्ययन उपक्रम आणि विविध स्पर्धांमधील यशस्वी विद्यार्थ्यांचा मान्यवरांच्या हस्ते साकार करण्यात आला.

अध्यक्षीय समारोपात अधिष्ठाता डॉ. बाबासाहेब ठोंबरे यांनी विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासावर भर दिला. वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठात विद्यार्थ्यांचा केवळ गुणात्मकं दर्जा सुधारण्यावरच नाही, तर त्यांच्या ज्ञानाला शहाणपणाची जोड देण्यावर भर दिला जातो. महापुरुषांच्या विचारातून प्रेरणा घेऊन या विद्यापीठाने 'हरित विद्यापीठ' पुरस्कारापर्यंत मजल मारली असून, विद्यार्थ्यांनी चांगले नागरिक व्हावे, अशी अपेक्षा त्यांनी यावेळी व्यक्त केली.

## नाट्यवेड्या कल्याण वाघमारे यांचे दुःखद निधन

त.भा.वृत्तसेवा

लातूर दि.१५ एप्रिल : लातूरच्या सांस्कृतिक विश्र्वावर शोककळा पसरवणारी अत्यंत वेदनादायी बातमी समोर आली आहे. नाट्य क्षेत्रात आपल्या अभिनय, दिग्दर्शन आणि सर्जनशीलतेच्या जोरावर वेगळी ओळख निर्माण करणारे रंगकर्मी कल्याण वाघमारे यांचे दि. १४ एप्रिल २०२६ रोजी दुपारी १२:२० वाजता संभाजीनगर (औरंगाबाद) येथील एका खाजगी रुग्णालयात उपचारादरम्यान दुःखद निधन झाले. ते अवघे ४८ वर्षांचे होते. कल्याण वाघमारे हे केवळ एक कलाकार नव्हते, तर ते नाटकावर जीवापाड प्रेम करणारे खरे नाट्यवेडे होते. त्यांच्या जाण्याने लातूरच्या रंगभूमीतील एक महत्त्वाचा स्तंभ कोसळला आहे.

नाटकासाठी जगलेले आयुष्य

कॉलेज जीवनापासूनच कल्याण यांना नाटकाची विलक्षण ओढ होती. वर्गात बसण्यापेक्षा ते तालमीत रमायचे. युवक महोत्सव असो किंवा सांस्कृतिक स्पर्धा – भारुड, एकपात्री, एकांकिका, दीर्घांक अशा सर्व प्रकारांमध्ये त्यांनी आपली छाप पाडली. नाटक म्हणजे त्यांच्यासाठी केवळ कला नव्हती, तर तो त्यांचा श्वास होता.

दिनांक : १३/४/२६

## जाहीर प्रगटन

### शाळेचे हस्तांतर करणे बाबत

हस्तांतर करुन देणारी संस्था श्री साई बहुउद्देशीय सेवाभावी संस्था औसा ता. औसा जि. लातूर द्वारा संचलित स्पर्श इंग्लिश स्कूल औसा ता. औसा जि. लातूर ही शाळा हस्तांतर करुन घेणारी संस्था नवजीवन सेवाभावी संस्था औसा ता. औसा जि. लातूर या संस्थेवर विद्यार्थ्याचे हित लक्ष्यात घेता लिहुन देणार व घेणार संस्थेचे अध्यक्ष / सचिव या दोन्ही संस्थेने ठराव पास करुन हस्तांतर करुन घेण्याचा व देण्याचा ठराव घेतला असुन सदर ठराव ही विना मोबदला घेतला आहे. साई बहुउद्देशीय सेवाभावी संस्था औसा ता. औसा द्वारा संचलीत स्पर्श इंग्लिश स्कूल औसा ता.औसा जि.लातूर ही शाळा इंग्रजी माध्यमाची असुन स्वयंम अर्थ तत्वावर मान्यता आहे. शाळा हस्तांतर बाबत लातूर जिल्हा औसा ता. औसा जि. लातूर तालुकाच्या व जिल्ह्यातील सर्व लोकांना जाहिर प्रगटन द्वारे सुचित करण्यात येते. शाळा हस्तांतरण बाबत कोणाची काही हरकत व उजर असल्यास शिक्षण, अधिकारी माध्यमिक लातूर व उपसंचालक, शिक्षण विभाग लातूर विभाग लातूर यांना जाहिर प्रगटन दिल्यापासुन १५ दिवसाच्या आत सादर करावयाचे आहे. १५ दिवसाच्या नंतर आक्षेप आल्यास ग्राहय धरता येणार नाही. व त्यानंतर हस्तांतरची कार्यवाही करण्यात येईल. जाहिर प्रगटन देणार व घेणार संस्था

**अध्यक्ष / सचिव,**
**श्री साई बहुउद्देशीय सेवाभावी संस्था औसा**
**ता.औसा जि.लातूर**

दि. १५/०४/२०२६

## जाहीर नोटीस

आमचे अशिल बँक ऑफ बडौदा, शाखा – औसा रोड, लातूर यांनी दिलेल्या माहीतीवरुन व दाखवलेल्या कागदपत्रावरुन मी ॲड. राहुल च. शेळके, रा. दु. न. ८५, दुसरा मजला, न्यु आदर्श शॉपींग कॉम्प्लेक्स, औसा रोड, लातूर, ता. जि. लातूर या जाहीर नोटीसने सर्व तमाम नागरीकांना, बँकाना व पत संस्थेना कळवितो की,

१. मिळकतीचे वर्णन लातूर मनपा हद्दीतील मौजे कन्हेरी विभागातील जमीन सर्वे क्र. १३/३/ई पैकीचा प्लॉट क्र. १३, ज्याची लांबी पुर्व–पश्र्चिम ५० फुट व रुंदी दक्षिण–उत्तर ३५ फुट, एकुण क्षेत्रफळ १७५० चौ. फुट (१६२.६३ चौ. मी.), ज्याचा मनपा मिळकत क्र. बी–७–२१६२, सदरची मिळकत ही मनिषा सुर्यभान जगताप यांचे मालकीची आहे.

२. वरील मिळकत ही मनिषा सुर्यभान जगताप यांचे मालकीची आहे. सदरची मिळकत ही नोंदणीकृत खरेदीखत दस्त क्र. १९६१/२००९, दि. १५/०५/२००९ अन्वये एहसानखाँ बाशिदखाँ पठाण यांनी मनिषा सुर्यभान जगताप यांच्या हक्कात करुन दिले. सदरचे अस्सल खरेदीखत हे मनिषा सुर्यभान जगताप यांचे ताब्यात दिलेले होते. तथापी, सदरचे अस्सल नोंदणीकृत खरेदीखत दस्त क्र. १९६१/२००९, दि. १५/०५/२००९ हे मनिषा सुर्यभान जगताप यांचे ताबेतुन गहाळ झाले असल्याचे त्यांनी आमचे अशिल यांना सांगीतले आहे. सदरची मिळकत ही पुर्णपणे निर्वेध व निष्कर्जी असले बाबत निर्वाळा मनिषा सुर्यभान जगताप यांनी आमचे अशिल यांना दिलेला आहे. सदर अस्सल खरेदीखत कोणत्याही वित्तीय संस्थेमध्ये त्यांनी तारण म्हणुन ठेवलेले नाही.

३. मनिषा सुर्यभान जगताप यांनी सदरची मिळकत तारण देऊन कर्जाची मागणी केलेली आहे. सदरचे मिळकतीचे तारणावर आमचे अशिल बँक हे मनिषा सुर्यभान जगताप यांना कर्ज देणार असुन, मनिषा सुर्यभान जगताप हे सदर मिळकत ही आमचे अशिल बँकेकडे सदर कर्जास तारण गहाण दस्ताने तारण गहाण देणार आहेत.

४. सबब या जाहीर नोटीसीने सर्व तमाम नागरीकांना, बँकाना व पत संस्थेना कळविणेत येते की, सदर मिळकतीवर जर अन्य कोणाचा कसलाही हक्क, अधिकार, बोजा अगर मिळकतीबाबत कसल्याही प्रकारचे तारण गहाण, करार, साठेखत वगैरे असलेस त्यांनी सात (७) दिवसाचे आत लेखी पुरावे सहीत हरकत माझेकडे दयावी, अन्यथा सदर मिळकतीचे तारण गहाण व कर्जा बाबत कोणाचीही कसलीही हरकत नाही असे समजुन आमचे अशिल सदर मिळकत तारण गहाण घेतील व त्यांचे नावे कर्ज मंजुर करतील, त्यानंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही व ते आमचे अशिल बँकेवर बंधनकारक राहणार नाही.

सबब ही जाहीर नोटीस.

तर्फे,
**ॲड. राहुल च. शेळके, लातूर.**
**मोबाईल नं . ९९६००९९६७०, ९४२१३५४८५३**

# धाराशिव जिल्हा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## धाराशिवात सामाजिक समता सप्ताहाचा समारोप

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१५ एप्रिल -**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक समता सप्ताहानिमित्त सामाजिक न्याय भवन येथे समारोप कार्यक्रम उत्साहात पार पडला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जिल्हाधिकारी किर्ती किरण पुजार तर प्रमुख पाहुणे म्हणून मुख्य कार्यकारी अधिकारी प्रियवदा महाडदळकर, पोलीस अधीक्षक रितु खोखर व समाज कल्याण सभापती विश्वास कोकणे उपस्थित होते.

यावेळी प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. अनुसूचित जाती-जमाती अत्याचार प्रतिबंध कायद्यांतर्गत पीडित रोहन बागुल यांना शासकीय नोकरीचे नियुक्ती आदेश देण्यात आले, तसेच एमपीएससीत निवड झालेल्या संदीप पाटील यांचा सत्कार करण्यात आला.

विद्यार्थ्यांचा गौरव, रक्तदात्यांचा सन्मान, विविध योजनांच्या लाभार्थ्यांना धनादेश व जात वैधता प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आले.

प्रा. रवी सुरवसे यांनी आंबेडकरांच्या विचारांवर मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचा समारोप उत्साहात झाला.



### संक्षिप्त वृत्त...



## तुळजापूरात जनसागराकडून भीमवंदना

**तुळजापूर, दि.१५ एप्रिल -**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त शहरात अभूतपूर्व उत्साह पाहायला मिळाला. विविध भागांतून भीम अनुयायी, सामाजिक संघटना व नागरिक मोठ्या संख्येने सहभागी होत महामानवांना अभिवादन केले. शहर निळ्या रंगात न्हाऊन निघाल्याचे चित्र दिसून आले. पुतळे व प्रतिमांना पुष्पहार अर्पण करून ढोल-ताशांच्या गजरात 'जय भीम'च्या घोषणांनी वातावरण दणाणून गेले. विविध मान्यवरांनी उपस्थित राहून आंबेडकरांच्या विचारांवर चालण्याचे आवाहन केले. जयंतीनिमित्त रक्तदान शिबिरे, व्याख्याने, सांस्कृतिक कार्यक्रम व विद्यार्थ्यांसाठी स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. युवक व महिलांचा उत्स्फूर्त सहभाग दिसून आला. पोलिसांच्या चोख बंदोबस्तात सर्व कार्यक्रम शांततेत पार पडले.



## नळदुर्ग भाजप कार्यालयात डॉ. आंबेडकर जयंती साजरी

**नळदुर्ग, दि.१५ एप्रिल -**


डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त नळदुर्ग येथील भाजप कार्यालयात त्यांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन करण्यात आले. नगराध्यक्ष बसवराज धरणे यांच्या हस्ते पूजन करण्यात आले. यावेळी ग्रामीण तालुका अध्यक्षा रंजना राठोड, गटनेते दत्तात्रय दासकर, भाजयुमो जिल्हा सरचिटणीस श्रमिक पोतदार, लहुजी शक्ती सेनेचे जिल्हाध्यक्ष शिवाजी गायकवाड यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.



## कळंब येथे आंबेडकर जयंती उत्साहात; अन्नदान उपक्रम

**कळंब, दि.१५ एप्रिल -**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर तसेच क्रांतिसूर्य अण्णासाहेब जावळे पाटील यांच्या जयंतीनिमित्त बसस्थानक परिसरातील आंबेडकर चौक येथे अखिल भारतीय छावा मराठा युवा संघटना व संविधान ग्रुप यांच्या संयुक्त विद्यमाने जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी राजाभाऊ साळुंके यांची प्रमुख उपस्थिती होती. विविध मान्यवरांनी आंबेडकरांच्या कार्याचा गौरव करत विचारांवर मार्गदर्शन केले. कार्यक्रमानिमित्त अन्नदान करून आनंदोत्सव साजरा करण्यात आला. या कार्यक्रमास राजकन्या जावळे, माजी आमदार दयानंद गायकवाड, वासुदेव पाचंगे, अरबाज पठाण, सुरज वाघमारे, श्रीकांत कवडे यांच्यासह छावा संघटनेचे पदाधिकारी व भीम अनुयायी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमासाठी विठ्ठल यादव व अमर गायकवाड यांनी परिश्रम घेतले. सूत्रसंचालन सुरज वाघमारे यांनी केले तर आभार अमर गायकवाड यांनी मानले.



## मंगरुळ येथे आंबेडकर जयंती साजरी

**मंगरूळ, दि.१५ एप्रिल -**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त भिमनगर, ग्रामपंचायत कार्यालय तसेच गावातील सर्व शाळांमध्ये विविध कार्यक्रमांचे आयोजन करून उत्साहात जयंती साजरी करण्यात आली. भिमनगर व ग्रामपंचायत कार्यालयात मान्यवरांच्या हस्ते प्रतिमा पूजन करण्यात आले. गावातील शाळांमध्ये विद्यार्थ्यांनी सलग चार तास वाचन करून अभिवादन केले. संत गाडगे बाबा आश्रम शाळेत दीपप्रज्वलन, त्रिशरण पंचशील ग्रहण व संविधानाच्या उद्देशिकेचे वाचन करण्यात आले. विद्यार्थ्यांनी भाषणे, गीतगायन व सांस्कृतिक कार्यक्रम सादर केले. शेवटी सर्वांना मिठाई वाटप करण्यात आले.

## कळंब येथे रक्तदान शिबिर

**कळंब, दि.१५ एप्रिल -**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त डीजी ग्रुप व डॉ.बी.आर. आंबेडकर प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमाने भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. शहरातील पूर्णाकृती पुतळ्याजवळ आयोजित या शिबिराला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. विविध घटकांतील सुमारे ६० रक्तदात्यांनी सहभाग नोंदवत रक्तदान केले. यावेळी अजित पिंगळे, डी. जी. हौसलमल, सुनील गायकवाड, राहुल हौसलमल, अभिजीत हौसलमल, प्रविण देशमाने, रितीक हौसलमल आदी मान्यवर उपस्थित होते.

# मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रमात धाराशिव जिल्हा अव्वल

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१५ एप्रिल -**

मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम' (CMEGP) प्रभावीपणे राबवत धाराशिव जिल्ह्याने सलग चार वर्षे १०० टक्क्यांपेक्षा अधिक उद्दिष्टपूर्ती करत राज्यात अव्वल स्थान मिळवले आहे. रोजगारनिर्मिती, स्वावलंबन आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेला चालना देणारे हे मॉडिल राज्यासाठी आदर्श ठरत आहे.

सन २०२५-२६ मध्ये ७८० उद्दिष्टाच्या तुलनेत तब्बल १०१५ प्रकल्प मंजूर होऊन १३०.१३ टक्के उद्दिष्टपूर्ती साध्य झाली.

यापूर्वीच्या तीन वर्षांतही जिल्ह्याने शंभर टक्क्यांहून अधिक प्रगती नोंदवली आहे. चार वर्षांत हजारो उद्योजकांना अनुदान देत रोजगाराच्या मोठ्या संधी निर्माण करण्यात आल्या आहेत.





या यशामध्ये महिलांचा सहभाग विशेष ठरला असून यंदा मंजूर झालेल्या प्रकल्पांपैकी ६२२ प्रकल्प महिला उद्योजिकांचे आहेत. ब्युटी पार्लर, पिठाची गिरणी, मसाला व खाद्यप्रक्रिया उद्योगांमध्ये महिलांनी पुढाकार घेत स्वावलंबनाची नवी दिशा दाखवली आहे.

जिल्ह्यातील विविध तालुक्यांमध्ये दुग्ध व्यवसाय, गारमेंट, डाळ मिल, हॉटेल, इव्हेंट मॅनेजमेंट यांसारखे उद्योग वाढीस लागले आहेत. तरुणांचा आधुनिक व्यवसायांकडेही कल वाढत असून खाद्यपदार्थ, कपडे, सेवा क्षेत्रातील उद्योगांना चालना मिळत आहे.

जिल्हाधिकारी किर्ती किरण पुजार व जिल्हा उद्योग केंद्राचे महाव्यवस्थापक अमोल बळे यांच्या मार्गदर्शनाखाली बँकांच्या समन्वयातून हजारो प्रस्तावांना कर्ज मंजूर करण्यात आले.

त्यामुळे धाराशिव जिल्हा रोजगारनिर्मिती व उद्योजकतेत 'रोल मॉडेल' म्हणून उदयास आला आहे.

## डोकेवाडी येथे मोटर सायकल चोरी

**तभा वृत्तसेवा**
**भूम, दि.१५ एप्रिल -**

डोकेवाडी (ता.भूम) येथील शेतकरी राजेंद्र पवार यांची मोटर सायकल गाडी नंबर एमएच-२५ यु



६१२० राहत्या घराजवळ उभा केलेली असता गाडी मंगळवारी रात्री २.३० वाजेच्या सुमारास चोरी गेल्याची घटना घडली आहे. याप्रकरणी वाशी पोलीस ठाणे तक्रार दिली असून गुन्हा नोंद करण्याचे काम सुरू आहे.

## समता नगरमध्ये भीमजयंती साजरी



**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.१५ एप्रिल -**

समता नगर, तुळजापूर येथे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त विविध सामाजिक, सांस्कृतिक व प्रबोधनात्मक कार्यक्रमांचे उत्साहात आयोजन करण्यात आले. परिसरातील नागरिक, युवक आणि सामाजिक कार्यकर्त्यांनी उपस्थित राहून महामानवांना अभिवादन केले.

कार्यक्रमाची सुरुवात गौतम बुद्ध, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, छत्रपती शिवाजी महाराज, संत रोहिदास, महात्मा ज्योतिराव फुले, छत्रपती शाहू महाराज आणि अण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करून करण्यात आली.

यावेळी सामाजिक कार्यकर्ते व युवा उद्योजक गणेश पुजारी, जयंती उत्सव समितीचे अध्यक्ष ॲड. रामचंद्र ढवळे, चंद्रकांत साळुंके, भागवत जेटीथोर, मधुकर बनसोडे, वामन गायकवाड, अभिमन्यू शिंदे, विलास सरवदे, रंगनाथ कदम, ॲड. बाबासाहेब वडवे, निरंजन व्हरकट, नागनाथ शिंदे, विनोद धाकतोडे, कुंभार ग्रामसेवक, नितीन चौधरी तसेच समतानगर परिसरातील महिला, युवक आणि ज्येष्ठ नागरिक उपस्थित होते. सायंकाळी भिमगीतांची संगीत मैफिल साजरी करण्यात आली.

## ढगपिंपरी येथे आंबेडकर जयंती उत्साहात

**तभा वृत्तसेवा**
**परंडा, दि.१५ एप्रिल -**

तालुक्यातील ढगपिंपरी येथे जिल्हा परिषद शाळा व ग्रामपंचायत कार्यालयात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त कार्यक्रम उत्साहात साजरा करण्यात आला.

यावेळी माजी सरपंच व शिवसेना युवा नेते अशोक गरड यांच्या हस्ते बाबासाहेबांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून पूजन करण्यात आले. कार्यक्रमास मुख्याध्यापक जी.एम. खरसडे, आर.एम. पाटील, यादव, इंगळे, मोरे, सांगडे, कदम यांच्यासह ग्रामस्थ व मान्यवर उपस्थित होते.

उपस्थितांनी बाबासाहेबांना अभिवादन करत त्यांच्या विचारांचे स्मरण केले.

## १४ तास अभ्यासातून बाबासाहेबांना अभिवादन; १६ जिल्ह्यांतील ७५० विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग

**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.१५ एप्रिल -**

धाराशिव येथील श्री साई श्रद्धा सेवाभावी संस्थेच्या वतीने भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त यावर्षी एक अनोखा व प्रेरणादायी उपक्रम राबविण्यात आला. विद्यार्थ्यांनी तब्बल १४ तास सातत्याने अभ्यास करून महामानवाला अभिवादन केले.

या उपक्रमात राज्यातील तब्बल १६ जिल्ह्यांमधील सुमारे ७५० विद्यार्थी, शिक्षक व अभ्यासकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे शिक्षणाला सर्वोच्च स्थान देणारे व्यक्तिमत्त्व होते. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत त्यांनी शिक्षण घेत जगभरातील विद्यापीठांतून उच्च पदव्या संपादन केल्या.



त्यांचे विचार शिक्षण, समता, बंधुता आणि न्याय या मूल्यांभोवती केंद्रित होते. धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, पुसद, अमरावती, नंदुरबार, धुळे, ठाणे, पुणे, नाशिक आदी जिल्ह्यांसह एकूण १६ जिल्ह्यांतील विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. विशेष म्हणजे नीट, सीईटी व इतर स्पर्धा परीक्षांची तयारी करणारे विद्यार्थी, शिक्षक आणि शिक्षणप्रेमी नागरिकांनी मोठ्या प्रमाणावर सहभाग नोंदवून उपक्रम यशस्वी केला.

या उपक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रा. सोमनाथ लांडगे, उषा लांडगे, नागेश गोटे, देविदास बिनवडे, ऋषिकेश लांडगे तसेच अनेक पालक व विद्यार्थ्यांनी परिश्रम घेतले.

## परंड्यात डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्साहात साजरी; भाजपा व आर.बी. ग्रुपचा संयुक्त उपक्रम

**तभा वृत्तसेवा**
**परंडा, दि.१५ एप्रिल -**

भारतीय जनता पार्टी परंडा शहर व ग्रामीणच्या वतीने येथील छत्रपती शिवाजी महाराज चौकात भारतीय संविधानाचे शिल्पकार, बोधीसत्व, महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त अभिवादन करण्यात आले.

यावेळी भाजपा नेते मा. आ. सुजितसिंह ठाकूर, जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष तथा जि.प. सदस्य धनंजय दादा सावंत, भाजपा तालुकाध्यक्ष अरविंदबप्पा रगडे आणि शहराध्यक्ष उमाकांत गोरे यांच्या हस्ते डॉ. आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून बुद्ध वंदना घेण्यात आली.



कार्यक्रमास उपनगराध्यक्ष समरजीतसिंह ठाकूर, अविनाश विधाते, धनाजी गायकवाड, ॲड. जहीर चौधरी, गौतम लटके, जयदेव गोफणे, विकास कुलकर्णी, ॲड. भालचंद्र औसरे, ॲड. तानाजी वाघमारे, शिवाजीराव पाटील, हनुमंत पाटील, केदार पाटील, सत्तार पठाण, इस्माईल कुरेशी, अनिल शिंदे, मदनसिंह सद्दिवाल, अब्बास मुजावर, सोमनाथ आलबत्ते, मजहर देहलुस, अकिब पठाण, साहेबराव पाडुळे, परसराम कोळी, जोतीराम गिरवले, सारंग घोगरे, बाबासाहेब गिरी, शंकर ईतापे, दिपक गायकवाड, रणजित मिस्कीन, पांडुरंग मुसळे, रामकृष्ण घोडके, अजिम हन्नुरे, धनंजय काळे, गौरव पाटील, सिध्दीक हन्नुरे, सुरज काळे, मिलिंद शिंदे, निर्मलकुमार गांधले, किशोर वाघमारे, प्रा. विलास गायकवाड, सागर पाटील, अभिषेक चोबे, रामेश्वर चोबे, जोती भातलवंडे तसेच इतर पदाधिकारी, कार्यकर्ते आणि विविध क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## धाराशिवात आंबेडकर जयंतीनिमित्त अन्नदान कार्यक्रम



**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१५ एप्रिल -**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त शहरात पुतळ्यास अभिवादन करून अन्नदान कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. सामाजिक समता सप्ताहानिमित्त समाज कल्याण विभागाच्या वतीने मसाले भात व जिलबीचे वाटप करण्यात आले.

अन्नदान स्टॉलचे उद्घाटन जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार, मुख्य कार्यकारी अधिकारी प्रियंवदा महाडदळकर, पोलीस अधीक्षक रितू खोखर व समाज कल्याण समिती सभापती विश्वास कोकणे यांच्या हस्ते करण्यात आले.

या कार्यक्रमास सहाय्यक आयुक्त सचिन कवले, समाज कल्याण अधिकारी सनम लामकाने यांच्यासह अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. या उपक्रमातून समाजात समता, बंधुता व सेवाभावाचा संदेश देण्यात आला.

## व्ही.पी.एज्युकेशनल कॅम्पसमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना अभिवादन



**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१५ एप्रिल -**

व्ही.पी.एज्युकेशनल कॅम्पस छत्रपती संभाजी नगर रोड, धाराशिव येथे डॉ. प्रतापसिंह पाटील व करण प्रतापसिंह पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती साजरी करण्यात आली.

कार्यक्रमाची सुरुवात डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. यावेळी संस्थेचे पदाधिकारी, प्राचार्य, प्राध्यापक, कर्मचारी तसेच विद्यार्थ्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. या प्रसंगी वक्त्यांनी डॉ. आंबेडकर यांच्या कार्याचा व विचारांचा आढावा घेतला. त्यांनी भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार म्हणून केलेले कार्य, सामाजिक समता आणि शिक्षणाचे महत्त्व याबाबत मार्गदर्शन केले.

यावेळी, प्रशासकीय अधिकारी प्राचार्य डॉ. सुरज ननवरे, बी.एड.महाविद्यालयाचे प्राचार्य ऋषिकेश लोमटे, जय हिंद जुनियर कॉलेजच्या प्राचार्या अंजुम शेख, संकुलाचे लेखापाल प्रा.योगेश मंडलिक, तसेच कॅम्पस मधील सर्व महाविद्यालयातील प्राध्यापक व विद्यार्थी उपस्थित होते.


### जाहीर प्रगटन

जा.क्र.२०२५/संकीर्ण/कावी-२६८
तहसिल कार्यालय, भूम
दिनांक-२७/३/२०२६

समस्त गावकरी डोकेवाडी ता.भूम जि.धाराशिव यांना कळविण्यात येते की, या कार्यालयात **श्री/श्रीमती अमर अकबर नाईकवाडी रा. डोकेवाडी** यांनी जन्म आदेश मिळणेबाबत अर्ज केला आहे.

जन्म झालेल्याचे नाव **अमर अकबर नाईकवाडी** यांचा जन्म **दि. ०१/०३/१९८३** या दिवशी डोकेवाडी या ठिकाणी झाला असून आदेश मिळणे संबंधी सदरील कार्यालयात **दि. ०६/०८/२०२५** रोजी अर्ज केला आहे.

वरील जन्म नोंद बाबत कोणाचा आक्षेप असल्यास हे प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून पंधरा (१५) दिवसाच्या आत आपला लेखी आक्षेप या कार्यालयास सादर करावा. मुदतीनंतर च्या आक्षेप अर्जाचा विचार केला जाणार नाही, यांची नोंद घ्यावी.

स्वाक्षरित/-
जयवंत पाटील
तहसीलदार भूम

### जाहीर प्रगटन

जा.क्र.२०२५/संकीर्ण/कावी-२६६
तहसिल कार्यालय, भूम
दिनांक-२७/३/२०२६

समस्त गावकरी डोकेवाडी ता.भूम जि.धाराशिव यांना कळविण्यात येते की, या कार्यालयात **श्री/श्रीमती मोशिन अकबर नाईकवाडी रा. डोकेवाडी** यांनी जन्म आदेश मिळणेबाबत अर्ज केला आहे.

जन्म झालेल्याचे नाव **मोशिन अकबर नाईकवाडी** यांचा जन्म **दि. १३/०७/१९९२** या दिवशी डोकेवाडी या ठिकाणी झाला असून आदेश मिळणे संबंधी सदरील कार्यालयात **दि. ०६/०८/२०२५** रोजी अर्ज केला आहे.

वरील जन्म नोंद बाबत कोणाचा आक्षेप असल्यास हे प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून पंधरा (१५) दिवसाच्या आत आपला लेखी आक्षेप या कार्यालयास सादर करावा. मुदतीनंतर च्या आक्षेप अर्जाचा विचार केला जाणार नाही, यांची नोंद घ्यावी.

स्वाक्षरित/-
जयवंत पाटील
तहसीलदार भूम

### जाहीर प्रगटन

जा.क्र.२०२५/संकीर्ण/कावी-२६८
तहसिल कार्यालय, भूम
दिनांक-२७/३/२०२६

समस्त गावकरी डोकेवाडी ता.भूम जि.धाराशिव यांना कळविण्यात येते की, या कार्यालयात **श्री/श्रीमती समीर अकबर नाईकवाडी रा. डोकेवाडी** यांनी जन्म आदेश मिळणेबाबत अर्ज केला आहे.

जन्म झालेल्याचे नाव **समीर अकबर नाईकवाडी** यांचा जन्म **दि. ०१/०५/१९८९** या दिवशी डोकेवाडी या ठिकाणी झाला असून आदेश मिळणे संबंधी सदरील कार्यालयात **दि. ०६/०८/२०२५** रोजी अर्ज केला आहे.

वरील जन्म नोंद बाबत कोणाचा आक्षेप असल्यास हे प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून पंधरा (१५) दिवसाच्या आत आपला लेखी आक्षेप या कार्यालयास सादर करावा. मुदतीनंतर च्या आक्षेप अर्जाचा विचार केला जाणार नाही, यांची नोंद घ्यावी.

स्वाक्षरित/-
जयवंत पाटील
तहसीलदार भूम

### जाहीर प्रगटन

जा.क्र.२०२५/संकीर्ण/कावी-२६७
तहसिल कार्यालय, भूम
दिनांक-२७/३/२०२६

समस्त गावकरी डोकेवाडी ता.भूम जि.धाराशिव यांना कळविण्यात येते की, या कार्यालयात **श्री/श्रीमती आशिया अकबर नाईकवाडी रा. डोकेवाडी** यांनी जन्म आदेश मिळणेबाबत अर्ज केला आहे.

जन्म झालेल्याचे नाव **आशिया अकबर नाईकवाडी** यांचा जन्म **दि. १०/१२/२०००** या दिवशी डोकेवाडी या ठिकाणी झाला असून आदेश मिळणे संबंधी सदरील कार्यालयात **दि. ०६/०८/२०२५** रोजी अर्ज केला आहे.

वरील जन्म नोंद बाबत कोणाचा आक्षेप असल्यास हे प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून पंधरा (१५) दिवसाच्या आत आपला लेखी आक्षेप या कार्यालयास सादर करावा. मुदतीनंतर च्या आक्षेप अर्जाचा विचार केला जाणार नाही, यांची नोंद घ्यावी.

स्वाक्षरित/-
जयवंत पाटील
तहसीलदार भूम

# लातूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## बीएसएनएल कार्यालयात आंबेडकर जयंती साजरी

तभा वृत्तसेवा

लातूर, दि. १५ एप्रिल : लातूरच्या बीएसएनएल कार्यालयात आंबेडकर जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी दूरसंचार जिल्हा प्रबंधक  अनिल बनसोडे हे होते.

यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून जिल्हा न्यायाधीश राहुल भोसले, एड.बालाजी पांचाळ यांची उपस्थिती होती. मान्यवरांच्या हस्ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. त्यानंतर उपस्थित सर्वांनी प्रतिमेस पुष्प अर्पण करून विनम्र अभिवादन केले. बौद्धाचार्य देवदत्त बनसोडे यांनी त्रिशरण घेऊन कार्यक्रमाची सुरुवात केली. कार्यक्रमास उपस्थित मान्यवरांचे पुष्पगुच्छ, शाल देऊन स्वागत करण्यात आले. मंडळ अभियंता तिवारी, शाहीर यांनी आपल्या मनोगतात डॉ.आंबेडकरांच्या कार्याची महती  विशद केली. न्या. राहुल भोसले यांनी आपल्या  मार्गदर्शनात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी भारतीय राज्यघटनेच्या माध्यमातून समाजाला दिशा देण्याचे महान कार्य केल्याचे सांगितले. अध्यक्षीय समारोप अनिल बनसोडे यांनी केला.



## विविध वृत्त...

## सरस्वती महाविद्यालयात जयंती उत्सव साजरा



लातूर : येथील सरस्वती संगीत कला महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने विश्र्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून त्यांना विनम्र अभिवादन करून जयंती उत्साहात साजरी करण्यात आली.

याप्रसंगी महाविद्यालयातील प्रभारी प्राचार्य डॉ. पांडुरंग गोरे, प्रा. डॉ. संतोष कुलकर्णी, प्रा. डॉ. वसंत बंडे, प्रा. डॉ. सुदाम पवार, प्रा. डॉ. बालाजी शिंदे, प्रा. अमोल जाधव, प्रा. डॉ. राम खलंग्रे, प्रा. ज्योती मामडगे, प्रा. डॉ. मोनालिसा खानोरकर, प्रा. तुकाराम येमले, प्रा. श्रीमंत दोरवे, शशिकांत सोळुंके, विठ्ठल चव्हाण, बळीराम कदम, भागिरथी लाड उपस्थित होते.

याप्रसंगी महाविद्यालयातील इतिहास विभागप्रमुख प्रा. डॉ. वसंत बंडे यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे यांचे सामाजिक समतेचे विचार या विषयावर आपले विचार व्यक्त केले. यावेळी बोलताना

ते म्हणाले की, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी समग्र मानव जातीला दिलेले स्वातंत्र्य, समता, बंधुता आणि सामाजिक न्याय ही मूल्य आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे तत्त्वज्ञान हेच मानव जातीच्या कल्याणाचे सार असल्यामुळे त्यांचे विचार समाजातील प्रत्येक व्यक्तीने आत्मसात करावेत आणि आपली उन्नती साधावी असे विचार त्यांनी यावेळी व्यक्त केले. याप्रसंगी महाविद्यालयातील शिक्षकेत्तर कर्मचारी आणि विद्यार्थी उपस्थित होते.

## वैशाली बुद्ध विहारात जयंती उत्साहात

लातूर : येथील बौद्धनगरमधील वैशाली बुद्ध विहार येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त धम्म ध्वजाचे ध्वजारोहण , बुद्ध वंदना असा कार्यक्रम घेण्यात आला.

याप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून जिल्हा नियोजन अधिकारी सोमनाथ रेड्डी उपस्थित होते. याप्रसंगी सर्वप्रथम तथागत भगवान बुद्ध, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्प व पुष्पमाला अर्पण करून धम्म ध्वजाचे ध्वजारोहण करण्यात आले. त्यानंतर बुद्ध वंदना घेण्यात येऊन मान्यवरांचा सत्कार करण्यात आला. यावेळी लातूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे संचालक पृथ्वीराज शिरसाठ, वैशाली बुद्ध विहाराचे विश्र्वस्त सूर्यभान लातूरकर, जगन्नाथ सुरवसे, दामू कोरडे, विवेक शिरसाठ, जयंती उत्सव समितीचे ओमकार शिरसाठ, संजय कांबळे, ॲड.  जोगदंड, असितकुमार कांबळे, आनंदा कांबळे, धनराज कांबळे, गौतम चिकाटे, हरिश्र्चंद्र सुरवसे, महादू गायकवाड, सुनील कांबळे, सविता चिकाटे, लता चिकटे, अनुराधा कांबळे, लता गायकवाड, छाया कांबळे, अंबाबाई घनघावे आदींसह बौद्धनगर परिसरातील सर्व बौद्ध समाज बांधव उपस्थित होते.

## भविष्यात महिलांची सत्तेतील भागीदारी वाढेल : डॉ. अर्चना पाटील चाकूरकर




तभा वृत्तसेवा

लातूर,दि. १५ एप्रिल : भाजपच्या देशव्यापी नारी शक्ती वंदन अभियानाने भविष्यात महिलांची सत्तेतील भागीदारी वाढणार असल्याचे प्रतिपादन भाजपच्या महाराष्ट्र प्रदेश भाजपच्या उपाध्यक्षा डॉ.अर्चनाताई पाटील चाकूरकर यांनी मंगळवारी लातुरात पत्रकारांशी बोलताना केले. हे अभियानाचा फायदा सर्वच राजकीय पक्षातील महिला पदाधिकाऱ्यांना होणार आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दि. १६ ते १८ एप्रिल २०२६ दरम्यान संसदेचे विशेष अधिवेशन बोलावले आहे. या अधिवेशनात नारी शक्ती वंदन अभियानसह वर्ष २०२९ च्या सार्वत्रिक निवडणुकांना सामोरे जाताना संसद सदस्यांची संख्या वाढवणे, महिलांना संसद – विधिमंडळात आरक्षण देणे यासारख्या महत्वपूर्ण कायद्यात बदल करणे , घटनादुरुस्ती केली जाणार आहे. पंतप्रधानांच्या दूरदृष्टीने निर्माण झालेल्या नव्या संसद भवनात सर्वानुमते मंजूर झालेले पहिले बिल नारी शक्ती वंदन हे असल्याचा पुनरुच्चारही डॉ. चाकूरकर यांनी केला.

याच्या आधी आठवेळा हा कायदा संसदेत मांडला गेला होता. मात्र त्या त्या वेळच्या परिस्थितीमुळे कदाचित तो संमत होऊ शकला नसावा,असे आपण समजू या. पंतप्रधान मोदींनी नव्या संसद इमारतीची उभारणी वाढीव खासदार संख्या डोळ्यासमोर ठेवून केली. देशाच्या राष्ट्रपतिपदी एक महिला, दिल्लीच्या मुख्यमंत्रीपदी महिलाच विराजमान होते. हे एका रात्रीत झालेले नाही. महिलांचा खऱ्या अर्थाने सन्मान करण्याचे काम मोदी सरकारच्या माध्यमातून होतात आहे. त्यामुळे समाजात महत्वाच्या पदावर असणाऱ्या महिला भगिनींच्या भेटी घेऊन पंतप्रधानांचे अभिनंदन करणारे मेसेज देणार आहोत. यामध्ये सर्वच राजकीय पक्षाच्या महिला प्रतिनिधींना सहभागी करून घेणार आहोत. मोदींचे अनेक निर्णय महिलांच्या भोवती फिरतात. महिलांसाठी राबविलेल्या शौचालय योजनेला देण्यात आलेले इज्जत घर , उज्वला गॅस योजना, लाडकी बहीण योजना आली. माता भगिनींच्या जीवनात बदल घडवून आणला. खऱ्या अर्थाने नारी शक्तीला वंदन केले जात आहे. घरकुल योजनेतही आता महिलांचे नाव सामील करून घेतले जात आहे, ही बाब महिलांच्या मजबुतीच्या दृष्टीने महत्वपूर्ण आहे. हा विचार समाजातील तळागाळातील महिलांपर्यंत पोहचविण्याचा आमचा प्रयत्न आहे, असेदो. अर्चना पैल चाकूरकर यांनी सांगितले. यावेळी प्रेरणा होनराव, शीतल मालू,रागिणी यादव, जयश्री पाटील, जयश्री मोतीपवळे , अस्मिता काटे ,मीना गायकवाड यांची उपस्थिती होती.

## 'ज्ञानप्रकाश'च्या आर्थिक साक्षरता कार्यशाळेस प्रतिसाद

त.भा.वृत्तसेवा

लातूर दि.१५ एप्रिल : विद्यार्थ्यांमध्ये बौद्धिक क्षमतेसोबतच व्यावहारिक कौशल्यांचा विकास व्हावा, या उद्देशाने लातूर येथील 'ज्ञानप्रकाश लर्निंग होम' येथे 'गुंतवणूकः उज्ज्वल भविष्याची गुरुकिल्ली' या विषयावर आर्थिक साक्षरता कार्यशाळा उत्साहात पार पडली. या कार्यशाळेत नामांकित सीए विठ्ठल दुडिले व टॅक्स कन्सल्टंट सौ. श्रेया दुडिले यांनी विद्यार्थ्यांना गुंतवणूक आणि बचतीचे महत्त्व सोप्या भाषेत पटवून दिले.

कार्यशाळेच्या प्रारंभी श्रेया दुडिले यांनी आर्थिक साक्षरतेचे महत्त्व अधोरेखित केले. लहानपणापासूनच बचतीची सवय लावल्यास भविष्यात आर्थिकदृष्ट्या सक्षम नागरिक बनणे सुलभ होते, असे प्रतिपादन या कार्यशाळेतील सर्वात महत्त्वाचा मुद्दा म्हणजे 'चक्रवाढ व्याजाचे महत्त्व'. सीए विठ्ठल दुडिले यांनी चक्रवाढ व्याजाला जगातील आठवे आश्र्चर्य संबोधत, वेळेवर केलेली छोटी गुंतवणूक कशी वाढते हे अधोरेखित केले. केवळ बचत पुरेशी नसून, महागाईच्या दरापेक्षा अधिक परतावा देणाऱ्या पर्यायांमध्ये गुंतवणूक करणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. एसआयपी आणि स्टॉक मार्केटमधील मूलभूत संकल्पना समजून घेतल्यास तरुण पिढी आर्थिक नियोजनात यशस्वी होऊ शकते, असा मोलाचा सल्ला या सत्रातून विद्यार्थ्यांना मिळाला. त्यांनी केले. मुख्य मार्गदर्शक सीए विठ्ठल दुडिले यांनी सादरीकरणाद्वारे गुंतवणुकीचे विविध पैलू स्पष्ट करताना चक्रवाढ व्याजाची ताकद समजावून सांगितली. अल्प रकमेची सातत्यपूर्ण गुंतवणूक भविष्यात मोठ्या संपत्तीत कशी रूपांतरित होते, याचे उदाहरणांसह स्पष्टीकरण त्यांनी दिले.

यावेळी विद्यार्थ्यांना पॉकेट मनीचे नियोजन, एसआयपी, म्युच्युअल फंड आणि महागाईवर मात करण्यासाठी आवश्यक असलेल्या गुंतवणुकीच्या पर्यायांची माहिती देण्यात आली. संस्थेच्या मुख्याध्यापिका सौ. सविता सतीश नरहरे यांनी अशा उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांना व्यावहारिक ज्ञानाची जाणीव होत असल्याची भावना व्यक्त केली. या कार्यशाळेस शिक्षकवृंद आणि नववी–दहावीचे विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## शिवसेनेतर्फे गंजगोलाईत पाणपोई सुरू

लातूर : भारतरत्न डॉ. बाबासाहेब बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने आंबेडकरांच्या पुतळ्याला पुष्पहार जिल्हाप्रमुख बालाजी रेड्डी व उपस्थितीत गंजगोलाईतील सिटी बस आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त शिवसेना उद्धव ने येथील आंबेडकर पार्कवर डॉ. बाबासाहेब अर्पण करून अभिवादन करण्यात आले. उपजिल्हाप्रमुख बालाजी जाधव यांच्या थांब्यावर पाणपोईचा शुभारंभ करण्यात आला.

या प्रसंगी शिवसेनेचे सह संपर्क प्रमुख चंद्रनाथ मुरळीकर, युवा सेना जिल्हाप्रमुख राहुल मातोळकर, तालुकाप्रमुख शंकर रांजणकर, शहर प्रमुख माधव कलमुकले, शिवराज मुळावकर, विधानसभा प्रमुख राजेंद्र कतारे, महानगर संघटक ॲड. रवी पिचारे, विधानसभा समन्वयक सोमनाथ झुंजारे, आरोग्य सेनेचे त्र्यंबक स्वामी, शहर समन्वयक संतोष माने, उप तालुका प्रमुख सिद्धेश्र्वर जाधव, अल्पसंख्याकचे मुनीरखान पठाण, निराधारचे संतोष घोडके, फेरीवाला संघटनेचे हनुमंत पडवळ, यांच्यासह शिवसैनिक उपस्थित होते.

## शहर जिल्हा काँग्रेसच्या वतीने जयंती साजरी



त.भा.वृत्तसेवा

लातूर दि.१५ एप्रिल : लातूर : भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३५ वी जयंती लातूर शहर जिल्हा काँग्रेसच्या वतीने उत्साहात साजरी करण्यात आली. प्रारंभी डॉ. आंबेडकर पार्कवर डॉ. आंबेडकर यांच्या पुतळ्यास तर काँग्रेस भवन येथे डॉ. आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त लातूर शहर जिल्हा काँग्रेसचे अध्यक्ष ॲड. किरण जाधव यांनी डॉ. आंबेडकर यांच्या पुतळ्यास आणि काँग्रेस भवनातही डॉ. आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करुन अभिवादन केले. यावेळी माजी उपमहापौर कैलास कांबळे, राजा माने, अविनाश बट्टेवार, नामदेव इगे, करीम तांबोळी, ॲड. अंगद गायकवाड, फारुक शेख, गिरिश ब्याळे, गौत्तम वाघमारे आदी उपस्थित होते. उपस्थित पदाधिकारी, कार्यकर्त्यांनीही डॉ. आंबेडकर यांना अभिवादन केले.

## बाबासाहेबांचा वारसा जपायचा असल्यास जीवनात पुस्तकांवर प्रेम करा : डॉ. अशोक ढवण




त.भा.वृत्तसेवा

लातूर दि.१५ एप्रिल : महाराष्ट्र ही महापुरुषांची भूमी आहे आणि आपण इथे जन्माला आलो हे आपले भाग्य आहे. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे चिंतन मूलगामी होते. कोलंबिया विद्यापीठाच्या ग्रंथालयात सर्वात आधी येणारा आणि सर्वात शेवटी जाणारा विद्यार्थी म्हणून त्यांची ओळख होती. हाच वारसा आपल्याला पुढे न्यायचा असेल, तर तरुणांनी पुस्तकांवर प्रेम करायला हवे, असे प्रतिपादन माजी कुलगुरू डॉ. अशोक ढवण यांनी केले.

येथील कृषी महाविद्यालयात महात्मा ज्योतिबा फुले व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या संयुक्त जयंती महोत्सवांतर्गत आयोजित 'सामाजिक समता सप्ताहाचा' समारोप मंगळवारी करण्यात आला. यावेळी 'भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर' या विषयावर आयोजित व्याख्यानात डॉ. ढवण प्रमुख मार्गदर्शक म्हणून बोलत होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. बाबासाहेब ठोंबरे होते. यावेळी माजी अधिकारी सोमेश्र्वर वाघमारे, डॉ. ज्योती देशमुख, डॉ. अनिलकुमार कांबळे यांची प्रमुख उपस्थिती होती. डॉ. ढवण पुढे म्हणाले की, बाबासाहेबांनी मजूरमंत्री असताना स्त्रियांसाठी प्रसूती रजा आणि विम्याची केलेली तरतूद त्यांच्या विशाल कर्तृत्वाची साक्ष देते. यावेळी सलग १८ तास अध्ययन उपक्रम आणि विविध स्पर्धांमधील यशस्वी विद्यार्थ्यांचा मान्यवरांच्या हस्ते साकार करण्यात आला.

अध्यक्षीय समारोपात अधिष्ठाता डॉ. बाबासाहेब ठोंबरे यांनी विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासावर भर दिला. वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठात विद्यार्थ्यांचा केवळ गुणात्मकं दर्जा सुधारण्यावरच नाही, तर त्यांच्या ज्ञानाला शहाणपणाची जोड देण्यावर भर दिला जातो. महापुरुषांच्या विचारातून प्रेरणा घेऊन या विद्यापीठाने 'हरित विद्यापीठ' पुरस्कारापर्यंत मजल मारली असून, विद्यार्थ्यांनी चांगले नागरिक व्हावे, अशी अपेक्षा त्यांनी यावेळी व्यक्त केली.

## नाट्यवेड्या कल्याण वाघमारे यांचे दुःखद निधन

त.भा.वृत्तसेवा

लातूर दि.१५ एप्रिल : लातूरच्या सांस्कृतिक विश्र्वावर शोककळा पसरवणारी अत्यंत वेदनादायी बातमी समोर आली आहे. नाट्य क्षेत्रात आपल्या अभिनय, दिग्दर्शन आणि सर्जनशीलतेच्या जोरावर वेगळी ओळख निर्माण करणारे रंगकर्मी कल्याण वाघमारे यांचे दि. १४ एप्रिल २०२६ रोजी दुपारी १२:२० वाजता संभाजीनगर (औरंगाबाद) येथील एका खाजगी रुग्णालयात उपचारादरम्यान दुःखद निधन झाले. ते अवघे ४८ वर्षांचे होते. कल्याण वाघमारे हे केवळ एक कलाकार नव्हते, तर ते नाटकावर जीवापाड प्रेम करणारे खरे नाट्यवेडे होते. त्यांच्या जाण्याने लातूरच्या रंगभूमीतील एक महत्त्वाचा स्तंभ कोसळला आहे.

नाटकासाठी जगलेले आयुष्य

कॉलेज जीवनापासूनच कल्याण यांना नाटकाची विलक्षण ओढ होती. वर्गात बसण्यापेक्षा ते तालमीत रमायचे. युवक महोत्सव असो किंवा सांस्कृतिक स्पर्धा – भारुड, एकपात्री, एकांकिका, दीर्घांक अशा सर्व प्रकारांमध्ये त्यांनी आपली छाप पाडली. नाटक म्हणजे त्यांच्यासाठी केवळ कला नव्हती, तर तो त्यांचा श्वास होता.

## लातूरमध्ये भव्य रक्तदान शिबिर

त.भा.वृत्तसेवा

लातूर, दि. १५ एप्रिल : श्री अनंत सेवाभावी संस्था, लातूर आणि अतुल मेटल वर्क्स यांच्या संयुक्त विद्यमाने एम.आय.डी.सी. परिसरातील अतुल मेटल येथे भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. सकाळी १० ते सायंकाळी ४ या वेळेत पार पडलेल्या या शिबिरात ३० रक्तदात्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत रक्तदान केले.

लातूर शहरात निर्माण झालेल्या रक्ताच्या तुटवड्याच्या पार्श्र्वभूमीवर हा उपक्रम दरवर्षी राबविण्यात येतो. एम.आय.डी.सी. परिसरातील उद्योजक, व्यापारी तसेच शहरातील नागरिकांनी या उपक्रमाला मोठा प्रतिसाद दिला.श्री अनंत सेवाभावी संस्था ही २००८ पासून सामाजिक कार्यात सक्रिय असून २०२३ पासून नियमित रक्तदान शिबिरांचे आयोजन करत आहे.


दिनांक : १३/४/२६

### जाहीर प्रगटन

शाळेचे हस्तांतर करणे बाबत

हस्तांतर करुन देणारी संस्था श्री साई बहुउद्देशीय सेवाभावी संस्था औसा ता. औसा जि. लातूर द्वारा संचलित स्पर्श इंग्लिश स्कूल औसा ता. औसा जि. लातूर ही शाळा हस्तांतर करुन घेणारी संस्था नवजीवन सेवाभावी संस्था औसा ता. औसा जि. लातूर या संस्थेवर विद्यार्थ्यांचे हित लक्ष्यात घेता लिहुन देणार व घेणार संस्थेचे अध्यक्ष / सचिव या दोन्ही संस्थेने ठराव पास करुन हस्तांतर करुन घेण्याचा व देण्याचा ठराव घेतला असुन सदर ठराव ही विना मोबदला घेतला आहे. साई बहुउद्देशीय सेवाभावी संस्था औसा ता. औसा द्वारा संचलीत स्पर्श इंग्लिश स्कूल औसा ता.औसा जि.लातूर ही शाळा इंग्रजी माध्यमाची असुन स्वयंम अर्थ तत्वावर मान्यता आहे. शाळा हस्तांतर बाबत लातूर जिल्हा औसा ता. औसा जि. लातूर तालुकाच्या व जिल्ह्यातील सर्व लोकांना जाहिर प्रगटन द्वारे सुचित करण्यात येते. शाळा हस्तांतरण बाबत कोणाची काही हरकत व उजर असल्यास शिक्षण, अधिकारी माध्यमिक लातूर व उपसंचालक, शिक्षण विभाग लातूर विभाग लातूर यांना जाहिर प्रगटन दिल्यापासुन १५ दिवसाच्या आत सादर करावयाचे आहे. १५ दिवसाच्या नंतर आक्षेप आल्यास ग्राहय धरता येणार नाही. व त्यानंतर हस्तांतरची कार्यवाही करण्यात येईल. जाहिर प्रगटन देणार व घेणार संस्था

**अध्यक्ष / सचिव,**
**श्री साई बहुउद्देशीय सेवाभावी संस्था औसा**
**ता.औसा जि.लातूर**



दि. १५/०४/२०२६

### जाहीर नोटीस

आमचे अशिल बँक ऑफ बडौदा, शाखा – औसा रोड, लातूर यांनी दिलेल्या माहीतीवरुन व दाखवलेल्या कागदपत्रावरुन मी ॲड. राहुल च. शेळके, रा. दु. न. ८५, दुसरा मजला, न्यु आदर्श शॉपींग कॉम्प्लेक्स, औसा रोड, लातूर, ता. जि. लातूर या जाहीर नोटीसने सर्व तमाम नागरीकांना, बँकाना व पत संस्थेना कळवितो की,

१. मिळकतीचे वर्णन लातूर मनपा हद्दीतील मौजे कन्हेरी विभागातील जमीन सर्वे क्र. १३/३/ई पैकीचा प्लॉट क्र. १३, ज्याची लांबी पुर्व–पश्र्चिम ५० फुट व रुंदी दक्षिण–उत्तर ३५ फुट, एकुण क्षेत्रफळ १७५० चौ. फुट (१६२.६३ चौ. मी.), ज्याचा मनपा मिळकत क्र. बी–७–२१६२, सदरची मिळकत ही मनिषा सुर्यभान जगताप यांचे मालकीची आहे.

२. वरील मिळकत ही मनिषा सुर्यभान जगताप यांचे मालकीची आहे. सदरची मिळकत ही नोंदणीकृत खरेदीखत दस्त क्र. १९६१/२००९, दि. १५/०५/२००९ अन्वये एहसानखाँ बाशिदखाँ पठाण यांनी मनिषा सुर्यभान जगताप यांच्या हक्कात करुन दिले. सदरचे अस्सल खरेदीखत हे मनिषा सुर्यभान जगताप यांचे ताब्यात दिलेले होते. तथापी, सदरचे अस्सल नोंदणीकृत खरेदीखत दस्त क्र. १९६१/२००९, दि. १५/०५/२००९ हे मनिषा सुर्यभान जगताप यांचे ताबेतुन गहाळ झाले असल्याचे त्यांनी आमचे अशिल यांना सांगीतले आहे. सदरची मिळकत ही पुर्णपणे निर्वेध व निष्कर्जी असले बाबत निर्वाळा मनिषा सुर्यभान जगताप यांनी आमचे अशिल यांना दिलेला आहे. सदर अस्सल खरेदीखत कोणत्याही वित्तीय संस्थेमध्ये त्यांनी तारण म्हणुन ठेवलेले नाही.

३. मनिषा सुर्यभान जगताप यांनी सदरची मिळकत तारण देऊन कर्जाची मागणी केलेली आहे. सदरचे मिळकतीचे तारणावर आमचे अशिल बँक हे मनिषा सुर्यभान जगताप यांना कर्ज देणार असुन, मनिषा सुर्यभान जगताप हे सदर मिळकत ही आमचे अशिल बँकेकडे सदर कर्जास तारण गहाण दस्ताने तारण गहाण देणार आहेत.

४. सबब या जाहीर नोटीसीने सर्व तमाम नागरीकांना, बँकाना व पत संस्थेना कळविणेत येते की, सदर मिळकतीवर जर अन्य कोणाचा कसलाही हक्क, अधिकार, बोजा अगर मिळकतीबाबत कसल्याही प्रकारचे तारण गहाण, करार, साठेखत वगैरे असलेस त्यांनी सात (७) दिवसाचे आत लेखी पुरावे सहीत हरकत माझेकडे दयावी, अन्यथा सदर मिळकतीचे तारण गहाण व कर्जा बाबत कोणाचीही कसलीही हरकत नाही असे समजुन आमचे अशिल सदर मिळकत तारण गहाण घेतील व त्यांचे नावे कर्ज मंजुर करतील, त्यानंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही व ते आमचे अशिल बँकेवर बंधनकारक राहणार नाही.

सबब ही जाहीर नोटीस.

तर्फे,
**ॲड. राहुल च. शेळके, लातूर.**
**मोबाईल नं . ९९६००९९६७०, ९४२१३५४८५३**